पंढरी संचार

pandharisanchar.com

RNI-MAH-MAR/1499/2000 • वर्ष २९ • अंक - २२३

• पंढरपूर • शुक्रवार, ३ जानेवारी २०२५ • किंमत ₹ ४ • पाने : ८

NO PAIDNEWS

माळीनगर येथील रंजना देवकर यांना आदर्श शिक्षिका पुरस्कार PII

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्र राज्य पत्रित नागरी सेवा पूर्व.... PIII

At a Glance

चोरट्यांनी पत्राशेडमधून सोन्याचे दागिने केले लंपास

सांगोला : पत्राशेडमधील पत्र्याच्या दोन पेट्या चोरून नेले. पेटीतील २ तोळे सोन्याचे दागिने, १० भार चांदीचा करदोड्यासह रोख २० हजार रुपये असा ऐवज चोरीला गेला. ही घटना मंगळवारी मध्यरात्रीनंतर अचकदाणी ता सांगोला येथील काळेबाग वस्तीवर घडली. याबाबत दयानंद नामदेव काळेबाग (रा. अचकदाणी) यांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध पोलिसात तक्रार दिली आहे. नवीन घराचे बांधकाम चालू आहे. त्यामुळे घरातील सर्व संसारोपयोगी साहित्य, कपडे, धान्य शेजारील पत्र्याच्या शेडमध्ये ठेव होत्या.

कीटकनाशक प्राशन करून तरुणाचा आत्महत्येचा प्रयत्न

सांगोला : अज्ञात कारणातून कीटकनाशक प्राशन करून तरुणाने आत्महत्येचा प्रयत्न केला. हा प्रकार ३१ डिसेंबरच्या रात्री आठच्या सुमारास मोहोळ तालुक्यातील आडेगाव येथे उघडकीस आला. विक्रम आप्पा ठोकडे (वय २५, रा. आडेगाव ता. मोहोळ) असे तरुणाचे नाव आहे. विक्रम याने मंगळवारी रात्री आठच्या सुमारास राहते घरात अज्ञात कारणातून पिकावर फवारणी करण्याचे औषध प्राशन केले. त्यानंतर त्यास त्रास सुरू झाल्याने मोहोळ येथील सरकारी रुग्णालयात प्राथमिक उपचार करण्यात आले. उपचारानंतर भाऊ चेतन याने येथील शासकीय रुग्णालयात दाखल केले.

जलसंपदा मंत्री विखे-पाटील आज सोलापूर दौऱ्यावर

सोलापूर : राज्याचे जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री राधाकृष्ण विखे पाटील हे सोलापूर जिल्हा दौऱ्यावर येत असून, त्यांचा दौरा कार्यक्रम पुढील प्रमाणे आहे. त्यांचे आज गुरुवारी सांयकाळी 5 वा. सोलापूर विमानतळ येथे आगमन होणार असून मोटारीने पंढरपूरकडे प्रयाण करणार आहेत. सायं. 7. 15 वा. श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिराकडे प्रयाण, सायं 7. 30 वाजता मंदिरात आगमण व दर्शनास उपस्थिती. रात्री 8. 15 वाजता शासकीय विश्रामगृह, पंढरपूर येथे आगमन व मुक्काम शुक्रवार 3 जानेवारीला सोलापूर परत येणार आहेत.

मुलगा होत नसल्याने विवाहितेचा छळ

अकलूज : लग्नानंतर आम्हाला मुलगा हवा असताना तिन्ही मुलीच झाल्याच्या कारणातून सासरच्या लोकांकडून शारीरिक व मानसिक छळ केल्याप्रकरणी आस्मा जुबेर काझी (रा. मजरेवाडी) यांनी विजापूर नाका पोलिसात फिर्याद दिली आहे. मे 2009 मध्ये आस्मा यांचा अकलूज येथील जुबेर काझी यांच्याशी विवाह झाला होता. काही महिन्यांनी सासरच्यांनी मुलगा होत नसल्याने छळ केल्याचे त्यांनी म्हटले आहे. त्यांच्या फिर्यादीवरून पती जुबेर काझी, सासरा हिदययतुल्ला काझी, सासू माशाम्मा काझी, दिर जुनेद काझी (रा. सर्वजण अकलूज) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

नेत्यांकडून स्थानिक स्वराज्य संस्था

निवडणुकीची मोर्चे बांधणी सुरु

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

पंढरपूर : पंढरपूर नगरपरिषद व पंचायत समितीमध्ये गेल्या 25 वर्षापासून माजी आमदार प्रशांत परिचारक गटाची सत्ता आहे. मात्र आगामी 2025 रोजी होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीकडे खा. धैर्यशील मोहिते पाटील, आमदार अभिजीत पाटील, आमदार राजू खरे, विठ्ठल कारखान्याचे माजी चेअरमन भगीरथ भालके यांनी लक्ष केंद्रित केले असल्यामुळे यंदाची निवडणूक अटीतटीची होणार असल्याचे दिसून येत आहे. स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत उमेदवारी मिळावी म्हणून इच्छुक उमेदवारांची धावपळ सुरू असल्याचे दिसून येत आहे. पंढरपूर तालुक्याला उजनी व नीरा डावा उजवा कालव्याचे पाणी मिळाले असल्यामुळे तालुका सुजलाम सुफलाम झाला आहे. शेतकऱ्यांनी नगदी पिके घेण्यास सुरुवात केली आहे. गेल्या पंचवीस वर्षापासून पंढरपूर तालुक्यातील पंचायत समिती व पंढरपूर नगरपरिषदेवर माजी आमदार प्रशांत परिचारक गटाची सत्ता आहे. प्रबळ विरोधक नसल्यामुळे प्रत्येक निवडणुकीत त्यांना यश मिळाले आहे. मात्र 2024 झाली झालेल्या विधानसभा निवडणुकीत पंढरपूर तालुक्यातील चित्र बदलले आहे. माढा लोकसभा

मतदार संघातून धैर्यशील मोहिते पाटील तर विधानसभा मतदार संघातून अभिजीत पाटील विजयी झाले आहेत. मोहोळ विधानसभा मतदार संघातून राजू खरे विजयी झाले आहेत तर विठ्ठल कारखान्याचे माजी चेअरमन भगीरथ भालके यांची पंढरपूर व मंगळवेढा तालुक्यात चांगली ताकद आहे. यामुळे या सर्व नेत्यांनी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीकडे लक्ष केंद्रित केले आहे. स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत यश मिळविण्यासाठी या नेत्यांनी मोर्चे बांधणी करण्यास सुरुवात केली आहे. तर माजी आमदार प्रशांत परिचारक गटाकडूनही स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीची तयारी सुरू आहे. आमदार समाधान आवताडे यांनीही या निवडणुकीकडे लक्ष केंद्रित केले असल्याचे दिसून येत आहे. यामुळे स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत अनेक नेते मंडळी निवडणुकीची मोर्चे बांधणी करत आहेत. या निवडणुकीत उमेदवारी मिळावी म्हणून इच्छुक उमेदवारांची धावपळ सुरू झाली आहे. फेब्रुवारी मार्च महिन्यात स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका जाहीर होण्याची शक्यता आहे.

स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीवर आगामी जिल्हा विधान परिषद निवडणुकीचे गणिते मांडली जाणार आहेत. यामुळे स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीला महत्त्व प्राप्त झाले आहे.

मनसेचे नेते दिलीप धोत्रे यांनीही स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत उमेदवार उभा करण्याचे संकेत दिले आहेत. यामुळे ही निवडणूक अटीतटीची होणार असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगू लागले आहे.

नामदेव पायरी येथे सामूहिक आरतीला प्रारंभ!

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

पंढरपूर : मंदिरांवरील, तसेच मंदिराच्या भूमीवरील अतिक्रमणे तात्काळ हटवण्यात यावी या मागणीसाठी दर आठवड्याला 'मंदिर तेथे सामूहिक आरती' करण्याचा निर्णय नुकताच शिर्डी येथे 'महाराष्ट्र मंदिर न्यास परिषदे'त एक हजारांहून अधिक मंदिरांच्या विश्वस्तांनी घेतला होता. त्याप्रमाणे या अनुषंगाने ३१ डिसेंबर २०२४ या दिवशी पंढरपूर येथील संत नामदेव महाराज पायरी या ठिकाणी 'सामूहिक आरती' मोठ्या उत्साहाने आणि भावपूर्ण वातावरणात मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आली, अशी माहिती 'मंदिर महासंघा'चे सदस्य श्री. विनोद रसाळ यांनी दिली आहे.

या वेळी पंढरपूर येथील वारकरी संप्रदाय पाईक संघाचे संस्थापक ह.भ.प. देवव्रत (राणा) महाराज वासकर आणि राष्ट्रीय प्रवक्ते ह.भ.प. रामकृष्ण हनुमंत महाराज वीर, तसेच ह.भ.प. शाम महाराज उखळीकर, ह.भ.प. चवरे महाराज, ह.भ.प. रघु महाराज कबीर, ह.भ.प. नागेश महाराज बागडे, ह.भ.प. दर्शन महाराज बडवे, ह.भ.प. बाबाराव बडवे महाराज, महेश खिस्ते, सौरभ थिटे, वैभव बडवे, बाळासाहेब डिंगरे, महेशाचार्य उत्पात, विठ्ठल बडवे, हरी काका कुलकर्णी, रवी काका क्षीरसागर, श्रीराम बडवे, सचिन लादे, इस्कॉनचे नागेश दास, दिलीप बडवे, मयूर बडवे, उदय इंदापूरकर, अधिवक्ता आशुतोष बडवे, रामेश्वर कोरे, महाराष्ट्र मंदिर महासंघ राज्य कोर ग्रुप सदस्य श्री. गणेश लंके, महाराष्ट्र मंदिर महासंघाचे श्री. विनोद रसाळ, हिंदु जनजागृती समितीचे श्री. राजन बुणगे यांच्यासह मोठ्या संख्येने विविध मंदिरांचे विश्वस्त, » पान ३ वर

विविध पक्ष्यांच्या आगमनासाठी उजनीकाठ आतूर

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

माढा : सध्या उजनीतून सोडल्या जाणाऱ्या पाण्यामुळे जलाशयाचा काठ उघडा पडून स्थानिक व स्थलांतरित पक्ष्यांना मुबलक खाद्यान्न उपलब्ध होईल व येत्या काही दिवसांत पक्ष्यांची गर्दी वाढेल, असा अंदाज उजनी परिक्रमा करणारे पक्षी अभ्यासक डॉ. अरविंद कुंभार यांनी दिली. यावर्षी पावसाळ्याच्या सुरुवातीपासून झालेल्या समाधानकारक पावसामुळे धरणातील पाणीसाठ्याची क्षमता वाढल्यामुळे पक्ष्यांचा चराऊ भाग लवकरच म्हणजे सप्टेंबर महिन्यातच पूर्णपणे पाण्याने झाकला होता.

भर दिवसा घरफोडी १ लाख २५ हजाराचा ऐवज लंपास ; चोरटा सीसीटीव्ही कॅमेरा कैद

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

पंढरपूर : ईसबावी येथील पुजारी सिटी मध्ये असलेले बंद घराचे कुलूप तोडून चोरट्याने 1 लाख 25 हजार रुपयांचा ऐवज चोरून नेला. या घटनेमुळे नागरिकात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. चोरटा परिसरातील सीसीटीव्ही कॅमेरात कैद झाला आहे. ईसबावी येथील पुजारी सिटी येथे विजय कचरे राहण्यास आहेत. नेहमीप्रमाणे ते सकाळी 10 वाजता घराला कुलूप लावून पत्नी व मुलासह पार्किंग मध्ये फिरावयास गेले होते. फिरून झाल्यानंतर अर्ध्या तासात ते घरी आले असता घराला कुलूप दिसून आले नाही. यामुळे त्यांना संशय आला. म्हणून त्यांनी बेडरूम मध्ये जाऊन पाहणी केली असता कपाटाचे लॉकर तुटलेले दिसून आले. लॉकर मधील सोन्याचे दागिने व रोख 25 हजार रुपये असा एक लाख 25 हजाराचा मुद्देमाल चोरीला गेला असल्याचे दिसून आले. यामुळे लगेच कचरे यांनी याबाबत पंढरपूर शहर पोलीस ठाण्याला माहिती दिली. पोलिसांनी पाहणी केली असता एक चोरटा सीसीटीव्ही कॅमेऱ्यामध्ये कैद झाला आहे. भर दिवसा चोरी झाली असल्यामुळे नागरिकात भीतीचे वातावरण पसरले आहे.

जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी घेतले श्री विठ्ठल रुक्मिणी मातेचे दर्शन

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

पंढरपूर : राज्याचे जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी आज श्री विठ्ठल- रुक्मिणी मातेचे दर्शन घेतले.

यावेळी मंदिर समितीच्या वतीने मंदिर समितीचे सदस्य ज्ञानेश्वर महाराज जळगावकर, व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांच्या हस्ते शाल व श्री विठ्ठल-रुक्मिणीची मूर्ती देवून सत्कार करण्यात आला.

यावेळी उपविभागीय अधिकारी सचिन इथापे, जलसंपदा विभागाचे अधिक्षक अभियंता श्री खांडेकर, प्र.तहसीलदार सचिन मुळीक, कार्यकारी अभियंता सोमशेखर हरसुरे, नायब तहसीलदार बालाजी पुदलवाड यांच्यासह मान्यवर पदाधिकारी उपस्थित होते.

सोलापूर पोलिसांनी शोधले 95 बेपत्ता नागरिक

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

सोलापूर : सोलापूर शहर पोलीस आयुक्तालयाने ऑपरेशन मुस्कान 13 राबवून शहराच्या विविध भागातून बेपत्ता झालेल्या 76 महिला 5 अल्पवयीन मुली व 6 मुलांना शोधून काढले आहे. याशिवाय भीक मागणाऱ्या 8 जणांची सुटका केली आहे. सोलापूरचे पोलीस आयुक्त एम राजकुमार, पोलीस उपायुक्त डॉ. दिपाली काळे, सहाय्यक पोलीस आयुक्त राजन माने, अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाचे पोलीस निरीक्षक महादेव राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली 1 ते 31 डिसेंबर या काळात पोलिसांच्या 8 पथकांनी ही कामगिरी केली आहे. या कामगिरीबद्दल आठही पथकातील अधिकारी व कर्मचारी यांचे कौतुक होत आहे.

वाचकांसाठी सुवर्णसंधी !!!

सादर करीत आहे एक आकर्षक योजना ३९९ रु. मध्ये सहा महिने घरपोच अंक

' दै.पंढरी संचार '

आजच आपला अंक विक्रेत्यांकडे बुक करा अथवा कार्यालयाशी संपर्क साधा.

- संपर्क -

रविकिरण पाटील - ८२०८९४२३४६

दत्तात्रय बनसोडे - ९८९०९७६४७५

बुकिंग मर्यादा १५ जानेवारीपर्यंत.

पंढरपुर शहर पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण शाखेची कामगिरी

जिवे ठार मारण्याचा कट करणाऱ्यांना तिघांना हत्यारासह अटक

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

पंढरपूर : पंढरपुर शहरामध्ये बाहेरून येवुन जिवे ठार मारण्याचा कट करणाऱ्यांना ताब्यात घेवुन गुन्हे प्रकटीकरण शाखेने केले ०१ पिस्टल, ०३ जिवंत काडतुस, ०१ तलवार व ०१ चाकु जप्त.

पंढरपूर शहर पोलीस ठाणे हद्दीत गुन्हे प्रतिबंध करणे करीता दिनांक २६/१२/२०२४ रोजी रात्रौ गस्त करीत असताना कराड रोड लगतच्या श्रेयश पॅलेसच्या बाजुला असलेल्या मोकळया मैदानात एक कार अंधारात संशयीतपणे थांबवलेली दिसली. त्याचा संशय आल्याने सदरचे वाहना जवळ जावुन पाहिले असता त्यामध्ये तिन इसम बसलेले दिसले बसलेल्या इसमांना आपण येवढ्या रात्री येथे काय करीत आहात गाडीमध्ये कोण कोण आहेत तसेच सदरच्या कारला आपण पाठिमागे नंबर प्लेट का लावलेली नाही असे विचारले असता सुरवातीला त्यांनी कोणत्याही प्रश्नांची उत्तरे दिली नाहीत, आत मध्ये बसलेल्या इसमांना खाली उतरण्यास सांगीतले असता सदर इसम हे खाली उतरून पळून जाण्याचा प्रयत्न करीत असताना त्यांना जागीच पकडले त्यांचेकडे नाव पत्ता बाबत विचारना केली तसेच मिळुन आलेली स्विफ्ट कार चेक केली असता त्यामध्ये बेकायदेशीर अवैध शस्त्र मिळुन आल्याने त्यांचेकडे सदर शस्त्रांबाबत अधिक चौकशी केली असता वेळापुर येथे राहण्यास असलेला इसम हा पंढरपूर येथे पळुन आला आहे व त्याचा आम्ही शोध घेत आहे असे सांगीतले तसेच यातील आरोपी क. ०१ याचे पुर्व वैमनस्य असल्याचे त्याने » पान ३ वर

सोलापूर : सन 1818 मध्ये पेशवाईंचा अस्त झालेल्या भीमा कोरेगावच्या लढाईचा दिवस हा 1 जानेवारी रोजी शौर्य दिन म्हणून साजरा केला जातो. यानिमित्ताने प्रबुद्ध भारत तरुण मंडळ (पी. बी ग्रुप) च्या वतीने आज श्राविका चौक, बुधवार पेठ येथे सो. म. पा. प्रभाग क्रमांक 5 चे आरोग्य निरीक्षक बसवराज जमादार यांच्या हस्ते विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले.

किशोरसिंह माने पाटील यांचा ६७ वा वाढदिवस मोठ्या उत्साहात साजरा

माळशिरस तालुक्यात लवकरात लवकर एमआयडीसी व्हावी- माने-पाटील

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

माळशिरस : अकलूज गावाचे लोकप्रिय व्यक्तीमत्व तथा अकलूज ग्रामपंचायतीचे कर्तव्यदक्ष माजी सरपंच सरपंच किशोरसिंह माने पाटील यांचा ६७ वा वाढदिवस पाटील वाड्यात मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. सकाळपासून अकलूजकरांनी व मित्र मंडळ परिवारांनी त्यांचा सत्कार करण्यासाठी व वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यासाठी मोठी गर्दी केली होती.

अकलूज गावातील गोरगरिबांचे कैवारी व युवकांचे मार्गदर्शक व आशास्थान असलेले किशोरसिंह माने पाटील यांना आज सकाळी घरातील सुहासिनी महिलांनी औक्षण केल्यानंतर अकलूज गावची ग्रामदैवत श्री अकलाई देवीचे दर्शन घेतले व नीरा नदीच्या काठावरील कर्मवीर कै. बाबासाहेब माने पाटील यांचा समाधीचे दर्शन घेतले.त्यानंतर अकलूजमधील विविध धार्मिक स्थळांचे दर्शन घेतले.पाटील वाड्यात आल्या नंतर त्यांचा सत्कार करण्यासाठी विविध राजकीय क्षेत्रातील मान्यवर नेते, पदाधिकारी,अकलूज शहरातील व्यापारी, विविध संघटनेचे प्रतिनिधी,विविध समाजाचे सदस्य,पोलीस दलातील अधिकारी,अकलूज ग्रामपंचायतीचे माजी कर्मचारी, युवक कार्यकर्ते,विविध सामाजिक मंडळाचे कार्यकर्ते, सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ व नवरात्र मंडळाचे,मराठा सेवा संघाचे पदाधिकारी,विविध दैनिक वृत्तपत्राचे पत्रकार,पोर्टलचे प्रतिनिधी,विविध यु ट्यूब चॅनेलचे प्रतिनिधी,अकलूजमधील विविध बँकेचे अधिकारी यांनी येवून वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.

किशोरसिंह माने पाटील अकलूज ग्रामपंचायतीचे सरपंच असताना त्यांच्या कारकिर्दीत ग्रामपंचायतीने उत्कृष्ट ग्रामस्वच्छता अभियान राबवून महाराष्ट्र शासनाचे आठरा लाखाचे बक्षीस मिळवले होते.महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री नारायण राणे व माजी उपमुख्यमंत्री गोपीनाथ मुंडे यांच्या शुभहस्ते बक्षीस मिळवले होते.अकलूज येथील ग्रामीण रूग्णालयात परिसरात युवकांना रोजगार उपलब्ध व्हावा व व्यवसाय करण्यासाठी शॉपिंग सेंटर उभारले आहे.विजयसिंह मोहिते पाटील क्रिडा संकुलसाठी जागा त्यांच्या कार्य काळात मिळाली आहे.शॉपिंग सेंटरवरील दुस-या मजल्याचे दुकान गाळे बांधले आहेत.सदुभाऊ सार्वजनिक वाचनालयाची भव्य इमारत ही त्यांच्या कारकिर्दीत झाली असून अकलूजचा सर्वांगीण विकास करत ग्रामपंचायतीच्या उत्पन्नात वाढ केली होती.

सत्काराला उत्तर देताना माने-पाटील म्हणाले, माळशिरस तालुक्यात लवकरात लवकर एमआयडीसी सुरू व्हावी. युवकांच्या हाताला काम मिळावे व बेरोजगारांना रोजगार उपलब्ध व्हावा.त्याच बरोबर अकलूजच्या नागरिकांचे दरडोई उत्पन्न वाढविण्यासाठी प्रयत्न व्हावेत. अकलूज नगरपरिषदेच्या जाचक अटी व विविध प्रकारचे वाढवलेले कर व त्या करावर आकारले जाणारे व्याज हे अकलूजकरांसाठी डोकेदुखी ठरत आहे.त्यावर माळशिरस तालुक्यातील विद्यमान आमदार यांनी विधानसभेत आवाज उठवावा अशी अपेक्षा किशोरसिंह माने पाटील व्यक्त केली.

वाळू चोरीप्रकरणी वाहनचालकास शिक्षा

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

मंगळवेढा : ब्रह्मपुरी येथील भीमा नदीपात्रातून बेकायदा वाळू उपसा करून पर्यावरणास हानी पोहोचवणे व वाळूचोरी केल्याप्रकरणी मंगळवेढा न्यायालयाच्या न्यायाधीश एस. एन. गंगवाल-शहा यांनी ट्रॅक्टरचालक कालिदास दत्तात्रय पाटील (रा. ब्रह्मपुरी) याला दोषी धरून वाळू चोरीप्रकरणी तीन वर्षे साधी कैद व तीन हजार रुपये दंड आणि दंड न भरल्यास पंधरा दिवसांची साधी कैदेची शिक्षा सुनावली आहे. या कारवाईमुळे अवैध वाळू उपसा करणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली असून जे अवैध वाळू उपसा करणाऱ्यांवर कांही प्रमाणात आळा बसण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

Selected

सोलापुरात ज्येष्ठांसाठी विरंगुळा केंद्रांची उभारणी करणार

सोलापूर : आगामी काळात ज्येष्ठ नागरिकांसाठी अधिकाधिक सुविधा निर्माण करण्याचा निर्धार सोलापूर दक्षिण विधानसभा मतदार संघाचे भाजपचे आमदार सुभाष देशमुख यांनी व्यक्त केला. यावेळी त्यांनी सोलापुरात ज्येष्ठांसाठी विरंगुळा केंद्रांची उभारणी करण्याबाबत प्रयत्न सुरू असून ते पूर्णत्वाकडे नेण्यासाठी काम करण्याचे आश्वासन दिले. जुळे सोलापूर येथील द्वारकाधीश मंदिर येथे ज्येष्ठ नागरिकांसाठी आयोजित केलेल्या मॅरेथॉन स्पर्धेच्या बक्षीस वितरण सोहळ्यात आ. देशमुख बोलत होते. याप्रसंगी संदेश शहा, जयेश शहा, विलास मोरे आदी उपस्थित होते.

रोजगाराभिमुख शिक्षणाने विद्यार्थ्यांनी प्रगती साधावी

सोलापूर : नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरणात आपल्या आवडी व छंदाप्रमाणे शिक्षण घेण्याची संधी असून कौशल्य व रोजगाराभिमुख शिक्षण घेऊन विद्यार्थ्यांनी प्रगती साधावी, असे आवाहन पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे प्र-कुलगुरू प्रा. डॉ. लक्ष्मीकांत दामा यांनी केले. स्कूल कनेक्ट अभियानाचा प्रारंभ सोलापुरातील दयानंद महाविद्यालयातून करण्यात आला. यावेळी ते बोलत होते. यावेळी अंतर्गत गुणवत्ता कक्षाचे संचालक प्रा. डॉ. गौतम कांबळे यांच्यासह दयानंद शिक्षण संस्थेचे प्रशासक प्राचार्य डॉ. विजय उबाळे उपस्थित होते.

माळीनगर येथील रंजना देवकर यांना आदर्श शिक्षिका पुरस्कार

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

माळशिरस : माळीनगर येथील दि सासवड माळी एज्युकेशन सोसायटी संचलित प्राथमिक शाळा क्रमांक एक मधील शिक्षिका रंजना राजीव देवकर यांना राज्यस्तरीय आदर्श शिक्षिका पुरस्कार मिळाला आहे.तसेच राज्यस्तरीय काव्य लेखन स्पर्धेत त्यांनी सर्वोत्कृष्ट काव्याचा विशेष पुरस्कार पटकावत प्रथम क्रमांक मिळवून साहित्य क्षेत्रातही आपल्या प्रतिभेचा ठसा उमटवला आहे. अष्टपैलू संस्कृती कला अकादमी,मुंबई यांच्यावतीने आदर्श शिक्षिका पुरस्कार तर मासिक न्यायप्रभाततर्फे सर्वोत्कृष्ट काव्याचा पुरस्काराने त्यांना गौरविण्यात आले. सौ.देवकर यांची २९ वर्षाच्या सेवेत उपक्रमशील शिक्षिका म्हणून ओळख आहे.विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेस प्रोत्साहन देणे,समूहगीत गायन,स्पर्धा, अंवातर वाचन,परिसर भेट व सहली,नृत्य,वक्तृत्व स्पर्धा, कथाकथन,नाट्य,कविता,माझी शाळा सुंदर शाळा,माझी शाळा माझा अभिमान,क्रिडा व कौशल्ये,प्राणायम, योगा, कवायत,झाडे लावा झाडे जगवा,वाचन-लेखन आदी उपक्रमात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत त्यांनी हिरहिरीने सहभाग घेतला.तसेच त्यांनी 'निसर्ग' या विषयावर चारोळी लेखन, साप्ताहिक व मासिकांतून कविता लेखनही केले आहे. त्यांच्या यशाबद्दल संस्थाध्यक्ष राजेंद्र गिरमे,सचिव अजय गिरमे,उपाध्यक्ष नितीन इनामके,संचालक मंडळ व विश्वस्त,मुख्याध्यापक बाळकृष्ण कोळी यांनी अभिनंदन केले.

मारहाण प्रकरणी एकास साधी कैद

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

मोहोळ : मोहोळ तालुक्यातील टाकळी सिकंदर येथे राहत्या घरात शेताच्या रस्त्याच्या वादातून सहा जणांनी केलेल्या मारहाणीत एकास बेदम मारहाण करण्यात आली. राहुल मुकुंद बनसोडे (वय ३२ रा. टाकळी सिकंदर) असे जखमी झालेल्याचे नाव आहे. राहुल बनसोडे यास लोखंडी रॉड व लाथाबुक्क्यांनी मारहाण झाली. इजा पोहोचविल्या प्रकरणी तीन वर्षे साधी कैद व दोन हजार रुपये दंड, दंड न भरल्यास सात दिवस साधी कैद या दोन्ही शिक्षा एकत्रित भोगाव्याच्या असल्याचे म्हटले आहे.

उद्घाटन...

पंढरी संचार छायाचित्र सेवा

पंढरपूर : माळवणी (तालुका : पंढरपूर) येथील यल्लमा देवी (पाटील) समोर बांधण्यात आलेल्या पाण्याचे टाकीचे उद्घाटन शिवसेना जिल्हा प्रमुख तथा पंढरपूर पंचायत समिती सदस्य संभाजी शिंदे यांच्या शुभहस्ते करण्यात आले. याप्रसंगी सोसायटीचे माजी चेअरमन बाळासाहेब पाटील, अनिल पाटील, शिवसेना विभाग प्रमुख महेश इंगोले, देवीचे पुजारी लखन पाटील, दत्तात्रय शिंदे, बाळासाहेब पाटील, सोमनाथ पाटील, माजी ग्रामपंचायत सदस्य नवनाथ शिंदे, तानाजी पाटील, संजय पाटील, बाबा गवळी आदी यात्रा कमिटी सदस्य व देवीचे पुजारी उपस्थित होते.

महिला समृद्धी योजनेसाठी अर्ज करण्याचे आवाहन

सोलापूर : साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे विकास महामंडळ (मर्या.) मार्फत मांग, मातंग, मिनी-मादीग, मादींग, दानखणी मांग, मांग महाशी, मदारी, राधेमांग, मांग गारुडी, मांग गोराडी, मादगी व मादिगा या जातीतील समाज बांधवांसाठी विविध योजना राबविण्यात येतात. महिला समृद्धी योजनेचा लाभ घेण्यासाठी लाभार्थ्यांनी 10 जानेवारीपर्यत अर्ज सादर करावेत, असे आवाहन महामंडळाचे जिल्हा व्यवस्थापक आर. एच. चव्हाण यांनी केले आहे. तरी इच्छुकांनी डॉ. आंबेडकर सामाजिक न्याय भवन सभागृह, सात रस्ता, सोलापूर येथे अधिक माहितीसाठी संपर्क साधावा.

आमदार देशमुख यांनी दिली विकासाची ग्वाही

सोलापूर : मतदारांनी दाखवलेल्या विश्वासाला कायम ठेवण्यासाठी, मतदारसंघात विकासकामांद्वारे जनतेच्या अपेक्षांची पूर्तता करण्याचा पूर्ण प्रयत्न करेन, अशी ग्वाही सोलापूर दक्षिण विधानसभा मतदार संघाचे भाजपचे आमदार सुभाष देशमुख यांनी सांगितले. आमदार देशमुख यांनी आपल्या जनसंवाद दौऱ्यांतर्गत होनमुर्गी येथे भेट दिली. यावेळी ते बोलत होते. यावेळी संगप्पा केरके, हणमंत कुलकर्णी, चनगोंडा हाविनाळे, भीमाशंकर नरसगोंडे, गुरण्णा तेली, सुरेश तेली, महेश नरसगोंडे, यतीन शहा तसेच अनेक पदाधिकारी आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

सरते वर्ष आणि पुढील अपेक्षा !

"संकल्प आणि सिद्धी हे जीवनाचा अविभाज्य अंग असते. संकल्पावर विश्वास असायला हवा असतो तेंव्हा कृतीचा साक्षात्कार जीवनात उतरत असतो. हे मानव धर्माचे वैशिष्ट्य आहे. आज ३ जानेवारी २०२५ चा अंक वाचकांच्या हातात देताना सर्व वाचकांना शुभेच्छेचे कमलपुष्प अर्पण करत असताना एक आगळे-वेगळे समाधान वृत्तपत्रीय प्रवासात अनुभवायला आल्याशिवाय राहात नाही."

२०२४ हे पूर्ण वर्ष शेवट शेवट निवडणूकीच्या धावपळीत गेले आणि पूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेल्या संविधानाचा प्रत्यक्ष कृतीचा भाग आपण अनुभवला. राजसत्तेचा सारीपाट नशीबावरती अवलंबून नसतो, आर्थिक व्यवहारावर अवलंबून नसतो तर तो सामाजिक कर्तृत्वाचा आणि राष्ट्रनिष्ठेच्या प्रेमाचा एक अविभाज्य भाग असतो. दिल्लीतल्या सत्तेवर कोण बसलं किंवा महाराष्ट्रातील सत्तेवर कोण बसलं यावर चर्चा करण्यापेक्षा संविधानानी दिलेलेला आदेश देशानी आणि महाराष्ट्रानी तंतोतंत पाळून लोकशाहीची बळकटी अधिक दृढ करण्यास मदत केली. याबाबत ईव्हीएम किंवा मतपत्रिका यांच्यावरचा संशयकल्लोळ काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत आणि न्यायदेवतेपासून ते ग्रामसभेपर्यंत सर्वत्र कल्लोळ माजवून गेला. शेवटी न्यायदानाने न्याय दिला. आणि खऱ्या अर्थाने हा विषय, हा हल्लकल्लोळ शांत झाला. कुणी न्यायालयाला आव्हान दिले, कुणी निवडणूक यंत्रणेला दोषी ठरविले तर कोणी अन्य मार्गांनी या निवडणूक पद्धतीला दोषी ठरविले.

न्यायासमोर सगळे समान असतात. त्यामुळे सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाने लोकशाही मानणारांची मान झुकली पाहिजे हे सत्य वास्तवात आले. मागील वर्ष थोडेसे धकाधकीचे, गरमागरमीचे गेले. निसर्गानी कुठे अवेळी कोप केला, निसर्गाच्या काळाने धान खाऊन टाकले. फळ बेचव केली आणि धरणीमाता ग्राहीग्राही होत असतानाच जमिनीचा मालक संकटाच्या दरीत कोसळून पडला. हे सरत्या वर्षाचं वास्तव आहे. राजकारणातल्या अनेक गमती-जमती या मागील वर्षाने जशा पाहिल्या तशा यावर्षीच्या शुभारंभापासून अविचारी राजकारणाचे वास्तवाची निर्मिती होऊ नये असे गृहीत धरले तर त्याचे अपेक्षित उत्तर मिळू शकेल.

महाराष्ट्र सरकारच्यावतीने तरुणांच्या बेकार हातांना काम देण्याची अभिवचनं मोठ्या प्रमाणात देण्यात आली. जरुर थोडा फार परिणाम दिसून आला. पण बेकार हातांना काम मिळाल्याची अपेक्षा अल्प हाताना मिळाल्याचे दिसून आली हे मागील वर्षाचं वास्तव नाकारता येणार नाही. भारत देशात परकिय गुंतवणूक आणण्यात आमचे राज्य यशस्वी ठरल्याचा दावा करत असतानाच वस्तुस्थिती मात्र तशी समोर येताना दिसत नाही हेही वास्तव नाकारता येणार नाही. शिक्षण क्षेत्रात चाललेली बदला-बदल ही खऱ्या अर्थाने विद्यार्थ्यांच्या हिताची आहे का? याची पडताळणीही या वर्षारंभात अर्थात नवीन शैक्षणिक धारण अंमलात आणण्यापूर्वी यावर गंभीरपणे विचार होणे गरजेचे आहे. शेती मालाचा भाव आणि चढ-उतार या नैसर्गिक आपत्ती मायबाप असणाऱ्या शेतकऱ्यांना भोगावे लागल्याचे दृष्य समोर येत आहे. म्हणून केंद्र आणि राज्य सरकारने याबाबत सतर्क राहणे गरजेचे आहे असे वाटते. बेकार तरुणांना पंतप्रधान मुद्राच्या माध्यमातून केंद्र आणि राज्य सरकारच्या संमतीने विविध बँकांच्या माध्यमातून जाहीर केलेली योजना खऱ्या अर्थाने तरुणांच्या आशेला भरारी देणारी आहे का? याचा गांभीर्याने विचार होणे गरजेचे आहे. ज्यांचा कुणी वाली नाही दुर्दैवाने त्याला तो पतीत पावन विधातासुद्धा मदत करायला हतबल ठरतो आणि ज्या बेकार तरुणांचा हात वशिल्याच्या पदरापर्यंत घट्ट पकडला जातो तोपर्यंतच बँकेच्या अधिकाऱ्यांना त्याची जाणीव होऊ शकते हे वास्तव त्रिवार नाकारता येणार नाही.

गरजेपेक्षा ज्या राज्यात वशिला श्रेष्ठ मानला जातो अशा राज्यांनी आपल्या आर्थिक सुधारणांना अधिक बळ देताना गरजूंच्या क्षमतेचा आणि सहनशीलतेचा गांभीर्याने विचार करणे गरजेचे आहे. सरत्या वर्षात ज्या-ज्या तरुणांना बँकेकडे हात पसरुनसुद्धा रिकाम्या हातानी परत यावे लागले याची संख्या हजारो नव्हे तर लाखाच्या गुणात समोर आल्याशिवाय राहणार नाही.

पंतप्रधान मुद्रा योजना ही तरुणांच्या जीवनाला कलाटणी आणि आधार देणारी योजना आहे. पण प्रत्येक बँकेच्या माध्यमातून तरुणांच्या पदरात जी निराशा पडते ती निश्चित अशी अक्षम्य आहे. धादांत खोटं बोलायचं. दिवसामागून दिवस रेटत न्यायाचे आणि रिकाम्या हाताने बँकेच्या पायरीजवळ नतमस्तक होऊन परत फिरायचे. याचे भान आर्थिक मदत देणाऱ्या सरकारनी ठेवायचे की नाही हा गंभीर प्रश्न आहे. ज्या लाडक्या बहिनींनी तुम्हाला यश मिळूवन दिले.

सत्तेच्या खुर्चीवर बसविले त्या माता-भगिनीवर शहरात आणि ग्रामीण भागात होणारे अत्याचार मन सुन्न करुन टाकणारे वाटतात. बालकुमारीला येथेच्छ भोगायचे आणि तिला मारुन रस्त्यावर टाकायचे या नादान, कामवासनेनी धुंद झालेल्यांची संख्या सातत्याने वाढताना दिसत आहे. कुणाचा तपास होतो तर कुणाचा तपास बासनात गुंडाळला जातो. ज्यांच्या घरचं लेकरु जीवानिशी गेलंय ते शल्य आयुष्यभर त्या कुटुंबाच्या मनात घर करुन बसतं. हे सरत्या वर्षातलं वास्तव भीषण व भयानक असे आहे. व्यापार, उदीम याबाबत व्यापाऱ्यांना योग्य ती संधी उपलब्ध होत असली तरी भावाच्या चढ-उताराने त्यांच्या व्यवसायात सुद्धा अस्थिरता निर्माण होताना दिसते.

सरत्या वर्षांनी माणुसकीला काळीमा लावणाऱ्या ज्या घटना घडल्या त्याची पुर्नरावृत्ती काल प्रारंभ झालेल्या नव्या वर्षात दिसून येऊ नये ही सामान्यांची अपेक्षा आहे. राजकारणात कर्तृत्वापेक्षा, सामाजिक भावना आणि कर्तव्याला मुठमाती देणारे प्रकार वर्षाच्या शेवटच्या आठ-दहा दिवसात बीड येथे झालेल्या प्रकरणावरुन दिसून आले. राजकारणात स्थिर व्हायचे असेल तर सत्तेचा आनंद लुटायचा असेल तर चार टगे आणि गुंड जवळ बाळगावे लागतात ही आता राजकारणाची औपचारिकता झाली आहे. हे बीडच्या मस्तवाल, रगेल, नालायक राजकारण्यांवरुन दिसून येते. असे प्रकार आजपासून सुरु होणाऱ्या नवीन वर्षात घडू नये. दृष्कृत्य गाडून टाकली जावीत ही सामान्यांची अपेक्षा आहे. आपण आशा करु या याला प्रतिसाद मिळेल आणि जनतेच्या अपेक्षा पूर्ण होतील. येणारे वर्ष प्रत्येक कुटुंबाला समाधानाचे, राज्याला भरभराटीचे आणि राष्ट्राला स्वाभिमान संपन्नतेचे जावो अशी अपेक्षा व्यक्त करुन पुन्हा सर्व वाचकांना नूतन वर्षाच्या शुभेच्छा !

****

प्रासंगिक

बाळासाहेब बडवे

(संपादक)

मो.नं.7028543453

जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धेत माळशिरस तालुक्यातील गुरसाळे शाळा जिल्ह्यात प्रथम

माळशिरस : मंगळवेढा येथे झालेल्या जिल्हा स्तरीय क्रीडा स्पर्धेत कबड्डी खेळ प्रकारात जिल्हा परिषद प्राथमिक शाळा गुरसाळे तालुका माळशिरस जिल्हा सोलापूर येथील मुलींच्या संघाने अत्यंत अटीतटीच्या अंतीम सामन्यात पापरी तालुका मोहोळ संघाचा जिद्दीने खेळ करुन जिल्हा स्तरीय प्रथम क्रमांक पटकावला.या संघात पूजा संतोष चव्हाण, सोनम शहाजी पवार ,सिद्धी गणेश घाडगे ,समृद्धी सचिन चव्हाण ,रिया श्रीराम झेंडे,अनुष्का अंबादास रणदिवे,आसावरी अनिल बोडरे,भक्ती मिथुन झेंडे,श्वेता सोमनाथ रायते,स्नेहा संजय कोरटकर,स्वरांजली अजित माने, सिद्धी महेश रायते या सर्व खेळाडू मुली,मार्गदर्शक शिक्षक ,पालक ,ग्रामस्थ यांचे हार्दिक हार्दिक अभिनंदन ,विजयी खेळाडू संघाचा,मार्गदर्शक शिक्षकांची ग्रामस्थांनी भव्य अशी मिरवणूक काढून सत्कार करण्यात आला .गटशिक्षणाधिकारी प्रदीप करडे साहेब ,शिक्षण विस्ताराधिकारी सुषमा महामुनी मँडम,केंद्रप्रमुख मधुकर वनसाळे सर यांनी मुलींची तसेच शाळेचा गौरव व कौतुक केले तसेच शाळा व्यवस्थापन समितीने सन्मान केला .

सोलापूर : सोलापूर डिस्ट्रिक्ट लेबर सोसायटीज को - ऑफ. फेडरेशन ली. सोलापूर या संस्थेच्या संचालक मंडळावर राज्य फेडरेशन प्रतिनिधी म्हणून निवड झाल्याबद्दल अभिराज शिंदे यांचा सोलापूर शहर काँग्रेसचे अध्यक्ष चेतन नरोटे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी माजी नगरसेवक विनोद भोसले, तिरूपती परकीपंडला, मयूर खरात, विनोद क्षीरसागर, सुभाष वाघमारे, धीरज खंदारे, महेंद्र शिंदे आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्र राज्य पत्रित नागरी सेवा पूर्व

परीक्षेत २०२४ च्या पदसंख्येत वाढ करावी - आ. अभिजीत पाटील

■ पंढरीसंचार न्यूज नेटवर्क

पंढरपूर : राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांची मुंबईच्या सह्याद्री अतिथीगृह येथे माढाचे आमदार अभिजीत पाटील यांनी भेट घेऊन महाराष्ट्र राजपत्रित नागरी सेवा पुर्व परीक्षा-२०२४ च्या पदसंख्येत वाढ होण्यासंदर्भात निवेदन दिले. सन २०२४ यावर्षी महाराष्ट्र राजपत्रित नागरी सेवा पूर्व परीक्षेअंतर्गत होणारी राज्यसेवा परीक्षा ही वस्तुनिष्ठ पध्दतीची शेवटची परीक्षा असून लाखो विद्यार्थी सदरची परीक्षा त्यांच्यासाठी शेवटची संधी म्हणून पहात आहेत.. सध्या या राज्यसेवा २०२४ साठी शासनाकडून ४५७ पदांची मागणी पत्रे आयोगाला पाठविण्यात आली आहेत. परंतु लाखो विद्यार्थी शेवटची संधी म्हणून प्रयत्न करीत असतांना ही पदसंख्या अपुरी आहे. राज्यसेवा २०२२ साठी ६२३ पर्यंत पदसंख्या वाढवून सरकारने विक्रम केला होता. त्याच पध्दतीने राज्यसेवा २०२४ साठी देखील सर्व विभागांची अतिरिक्त मागणी पत्रे पाठवून पद संख्येत वाढ व्हावी अशी स्पर्धा परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांची मागणी आहे. राज्यसेवा परीक्षे मधील वर्ग-१ व वर्ग-२ या पदांची एकूण ३५ संवर्ग

येतात. त्यामधील १६ संवर्गातील एकाही पदाचा समावेश यावर्षीच्या जाहिराती मध्ये नाही. तसेच उपशिक्षणाधिकारी या पदाच्या ३४७ जागा रिक्त असल्याचे समजते, यातील किमान १०० जागांचा तरी यावर्षीच्या जाहिरातीमध्ये समावेश करण्यात यावा व उर्वरित १५ संवर्गातील पदे देखील वाढवून सदर विद्यार्थ्यांना न्याय देणे गरजेचे आहे. त्यामुळे राज्यसेवा २०२४ च्या जाहिरातीसाठी एक अखेरची वेळ सर्व विभागाकडून अतिरिक्त मागणी पत्रे मागवून घेण्याबाबत सामान्य प्रशासनास तसे निर्देश दिले जावे या संदर्भात आमदार अभिजीत पाटील यांनी सविस्तर चर्चा केली..

औषध प्राशन केल्याने तरुणाचा उपचारामध्ये मृत्यू

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

सांगोला : दारूच्या आहारी गेलेल्या ३६ वर्षीय तरुणाने राहत्या घरी विषारी औषध प्राशन केल्याने सांगोला ग्रामीण रुग्णालयात उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. ही घटना सोमवारी मध्यराञ्रीच्या सुमारास अनकढाळ (ता. सांगोला) येथे घडली. सचिन मुरलीधर बंडगर (वय ३६ रा. अनकढाळ, ता. सांगोला) असे मृताचे नाव आहे. याबाबत सचिन बंडगर हा खासगी वाहनावर चालक म्हणून नोकरी करत होता. त्याच्या हातून अपघात घडल्यामुळे तो मानसिक तणावाखाली येऊन दारूच्या आहारी गेला होता.

» पान १ वरुन

नामदेव पायरी येथे सामूहिक आरतीला....

वारकरी मंडळी आणि भाविक उपस्थित होते.

२४ आणि २५ डिसेंबर २०२४ ला श्री साई पालखी निवारा, निमगांव, शिर्डी येथे झालेल्या तृतीय 'महाराष्ट्र मंदिर न्यास परिषदे'त महाराष्ट्रभरातून ८७५ हून अधिक निमंत्रित मंदिराचे विश्वस्त, प्रतिनिधी, पुरोहित, मंदिरांच्या रक्षणासाठी लढा देणारे अधिवक्ते तथा मंदिर अभ्यासक सहभागी झाले होते. यात प्रामुख्याने मंदिरे, तसेच मंदिरांच्या भूमींवर झालेल्या अतिक्रमणाच्या विरोधात दर आठवड्यातून एकदा 'मंदिर तेथे सामूहिक आरती' करणे, काशी आणि मथुरा तीर्थक्षेत्रांचा खटला जदलगती न्यायालयात चालवावा; सरकारने राज्यातील सर्व मंदिरे सरकारमुक्त करून ती भक्तांच्या स्वाधीन करावीत; मंदिरात भक्तांनी अर्पण केलेला निधी महाराष्ट्र सरकारने विकासकामांसाठी न वापरण्याची घोषणा करावी; मंदिर परिसर 'मद्य-मांस मुक्त' होण्यासाठी सरकारने अधिसूचना काढावी; राज्यातील मंदिरांच्या पुजाऱ्यांना प्रतिमाह मानधन देण्याचा निर्णय घ्यावा आदी प्रमुख मागण्या ठरावांद्वारे सरकारकडे करण्यात आल्या होत्या. या मागण्या सरकारने तात्काळ पूर्ण करव्यात, अशी मागणी मंदिर महासंघाचे श्री. विनोद रसाळ आणि हिंदु जनजागृती समितीचे श्री. राजन बुणगे यांनी केली आहे.

जिवे ठार मारण्याचा कट...

कबुल केले असल्याने त्यांचेवर पंढरपुर शहर पोलीस ठाणे गु.र.नं.७७८/२०२४ महा. पोलीस कायदा कलम १३५ व बी.एन.एस २०२३ चे कलम ३ (५) ६१(२) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मिळुन आलेल्या आरोपींची नावे-

१) सुखदेव खशाबा दिडवाघ रा शिक्षक कॉलनी, म्हसवड ता मान जि सातारा,
२) करण बच्चाराम मदने रा भवानी पेठ खटाव ता खटाव जि सातारा, ३) दिपक दत्तु रूपनवर रा धुळादेव जि सातारा

जप्त करण्यात आलेले हत्यार

१) ०१ स्टीलचा रामपुरी धारदार चाकु
२) ०१ धारदार तलवा
३) ०१ गावठी ७.६५ एमएमची पिस्टल व ०३ जिवंत काडतुसे
४) ०१ पांढरे रंगाची स्वीफ्ट कार, मागे नंबर प्लेट नसलेली, पुढे कमांक एमएच ०६ एडब्ल्यु १३५५

सदरची कामगीरी ही मा. पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी, मा. अपर पोलीस अधिक्षक श्री. प्रितमकुमार यावलकर, उपविभागीय पोलीस अधिकारी पंढरपूर विभाग श्री.डॉ. अर्जुन भोसले, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पंढरपूर शहर पोलीस ठाणे श्री. विश्वजीत घोडके यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण शाखेचे सहायक पोलीस निरीक्षक श्री आशिष कांबळे, सपोफौ राजेश गोसावी, सपोफौ शरद कदम, पोह ३९६ सुरज हेंबाडे, पोह १७८९ सचिन हेंबाडे, पोह २२१ प्रसाद औटी, पोह १२५५ विठ्ठल विभुते, पोह १६५७ दादा माने, पोशि १२१६ शहाजी मंडले, पोशि २१९० समाधान माने, पो.कॉ १५१३ बजरंग बिचुकले, पोकॉ १९०४ निलेश कांबळे, चालक पोका ५०३ बडे तसेच सायबर शाखा सोलापुर ग्रामीणचे पो.शि रतन जाधव यांनी केली आहे.

'एमएएच-एमसीए -सीईटी २०२५' करिता ऑनलाईन फॉर्म भरण्याची प्रक्रिया सुरू

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

पंढरपूर : शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये पदव्युत्तर पदवी असलेल्या एमसीए च्या प्रवेशाकरिता प्रवेश पूर्व परीक्षा देणे बंधनकारक आहे. यासाठी राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांच्या वतीने घेण्यात येणाऱ्या 'एमएएच-एमसीए-सीईटी- २०२५' या प्रवेश परीक्षेसाठी ऑनलाईन रजिस्ट्रेशन आणि कन्फर्मेशन करण्याची प्रक्रिया बुधवार, दि.२५ डिसेंबर २०२४ पासून ते शनिवार, दि.२५ जानेवारी २०२५ पर्यंत सुरु राहणार आहे. पदवी उत्तीर्ण झालेल्या व पदवीच्या अंतिम वर्षात शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांसाठी एमएएच एमसीए-सीईटी २०२५ साठी ऑनलाईन फॉर्म भरण्याची मोफत सुविधा स्वेरीतील एमसीए विभागात उपलब्ध करण्यात आली आहे.' अशी माहिती स्वेरीचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (ऑटोनॉमस)चे प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे यांनी दिली.

पदव्युत्तर पदवी असलेल्या एमसीए च्या प्रवेशाकरीता अत्यंत महत्वपूर्ण समजली जाणारी 'एमएएच-एमसीए-सीईटी २०२५' ही परीक्षा साधारण मार्च २०२५ दरम्यान होणार आहे. एमसीएच्या या परीक्षेसाठी फॉर्म भरण्याची प्रक्रिया बुधवार, दि.२५ डिसेंबर २०२४ पासून ते शनिवार, दि.२५ जानेवारी २०२५ (रात्री.११.५९) पर्यंत पर्यंत चालणार आहे. या प्रवेश परीक्षेच्या संदर्भात अधिक माहीतीसाठी WWW.MAHACET.ORG या शासनाच्या अधिकृत संकेत स्थळावर तसेच स्वेरी अभियांत्रिकीच्या प्रवेश प्रक्रियेचे अधिष्ठाता डॉ.करण पाटील (मोबा. नंबर-९५९५९२११५४) व एमसीएचे विभागप्रमुख प्रा.मनसब शेख (मोबा. नं.९०२८९०७३६७) यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे.

आत्मजा घोडकेची राष्ट्रीय बुद्धिबळ स्पर्धेसाठी निवड

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

बार्शी: बार्शीतील बी. पी. सुलाखे महाविद्यालयाच्या बी. सी. ए. तृतीय वर्षात शिक्षण घेत असलेल्या

आत्मजा घोडके हिने आपल्या कठोर मेहनतीच्या जोरावर वेस्ट झोन राष्ट्रीय बुद्धिबळ स्पर्धेसाठी निवड मिळवली आहे. ही स्पर्धा 1 ते 5 जानेवारीदरम्यान साम ग्लोबल विद्यापीठ, भोपाळ, मध्य प्रदेश येथे होणार असून, देशातील विविध राज्यांतील कुशल खेळाडू या स्पर्धेत सहभागी होणार आहेत.

जानयज्ञाची सांगता...

पंढरी संचार छायाचित्र सेवा

पंढरपूर : महाराष्ट्रातील ख्यातनाम श्रीमद भागवत कभाकार भागवताचार्य भक्तराज महाराज कानशिवणीकर अकोला यांचा भागवत कथा ज्ञानयज्ञाची सांगता बुधवारी भक्तीमय वातावरणात पार पडला. गेल्या सात दिवसापासून रेल्वे स्टेशनजवळील गणपती मंदिरात सुरु असलेला हा यज्ञ ऐकण्यासाठी अनेक भाविक आत्मीयतेने उपस्थित होते.

पंढरीत सुरु असलेल्या भागवत कथा ज्ञानयज्ञाची सांगता

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

पंढरपूर : महाराष्ट्रातील ख्यातनाम श्रीमद भागवत कभाकार भागवताचार्य भक्तराज महाराज कानशिवणीकर अकोला यांचा भागवत कथा ज्ञानयज्ञाची सांगता बुधवारी भक्तीमय वातावरणात पार पडला. गेल्या सात दिवसापासून रेल्वे स्टेशनजवळील गणपती मंदिरात सुरु असलेला हा यज्ञ ऐकण्यासाठी अनेक भाविक आत्मीयतेने उपस्थित होते. या ज्ञानयज्ञ समारंभाचे आयोजन ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते अशोक बा. कुलकर्णी व सौ.अनुराधा अशोक कुलकर्णी यांनी केले होते.

Selected

बार्शीत तुरीची आवक वाढल्याने यंदा दर कमी

बार्शी : बार्शी कृषी उत्पन्न बाजार समितीत तुरीची आवक मागील वर्षीच्या तुलनेत यंदा वाढली असून, यंदाही दररोज ५ कट्टे आवक होत आहे. मात्र, यंदा मागील वर्षीच्या तुलनेत दर क्विंटलमागे ५०० ते १, ००० रुपये कमी आहेत. पांढऱ्या तुरीला ६, ८००- ७, ५००, तांबडी ६, ६००-७, ४००, काळी ८, ००० ८, ६०० दर मिळत आहे. सुरुवातीला ही ८, ०००-८, ५०० दर होता. मागील वर्षी तो ९, ५०० क्विंटल होता. यंदा आवक वाढल्याने दर मागील वर्षीच्या तुलनेत २, ००० रुपयांनी, तर यंदा १ हजार रुपयांनी कमी आले असल्याचे खरेदीदार सचिन मडके यांनी सांगितले.

शिक्षणशास्त्र अभ्यासक्रमाच्या सीईटी ऑनलाईन अर्ज नोंदणी प्रक्रियेला प्रारंभ

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

पंढरपूर : श्री पांडुरंग शिक्षण प्रसारक मंडळ पंढरपूर संचलित उमा शिक्षणशास्त्र महाविद्यालय पंढरपूर येथे बी. एड अभ्यासक्रमाची सीईटीची २०२५ -२६ ऑनलाइन नोंदणी प्रक्रियेला सुरुवात झालेली आहे. राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या वतीने शिक्षक - शिक्षण अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी सीईटी परीक्षेचे आयोजन करण्यात येते. शैक्षणिक वर्ष २०२५ -२६ या प्रवेशासाठी देखील सीईटी २०२५ परीक्षेचे २४, २५ आणि २६ मार्च २०२५ रोजी आयोजन करण्यात येणार आहे. सीईटी २०२५ परीक्षेसाठी ऑनलाईन नोंदणीसाठी HTTPS://CETCELL.MAHACET.ORG ही वेबसाईट उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. उमा शिक्षणशास्त्र महाविद्यालयाच्या वतीने सीईटी परीक्षेच्या संदर्भात मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन करण्यात येणार आहे. सीईटी संदर्भात आवश्यक ती सर्व सविस्तर माहिती व मार्गदर्शन महाविद्यालयात उपलब्ध करून दिले जात आहे. बी. एड सीईटी अर्ज ऑनलाइन सादर करण्याची अंतिम मुदत २८ जानेवारी २०२५ आहे. इच्छुक विद्यार्थ्यांनी तात्काळ महाविद्यालयाशी संपर्क साधावा असे आव्हान उमा शिक्षण संकुलाचे कार्यवाह, प्राचार्य डॉ. मिलिंद परिचारक, संकुलाचे जनसंपर्क अधिकारी श्री. सूर्यकांत पारखे आणि महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. विदुलता पांढरे व प्रवेश समिती यांच्यावतीने करण्यात आले आहे.

दादांसोबत राहणार की भाजपमध्ये जाणार

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

माढा : माढा विधानसभा निवडणुकीत रणजितसिंह शिंदे यांच्या पराभवानंतर बबनराव शिंदे गटाचे कार्यकर्ते शांत राहिले होते. नुकतेच पार पडलेल्या मेळाव्यात कार्यकर्त्यांनी वेगवेगळी भूमिका मांडली. महिना भरानंतर झालेल्या या मेळाव्यात अनेकांनी पराभवाची

कारणे मांडली. यापुढील काळात कोण विधानपरिषदेवर घेतील, त्यांच्यासोबत जाण्याचा विचार काही लोकांनी मांडला. त्यावर माजी आमदार बबनराव शिंदे म्हणाले, याबाबत आणखी काहीही ठरले नाही. योग्य वेळी बोलू, आता सध्या आगामी निवडणुकीसाठी कार्यकर्त्यांसोबत राहणार आहे.

जलसंपदा विभाग शासन निर्णय क्रमांक निविदा ०४१७/प्र.क्र.२४७/मो.प्र.-१ दिनांक-१८/१०/२०२३ परिशिष्ट-४

महाराष्ट्र शासन

कार्यकारी अभियंता, भीमा विकास विभाग क्रमांक-२ सोलापूर यांचे कार्यालय मोहितेनगर, आयकर भवन शेजारी, होटगी रोड, सोलापूर- ४१३००३

निविदा सुचना क्रमांक १२ सन २०२४-२५

महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता, भीमा विकास विभाग क्र. २ सोलापूर जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन हे सक्षम निविदाकारांकडून खालील कामाकरिता ब-१ नमुन्यातील निविदा मागवित आहेत. सविस्तर निविदा सुचना शासनाच्या http://wrd.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर व विभागीय कार्यालयाच्या सुचना फलकावर उपलब्ध आहे.

निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, भीमा विकास विभाग क्र.२, सोलापूर यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही. सदर निविदा सुचनेमध्ये कांही बदल होत असल्यास विभागीय कार्यालयाच्या सुचना फलकांवर उपलब्ध करुन देण्यात येईल.

कामाचे नांव	: भीमा पाटबंधारे उपविभाग तुंगत अंतर्गत भीमा पाटबंधारे शाखा क्र. १५ तारापूर येथे खरीप रब्बी व उन्हाळा या कालावधी करीता सिंचन व्यवस्थापन व कार्यालयीन कामाच्या मुदतीसाठी अर्ध कुशल मजूरांची नियुक्ती करणे व JCB या प्रकाराचे यंत्र बाह्य यंत्रणेव्दारे पुरवठा करण्याचे काम सन २०२४-२५.
जिल्हा	: सोलापूर
निविदेची किंमत रुपये	: ८,१७,३१२/-
१. निविदा उपलब्ध कालावधी	: दि. ०२.०१.२०२५ ते दि. ०९.०१.२०२५
२. निविदा सादर कालावधी	: दि. १०.०१.२०२५ ते दि. १३.०१.२०२५
३. निविदा उघडण्याचा दिनांक	: दि. १४.०१.२०२५ रोजी

जा.क्र.भीविवि-२/लेशा-४/४५४२/२०२४
भीमा विकास विभाग क्र. २,
सोलापूर दि. २४ डिसें.२०२४

सही/-
(सं.ज.माने)
कार्यकारी अभियंता
भीमा विकास विभाग क्र.२,
सोलापूर

जिमाका/सो/जाहि/२४७/२०२४-२५

संपादकीय विशेष

संकटात अमेरिका

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी अमेरिकेला पुन्हा एकदा महान राष्ट्र बनवण्याचे जाहीर केले आहे. याचा अर्थ सध्या अमेरिका महान राष्ट्र नाही, असाही काढला जाऊ शकतो. अर्थात ट्रम्प वीस तारखेला शपथ घेऊन अध्यक्षपदी येतील, तेव्हा त्यांच्यापुढे काय वाढून ठेवले आहे, याची चुणूक मावळत्या वर्षाला निरोप देताना आणि नववर्षाचा जल्लोष साजरा करीत असतानाच्या तीन घटनांतून दिसली आहे.

डोनाल्ड ट्रम्प येत्या काही दिवसांत पुन्हा एकदा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष बनणार आहेत. आपल्या निवडणुकीच्या प्रचारांत त्यांनी देशाला पुन्हा महान बनवण्याचे आश्वासन दिले; पण देशाचे वाढते कर्ज यामध्ये सर्वात मोठा अडथळा आहे. २०२५ हे वर्ष अमेरिकन अर्थव्यवस्थेसाठी वाईट काळ घेऊन येऊ शकते. कारण जगातील सर्वात मोठी अर्थव्यवस्था मंदीत जाण्याचा धोका आहे. वाढते कर्ज आणि बाजारातील असमतोलामुळे अमेरिकन अर्थव्यवस्थेत मंदी येण्याची शक्यता बळावली असून 'स्मॉलकेस' या एक अग्रगण्य गुंतवणूक धोरण मंचाने केलेला एक अभ्यास अमेरिकनांची झोप उडवणारा आहे. या संस्थेने अमेरिकच्या अर्थव्यवस्थेबद्दल चिंता व्यक्त केली आहे. 'स्मॉलकेस'च्या अभ्यासानुसार, सतत वाढणारे कर्ज आणि बाजारातील असंतुलन यामुळे अमेरिकेची अर्थव्यवस्था मंदीच्या गर्तेत सापडू शकते. रोखे, बिटकॉइन्स, कर्ज गुंतवणूक आणि स्टॉक्समध्ये ज्या प्रकारची वाढ दिसून आली, ती कोरोनाच्या काळातील टाळेबंदीदरम्यान दिसलेल्या वेडेपणाचे प्रतिबिंब आहे. अमेरिकेच्या अर्थव्यवस्थेला मंदीचा धोका असताना सोने आणि चांदीमधील गुंतवणूक सर्वात सुरक्षित गुंतवणूक म्हणून उदयास आली आहे. अमेरिकेच्या सरकारचे कर्ज ३६ ट्रिलियन डॉलर्सच्या पुढे गेले आहे. जगातील सर्वांत मोठ्या अर्थव्यवस्थेवर भारताच्या दहापट कर्ज आहे. कर्जावरील व्याजाची परतफेड करण्यासाठी खर्च होणारा पैसा देशाच्या संरक्षण आणि आरोग्य बजेटपेक्षा जास्त आहे. आता फक्त सामाजिक सुरक्षा बजेट व्याजाच्या रकमेपेक्षा जास्त असून हीच परिस्थिती कायम राहिल्यास पुढील तीन वर्षांत अमेरिकन सरकारचे सर्वात मोठे दायित्व हे व्याज असेल. या अभ्यासानुसार, अनेक आर्थिक निर्देशकांनी अमेरिकेत मंदीच्या शक्यतेबद्दल चिंता व्यक्त केली आहे. २०१० नंतर प्रथमच क्रेडिट कार्ड पेमेंट विलंब चार टक्क्यांपेक्षा जास्त असेल. वाढत्या आर्थिक संकटाच्या दबावमुळे ग्राहकांचा खर्च कमी झाला आहे. हे संकेत आर्थिक चढउतार खूप जास्त असल्याचे निदर्शक आहेत. मंदीच्या काळात सोन्याच्या गुंतवणुकीने शंभर टक्के तर, चांदीच्या गुंतवणुकीने ३०० टक्के परतावा दिला आहे. १९७३-७५, १९९९-२००० आणि २००८-०९ तसेच कोविड काळातही सोने आणि चांदीने उत्कृष्ट परतावा दिला होता. गेल्या ३१६ दिवसांत अमेरिकेच्या कर्जात ६.३ अब्ज डॉलर्स म्हणजेच सुमारे ५३१ अब्ज ९४ कोटी ८५ लाख ७८ हजार ४९० रुपये दररोज वाढ झाली आहे. याचा अर्थ प्रत्येक अमेरिकन नागरिकावर एक ६लाख आठ हजार डॉलरचे कर्ज आहे. कोरोना सुरू झाल्यापासून अमेरिकेचे कर्ज सुमारे १६ ट्रिलियन डॉलरने वाढले आहे. अमेरिकेच्या इतिहासात सरकारला इतके कर्ज घ्यावे लागण्याची ही पहिलीच वेळ आहे.

गेल्या २४ वर्षांत अमेरिकेचे कर्ज सहा पटीने वाढले आहे. २००० मध्ये अमेरिकेवर ५.७ ट्रिलियन डॉलर्सचे कर्ज होते. २०१० मध्ये ते १२.३ ट्रिलियन डॉलर आणि २०२० मध्ये २३.२ ट्रिलियन डॉलर होते. अमेरिकन काँग्रेसच्या बजेट दस्तावेजानुसार, पुढील दशकापर्यंत देशाचे कर्ज ५४ ट्रिलियन डॉलरपर्यंत पोहोचण्याचा अंदाज आहे. देशाचे कर्ज जीडीपीच्या १२५ टक्के आहे. अमेरिकेला दररोज १.८ अब्ज डॉलर्सपेक्षा जास्त व्याज भरावे लागत आहे. सरकारचे उत्पन्न घटत असून खर्च वाढल्याचे स्पष्ट झाले आहे. कर्ज धोकादायक पातळीवर पोहोचले आहे. देशाच्या अर्थव्यवस्थेसाठी आणि राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टीने ही चांगली बाब नाही. अमेरिकेचे कर्ज व जीडीपी गुणोत्तर पुढील काही वर्षांत २०० टक्क्यांपर्यंत पोहोचू शकते. म्हणजे देशाचे कर्ज अर्थव्यवस्थेच्या दुप्पट होईल. असे झाले तर कर्ज फेडताच अमेरिकेची अर्थव्यवस्था कोलमडून पडेल. यामुळे सरकारला संशोधन आणि विकास, पायाभूत सुविधा आणि शिक्षणावर होणाऱ्या एकूण खर्चापेक्षा व्याज भरण्यासाठी जास्त पैसा खर्च करावा लागणार आहे. देशाची अर्थव्यवस्था सुस्थितीत असताना अमेरिकेचे कर्ज वाढत आहे, ही चिंतेची बाब आहे. सामान्यतः, जेव्हा अर्थव्यवस्था कमकुवत होते, तेव्हा सरकार विकासाला चालना देण्यासाठी खर्च वाढवते. वाढत्या कर्जामुळे देशात पुन्हा एकदा नोटाबंदीची परिस्थिती निर्माण होऊ शकते. कर्जाबाबत रिपब्लिकन आणि डेमोक्रॅट या दोन्ही पक्षांमध्ये अनेकदा वाद होतात; पण वस्तुस्थिती अशी आहे, की दोन्ही पक्षांच्या कार्यकाळात देशाचे कर्ज वाढले आहे. त्याचा परिणाम देशाच्या पतमानांकनावरही दिसू लागला आहे. गेल्या वर्षी ऑगस्टमध्ये 'फिच'ने अमेरिकेच्या सार्वभौम कर्जाचे रेटिंग एए+ वरून एएए केले होते. 'मूडीज'ने तर अमेरिकेला एएए कमी करण्याचा इशारा दिला होता. गेल्या वर्षी जूनमध्ये अमेरिका पहिल्यांदाच डिफॉल्टच्या उंबरठ्यावर पोहोचली होती आणि ही परिस्थिती पुन्हा एकदा निर्माण होत आहे. अमेरिकेत वाढत्या खर्चाला आळा घालण्यासाठी सरकारी नोकऱ्यांमध्ये मोठी कपात होऊ शकते. ट्रम्प यांनी सरकारी खर्चात कपात करण्यासाठी आणि सरकारी कार्यक्षमता वाढवण्यासाठी सरकारी कार्यक्षमता विभाग हा नवीन विभाग तयार करण्याची घोषणा केली आहे. त्याची कमान जगातील सर्वात श्रीमंत एलॉन मस्क आणि विवेक रामास्वामी यांना देण्यात आली आहे. ट्रम्प यांचा प्रचार करताना मस्क यांनी सरकारच्या बजेटमधील अब्जावधी डॉलर्स वाचवू शकतात, असे म्हटले होते. त्यांनी सरकारी खर्चात कपात करण्याची भाषा केली आहे. यामध्ये सार्वजनिक प्रसारण आणि गर्भपात हक्क गटांना दिलेले पैसे समाविष्ट आहेत.

एकीकडे ही स्थिती असताना अमेरिकेत दहशतवाद पुन्हा डोके वर काढतो, की काय असे नववर्षाच्या आनंदोत्सवातील घटनेवरून वाटायला लागले आहे. एक भरधाव ट्रक गर्दीत घुसवून अनेकाना चिरडण्यात आले. त्यात दहा जणांचा मृत्यू झाला असून, ३० हून अधिक जण जखमी झाले आहेत. ही घटना मध्यरात्री सव्वाबारा वाजण्याच्या सुमारास बोर्बन स्ट्रीट आणि इबरविले स्क्वेअर येथे घडली. हे कॉम्प्लेक्स नाईट लाईफसाठी प्रसिद्ध आहे. ट्रकचालकाने गर्दीवर गोळीबार केला. न्यू ऑर्लिन्स पोलिसांनी संशयितावर गोळीबार केला. स्थानिक पोलिस अधिकारी अपघात आणि गोळीबाराच्या घटनेचा तपास करत आहेत. सध्या तिथे आपत्कालीन सेवा दल तैनात आहे. पोलिसांकडून महत्त्वाचे पुरावे गोळा केले जात आहेत. संशयित आरोपींबाबत अद्याप कोणतीही माहिती समोर आलेली नाही. अपघात आणि गोळीबारानंतर परिसरातील सुरक्षा वाढवण्यात आलेली आहे. अमेरिकन गुप्तचर संस्थेच्या नाकावर टिच्चून हा प्रकार झाला असून, दहशतवाद्यांनी तो केला असण्याची शक्यता आहे. तिसरी घटनाही अशीच चिंता वाटायला लावणारी आहे. चीनच्या हॅकर्सनी अमेरकेची सायबर सुरक्षा भेदली आहे. ट्रेझरी विभागाच्या संगणक सुरक्षेचा या महिन्यात भंग झाला. अमेरकेच्या ट्रेझरी विभागाने ही मोठी घटना असल्याचे सांगत चीनी हॅकर्सनी डॉक्युमेंट्सची चोरी केली असल्याचे म्हटले आहे. अमेरकेतील खासदारांना पाठवलेल्या एका पत्रानुसार, हा सुरक्षेचा भंग एका थर्ड पार्टी सायबर सुरक्षा सेवा देणाऱ्या 'बियॉन्ड ट्रस्ट'च्या माध्यमातून झाला आहे. हॅकर्स 'बियॉन्ड ट्रस्ट'द्वारे वापरण्यात येत असलेल्या एक महत्वपूर्ण सुरक्षेपर्यंत पोहोचले. तिथे त्यांना अवर्गीकृत दस्तावेजांचा ॲक्सेस मिळाला. या पत्रानुसार, हॅकर्सनी ट्रेझरी डिपार्टमेंटल ऑफिसेस (डीओएस) यूजर्सच्या तांत्रिक साहाय्य प्रदान करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या क्लाउड आधारित सेवेमध्ये प्रवेश करण्यासाठी वेंडरद्वारे वापरल्या जाणाऱ्या कीमध्ये प्रवेश मिळवला. या कीमध्ये प्रवेश केल्याने हॅकर्सला सेवेची सुरक्षा ओव्हरराइड करता आली. त्यांनी काही ट्रेझरी डिओ यूजर्सच्या वर्कस्टेशन्समध्ये दूरस्थपणे प्रवेश केला आणि काही अवर्गीकृत दस्तावेजांचा ॲक्सेस मिळवला. 'यूएस सायबर सिक्युरटी अँड इन्फ्रास्ट्रक्टर सिक्युरटी एजन्सी' आणि 'एफबीआय' च्या सहकार्याने हॅकच्या परिणामांचे मूल्यांकन करत आहेत. जॉर्जियाच्या जॉन्स क्रीक येथील असलेल्या 'बियॉन्ड ट्रस्ट'च्या प्रवक्त्याच्या म्हणण्यानुसार, कंपनीला डिसेंबर २०२४ च्या सुरुवातीस एक सुरक्षेशी संबंधित घटना निदर्शनास आली होती. त्यावर उपाययोजना करण्यात आली. त्यात 'रिमोट सपोर्ट प्रॉडक्ट'चा समावेश आहे. 'बियॉन्ड ट्रस्ट'ने मर्यादित संख्येने सहभागी असलेल्या ग्राहकांना सूचित केले. ट्रेझरी अधिकाऱ्यांनी हॅकिंगच्या घटनेबाबात अधिक तपशील दिलेला नाही. वॉशिंग्टनमधील चीनच्या दूतावासाच्या प्रवक्त्याने मात्र हॅकिंगचा दावा फेटाळून लावला असला, तरी पूर्वानुभव लक्षात घेता चीन काय करू शकतो, याची झलक त्याने ट्रम्प यांना सत्तेवर येण्याअगोदर दाखवली आहे.

नानाचा टांग आणि अॅनी

कधी कधी गरीब, बिचाऱ्या - बापड्या सामाजिक कार्यकर्त्यांच्या वर्मी लागावा असा खेळ हे असंवेदनशील राजकारणी करत असतात.

आता बघा ना, काल माननीय न्यायालयासमोर आमचे अण्णा' सामाजिक कार्यकर्ते आणि गरीब राजकारनी ' असल्याचा प्रामाणिक आर्गुमेंट केलं. (गीतेवर हात ठेवून शपथ घेण्याची पद्धत आरोपींकरिता आहे. वकिलांकरिता असती तर आमच्या वकिलांनी गीता डोक्यावर घेऊन हा युक्तिवाद केला असता). कोणी - कितीही - काहीही बोंबलु दे, पण आम्ही आमच्या 'आका' च्या मिठाला जागलो, हे मात्र खरं ! अगदी शंभू महादेवाची आण !!

त्या मिठासाठीच आमचे मन, धन आणि तन देखील हाजीर है | या आकासाठी आम्ही आमचे सर्वस्व धन लुटू (प्रसंगी समोरच्याचेही लुटू) आणि आमचे तन देखील खर्ची टाकू (आडवे आल्यास प्रसंगी समोरच्याचे तनही खर्च करून टाकू).

तर असे आमचे आका... मागास समाजाला फुढ नेण्यासाठी वारसा हक्काने लै कष्टप्रद परिस्थितीमध्ये समाजकारण करतात (काही नतद्रश्ट लोक त्यांना राजकारणी म्हणतात) हातात कोयता घेऊन उसाच्या मुळाशी घाव घालत - वाईट ते काढून टाकायचे आणि चांगल ते लोकांना खायला तयार द्यायच हे आमच मूळ. (म्हणूनच साखर कारखाने चालतात आणि हो तुम्ही - आम्ही उसाचा रस पण पितो.)

तर अशा आमच्या सत्शील आकाच्या पाठीमागे लागण्यासाठी काहींनी आमच्या अण्णांचा खांदा वापरला म्हणजे, गोळी आकांवर पण खांदे वापरायचे अण्णांचे... हे काय नैतिकतेला धरून नाही.

बरं या आरोप करणाऱ्यांनी कधी हातात कोयता घेऊन उसाच्या मुळाशी घाव चालवणारा आमचा आका कधी दाखवला नाही. पण हातात बंदूक घेऊन माजवयचं. संकट आले की तुम्ही कुठे फक्त हवेत गोळीबार करणारा फोटो मात्र लगेच व्हायरल केले आणि बदनामीची मोहीम चालवली....

आणि काय ही राजकीय दहशत .... तुम्ही जे म्हणता ते काय फक्त आमच्याच बीडमध्ये आहे का ? सोलापूर, भिवंडी, धाराशिव आणि अगदी तिकडं तळ कोकणात सिंधुदुर्ग - कणकवलीत काय चाललंय हो.... पण उग् आम्हाला बळीचा बकरा करायचं.

आता स्वतःहून गपगुमान अण्णा पोलिसांकडे हजर झाला. एवढा परमानिकपणा असतो व्हय कोणाकडे....? आमचे धनु भाऊ म्हणलं नव्हतं का, ते फडणीस असू द्या नैतर मोदी. दोनशे दहा कोटी आणले का नाही जिल्ह्यात ? म्हणजे कोण बी आमचं वाकड करू शकत नाही. एव्हढी दहशत असून सुद्धा अण्णांनी किती मोठं मन दाखवलं .... अहो स्वतःहून आला म्हणून तुमची अब्रू तर वाचली .. ते राहिलं बाजूला.. वर त्याला हिणवत्यात. आता चार दिवस देव देव करत अण्णा हिंडला तर त्यात एवढं काय काहूर जाता .... ? त्या पोलीस स्टेशनला जाता काय तर कोर्टात जाता. तुम्ही सुद्धा आधी देवाकडे जाता ना.. मग आम्ही आपलं चार दिवसात हितच आपलं कर्नाटक - आंध्रात जाऊन आलो आणि येता येता उज्जैनला आमच्या शंभू महादेवाला साकडं घालून आलो. तर बिघडलं कुठं ? तोच तर खरा आका आहे ना ? आता तो आमच्यासह त्या देशमुख - देशपांडेचा पण आकां आहे म्हणा, त्यामुळे जरा माप डाव - उज्च होत इतकच... तर आम्हाला म्हणायचं की, आमच्या गरीब मागास टाकून दिलेल्या मराठवाड्यातली राख तुम्हाला दिसली पण कल्याण - भिवंडीचे भंगार, सिंधुदुर्ग कणकवलीतले माशे आणि त्यांच्या जाळ्या - त्यांची जहाजाच्या जहाजं तुम्हाला दिसनात... धाराशिव मधल्या उष्ण जमिनीच्या पट्ट्या, सोलापूर मधली पैशाने पैशावर चक्रवाढीच्या पैका काढणाऱ्या पट्ट्या बी तुम्हाला दिसतात का ?

काहीतरी करून मराठवाडा प्रगती करतोय हेच तुमच्या पोटात दुखतय... हे काय बरोबर नाही गड्या ...

आमचा पापभिरू अण्णा...!

साखरेची घसरण, बँकिंगमध्ये चणचण



महेश देशपांडे
आर्थिक घडामोडींचे अभ्यासक

सरत्या काळात काही नोंद घेण्याजोग्या अर्थवार्ता समोर आल्या. अलिकडच्या काळात साखरेच्या भावात घसरण झाली असून कारखान्यांना पाच हजार कोटी रुपयांचा तोटा झाल्याची बातमी आहे. याच सुमारास गेल्या दहा वर्षांमध्ये मोठ्या कर्जदारांचे 12 लाख कोटींचे कर्ज 'राईट ऑफ' केल्याची मात्र या प्रक्रियेवर कडक नियंत्रण आल्याची माहिती समोर आली. अर्थात बँकांसमोरील रोकड उपलब्धतेचे संकटही दखलपात्र आहे.

अलिकडच्या काळात साखरेच्या भावात घसरण झाली असून कारखान्यांना पाच हजार कोटी रुपयांचा तोटा झाल्याची माहिती समोर आली आहे. याच सुमारास गेल्या दहा वर्षांमध्ये मोठ्या कर्जदारांचे १२ लाख कोटींचे कर्ज 'राईट ऑफ' केल्याची मात्र या प्रक्रियेवर कडक नियंत्रण आल्याची माहिती समोर आली. राज्यात उसाचा गाळप हंगाम सुरू असतानाच साखरेच्या दरात मोठी घसरण झाली. साखरेचे दर प्रति क्विंटल ३३०० रुपये इतक्या नीचांकी पातळीवर आले. क्विंटलमागे चारशे रुपयांनी दरात घसरण झाली असल्यामुळे या वर्षी साखर कारखान्यांना सुमारे पाच हजार कोटी रुपयांचा तोटा होण्याची भीती आहे. २०१९ पासून साखरेचा किमान विक्री दर ३१०० रुपयांवर स्थिर आहे. दुसरीकडे, उसाच्या एफआरपीमध्ये दर वर्षी वाढ केली जात आहे. त्यामुळे साखर कारखान्यांचा आर्थिक डोलारा अडचणीत आला आहे. देशभरात नोव्हेंबरपासून गळीत हंगाम सुरू झाला. देशासह, राज्यात गाळपाला अपेक्षित गती आली नाही. गाळप करणाऱ्या कारखान्यांची संख्याही घटली आहे. दिवाळीत साखरेचा प्रति क्विंटल दर ३७०० रुपयांवर गेला होता. दिवाळीपासून आजघडीला साखरेच्या दरात प्रति क्विंटल ४०० रुपयांपर्यंत घट झाली आहे. हंगामात साखरेला चांगला दर मिळाला, तरच कारखानदार साखर विकून उसाचा रास्त आणि किफायतशीर दर देतात; पण साखरेचे दर पडले तर साखर गोदामांमध्ये साठवावी लागते. त्यामुळे साठवणुकीचा खर्च वाढतो आणि कारखान्यांकडे खेळते भांडवलही राहत नाही.

थंडीच्या दिवसांमध्ये आईस्क्रीम, शीतपेयांची मागणी घटते. सध्या सण-उत्सवही नाहीत. त्यामुळे साखरेच्या मागणीत घट होऊन दर कमी झाले. दिवाळीमध्ये साखरेचे दर ३७०० रुपये प्रति क्विंटलवर गेल्यानंतर केंद्र सरकारकडून बाजारात साखरेचा पुरवठा वाढवण्यासाठी काखान्यांना जास्त कोटा दिला होता. देशाला महिन्याला सरासरी २२ लाख टन साखर पुरते. दिवाळीमुळे केंद्र सरकारने ऑक्टोबर महिन्यात देशभरातील कारखान्यांना २५ लाख टन साखर बाजारात विकण्यास परवानगी (कोटा) दिली होती; पण अतिरिक्त साखरेची विक्री झाली नाही. केंद्र सरकारकडून देशातील सर्व साखर कारखान्यांना प्रत्येक महिन्याला साखर विक्रीचा कोटा ठरवून दिला जातो. दिलेला साखर कोटी संपवण्याचा दबाव कारखान्यांवर असतो. काही काळापुर्वीपर्यंत बांगलादेश भारताकडून साखर आयात करत होता; परंतु आता भारताचे बांगलादेशशी संबंध बिघडले असल्यामुळे बांगलादेश आता भारतीय साखर विकत घेत नाही. बांगलादेश आता पाकिस्तानकडून साखर घेत आहे. त्यामुळे भारतीय साखरेची मागणी कमी झाल्याने अतिरिक्त साठ्याच्या दडपणाखाली भाव कोसळत आहेत. त्याचा फटका साखर कारखान्यांना बसत आहे.

एखाद्या सामान्य व्यक्तीने उद्योगासाठी किंवा व्यवसायासाठी कर्ज काढण्याचा प्रयत्न केला, तर त्याला 'सिबिल स्कोअर' दाखवावा लागतो. 'सिबिल स्कोअर'च्या आधारे बँकांकडून कर्जाचे वाटप केले जाते. अनेकदा कागदपत्रांची जुळणी आणि निकष लावले जातात. त्यामुळे कर्जदाराला कर्ज घेणे आव्हानात्मक होते. अनेकदा काही लोक व्यवसाय सुरू करण्यासाठी अधिक व्याजदराने कर्ज देणाऱ्या सूक्ष्मवित्त कंपन्यांच्या कर्जाच्या जाळ्यात अडकतात; मात्र गेल्या दहा वर्षांमध्ये देशातील मोठ्या बँकांनी बड्या थकबाकीदारांचे 12 लाख कोटी रुपयांचे कर्ज 'राइट ऑफ' केले असल्याची आकडेवारी समोर आली आहे.

बँका बहुतेकदा बेरोजगारांना किंवा छोट्या कर्जदारांच्या काही हजार किंवा काही लाखांच्या कर्जाच्या वसुलीसाठी तगादा लावतात. विविध मार्गांचा वापर करून कर्जवसुली करतात; परंतु याच बँका अब्जाधीश असलेल्या कर्जदारांच्या वसुलीबाबत नरमाईची भूमिका घेतात. अनिल अंबानी, जिंदाल ते जेपी ग्रुप उद्योगसमूहाचा कर्ज थकवणाऱ्यांमध्ये समावेश आहे. केंद्र सरकारने ससंदेत एका प्रश्नाच्या उत्तरात दिलेल्या माहितीतून बँकांनी 'राइट ऑफ' केलेल्या कर्जाच्या रकमेची माहिती समोर आली आहे.

थकबाकीदारांचे 'कर्ज राइट ऑफ' करण्यामध्ये सर्वात पुढे स्टेट बँक आहे. या बँकेने गेल्या पाच वर्षांमध्ये सुमारे दीड लाख कोटी रुपयांचे कर्ज 'राइट ऑफ' केले आहे. त्यानंतर पंजाब नॅशनल बँक, युनियन बँक ऑफ इंडिया, बँक ऑफ बडोदा आणि बँक ऑफ इंडियाचा क्रमांक लागतो. थकलेले कर्ज 'राइट ऑफ' करण्यामध्ये सार्वजनिक क्षेत्रातील बँकांचे प्रमाण जास्त आहे. स्टेट बँकेने गेल्या पाच वर्षांमध्ये सुमारे दोन लाख कोटी रुपयांचे कर्ज 'राइट ऑफ' केले आहे. सर्व सार्वजनिक क्षेत्रातील बँकांनी मिळून गेल्या पाच वर्षांमध्ये साडे सहा लाख कोटी रुपयांचे कर्ज 'राइट ऑफ' केले आहे. वसुली होण्याची शक्यता कमी असते, तेव्हा बँका काही कर्जांचा समावेश बुडीत कर्जात करतात; मात्र त्याच वेळी एखाद्या सर्वसामान्य नागरिकाकडून कर्ज थकल्यास त्याच्या संपत्तीचा लिलाव करतात. यामुळे कर्ज घेणाऱ्यांमध्ये नाराजी पहायला मिळते. मात्र केंद्र सरकारने अलिकडच्या काळात याबाबत कडक धोरण अवलंबले असून उद्योगपतींना पळवाट मिळू नये यासाठी जोरदार प्रयत्न सुरु केले आहेत. त्याचा सकाराअत्मक परिणामही पहायला मिळत आहे.

बँकींग व्यवस्थेशी संबंधित आणखी एका बातमीने अलिकडे लक्ष वेधले. देशांतर्गत बँकांमधील रोकड टंचाईचे संकट गडद झाल्याची माहिती अलिकडे समोर आली. अशा परिस्थितीत बँकांकडे कर्जवाटपासाठी रोख रकमेची कमतरता भासू शकते. गृहकर्ज, कार लोन, शैक्षणिक कर्ज, कृषी कर्ज किंवा कॉर्पोरेट कर्ज असो; कर्ज देताना बँकांचे हात बांधलेले आहेत. कंपन्यांच्या आगाऊ कर भरणा आणि बँकिंग क्षेत्रातील नियामक रिझर्व्ह बँक रुपयाची घसरण रोखण्यासाठी डॉलरची विक्री करत असल्याने बँकांना रोख रकमेचा सामना करावा लागत आहे. 'ब्लूमबर्ग इकॉनॉमिक्स इंडेक्स'नुसार, देशाच्या बँकिंग प्रणालीमध्ये अलिकडे सहा महिन्यांमधील रोखीची सर्वात मोठी टंचाई दिसून आली. बँकांमध्ये १.५ लाख कोटी रुपयांच्या रोकड रकमेचा तुटवडा आहे. रिझर्व्ह बँक ऑक्टोबर २०२४ पासून सातत्याने डॉलरची विक्री करत आहे. त्यामुळे रोखीचे संकट वाढत आहे. रुपयाचे कोसळणे आणि व्यापार तूट यामुळे हे संकट वाढले आहे. सध्या रुपया एका डॉलरच्या तुलनेत विक्रमी पातळीवर घसरला. वाढती व्यापार तूट आणि मजबूत डॉलर यामुळेही समस्या वाढल्या आहेत. अशा परिस्थितीत रुपयाचे कोसळणे रोखण्यासाठी रिझर्व्ह बँक अधिक डॉलर्स विकू शकते. त्यामुळे बँकिंग प्रणालीमध्ये रोख रकमेचा तुटवडा निर्माण होऊ शकतो. तथापि, सहा डिसेंबर रोजी रिझर्व्ह बँकेने 'कॅश रिझर्व्ह रेशो' (सीआरआर) ५० बेसिस पॉईंट्सने कमी करून ४.५० टक्क्यांवरून चार टक्क्यांवर आणला. त्यामुळे बँकिंग यंत्रणेमध्ये रोखतेचे प्रमाण वाढवता येईल. रिझर्व्ह बँकेच्या या निर्णयामुळे बँकिंग व्यवस्थेत १.१६ लाख कोटी रुपयांची रोकड वाढण्यास मदत होणार आहे; परंतु हा निर्णयही अपुरा ठरत आहे.

१५ डिसेंबर २०२४ ही चालू आर्थिक वर्षाच्या तिसऱ्या तिमाहीसाठी आगाऊ कर जमा करण्याची शेवटची तारीख होती. या सुमारास कंपन्यांनी जमा केलेल्या आगाऊ करामुळे १.४ लाख कोटी रुपये बँकिंग व्यवस्थेतून बाहेर गेले. ते रोखीच्या संकटाचे प्रमुख कारण आहे.



राशीभविष्य

- **मेष :** महत्त्वाच्या कार्यात दिलासा मिळेल. इतरांशी स्नेहसंबंध दृढ होतील. प्रेम प्रकरणात अनुकूलता राहील.
- **वृषभ :** अपेक्षित ते साध्य करू शकाल. उगाच अधिक विचार करू नका. प्रकृतीच्या तक्रारींकडे लक्ष द्या.
- **मिथुन :** आर्थिक बाबतीत जागरूकता ठेवावी. यंत्र, वाहनाचा वापर जपून करा. मानसिक स्वास्थ लाभेल.
- **कर्क :** इतरांवर अधिक विश्वास टाकू नका. व्यवसायात अडचणी निर्माण होतील. विचारानं रहायला हवं.
- **सिंह :** आत्मविश्वास वाढीस लागेल. नव्या योजनांना अपेक्षित गती मिळेल. कौटुंबिक प्रश्नातून मार्ग निघेल.
- **कन्या :** प्रलंबित कामांना गती मिळेल. अपेक्षेपेक्षा अधिक प्राप्त करू शकाल. विद्यार्थ्यांना अडचणी येतील.
- **तूळ :** अर्थविषयक अनुभवींचा सल्ला कामी येईल. दूरच्या प्रवासाचे बेत ठरतील. मुलांचे प्रश्न मार्गी लागतील.
- **वृश्चिक :** मानसिक अस्वास्थ राहील. प्रलंबित कामं पुन्हा रखडतील. स्थापत्य क्षेत्रात पुरेसा वाव मिळेल.
- **धनु :** उत्साहवर्धक घटना घडतील. थोरामोठ्यांचा सहवास लाभेल. यांत्रिक-तांत्रिक क्षेत्रात संधी लाभतील.
- **मकर :** खरेदी-विक्रीचे व्यवहार लाभदायक ठरतील. जुनी दुखणी पुन्हा उद्भवतील. उत्साह वाढीस लागेल.
- **कुंभ :** कौटुंबिक ताण-तणाव वाढेल. नोकरीत वरिष्ठांशी मतभेद संभवतात. प्रवासात प्रकृतीची काळजी घ्या.
- **मीन :** आध्यात्मिक कार्याकडे ओढा राहील. अपेक्षित भेटीतून समाधान लाभेल. आर्थिक उत्कर्ष होईल.

३ जानेवारी — दिनविशेष

१८३१ : समाजसेविका सावित्रीबाई फुले यांचा जन्म.
१९२१ : निर्माते, दिग्दर्शक आणि पटकथा लेखक चेतन आनंद यांचा जन्म.
१९५२ : स्वतंत्र भारतात पहिल्या राष्ट्रीय निवडणुका पार पडल्या.
१९९४ : लेखक अमरेंद्र गाडगीळ यांचं निधन.
२००२ : भारतीय अंतराळ शास्त्रज्ञ सतीश धवन यांचं निधन.
२०१६ : भारतीय फुटबॉल संघाने सातव्यांदा 'सॅफ' करंडक पटकावला.

आरोग्यमंत्र — केसांच्या आरोग्यासाठी...

शारीरिक आरोग्याचा विचार करताना केसांच्या आरोग्याकडेही वेळच्या वेळी लक्ष देणं गरजेचं ठरतं. परंतु याचा फारसा विचार केला जात नाही. खरं तर केसांचं आरोग्य बिघडण्याच्या मार्गावर असतं तेव्हाच आपण लक्ष देण्यास सुरूवात करतो. खरं तर अशी स्थिती उद्भवू नये म्हणून आधीपासून लक्ष द्यायला हवं.

केसांच्या आरोग्यासाठी रोज दूध प्यावं. दुधात स्निग्ध पदार्थ, कर्बोदकं, जीवनसत्त्वं आणि खनिजं भरपूर प्रमाणात असतात. त्यामुळे केस मुळापासून मजबूत बनतात. केसांवरही दुधाचा वापर करता येतो. दुधात मध आणि मेथीच्या दाण्यांची पावडर मिसळून या मिश्रणाचा हेअर मास्क म्हणून वापर करता येतो. दुधाप्रमाणेच अंड्ही केसांच्या आरोग्यासाठी उत्तम आहार आहे. अंड्यामध्ये प्रथिनं आणि आवश्यक अमिनो आम्लं असतात. त्यामुळे केसांचं आरोग्य सुधारतं. केसांना मसाज करण्यासाठी ऑलिव्ह ऑईल उत्तम समजलं जातं. त्यात नरिशिंग, मॉईश्चरायझिंग आणि कंडिशनिंग हे घटक असतात. त्यामुळे केस सतेज, कोमल आणि मजबूत बनतात. हे तेल केसांना लावल्यास केसांचा कोरडेपणा आणि गुंता लगेच दूर होतो, केस रेशमी आणि मुलायम बनतात. आहारात कच्च्या भाज्यांचा समावेश केल्याने शरीराला नैसर्गिक स्थितीत ॲंटीऑक्सिडंट्स उपलब्ध होतात. त्यामुळे केसांच्या आरोग्यासाठी आहारात भाज्या किंवा कोशिंबिरी असणं महत्वाचं आहे.

महत्त्वपूर्ण काही... — सूक्ष्मदर्शकातील सुधारणा

अत्यंत छोटे कण, अतिशय लहान वा अतिसूक्ष्म आकाराचे विषाणू यांच्या निरिक्षणासाठी सूक्ष्मदर्शकाचा वापर केला जातो. पारंपरिक सूक्ष्मदर्शकात दोन भिंगे वापरून प्रकाशकिरणांच्या मदतीने एखादी वस्तू मोठी करून पाहता येते. या पार्श्वभूमीवर रस्का आणि नॉल या संशोधकांनी १९३१ मध्ये पहिला वहिला इलेक्ट्रॉन सूक्ष्मदर्शक तयार केला. या इलेक्ट्रॉन सूक्ष्मदर्शकात वस्तुची मोठी झालेली प्रतिमा स्फूरदीप्त पडद्यावर दिसत होती. या सूक्ष्मदर्शकात वस्तुची प्रतिमा १४ पट मोठी दिसत असली तरी त्यात सुधारणा करत दोन वर्षातच रस्का आणि नॉल या संशोधकांनी एखादी वस्तू तब्बल बारा हजार पट मोठी करून स्पष्टपणे दाखवणारा इलेक्ट्रॉन सूक्ष्मदर्शक तयार केला. या अतिशय महत्त्वाच्या संशोधनासाठी अर्न्स्ट रस्का यांचा १९८६ मध्ये नोबेल पारितोषिक देऊन गौरव करण्यात आला. या संशोधनात पुढे आणखी सुधारणा होत गेल्या आणि अतिसूक्ष्म गोष्टी कितीतरी मोठ्या आकारात पाहता येणं शक्य झालं आजच्या अत्याधुनिक इलेक्ट्रॉन सूक्ष्मदर्शकाद्वारे एखादी वस्तू हवी तेवढी मोठी करून पाहता येते हे लक्षात घ्यायला हवं.

सल्ला मोलाचा — जपा हातांचे सौंदर्य

चेहऱ्याची काळजी घेताना हातांकडे मात्र आपलं साफ दुर्लक्ष होतं. वस्तूत: विविध कामांसाठी शरीराच्या इतर कोणत्याही भागापेक्षा हातांचा सर्वाधिक उपयोग होत असतो. तुम्ही घरच्या घरी अगदी सोप्या पद्धतीनं हातांची काळजी घेऊ शकता. ❊ नेलपॉलिश काढल्यानंतर एका बाऊलमध्ये कोमट पाणी घेऊन त्यात थोडा वेळ हात बुडवून ठेवा. त्यानंतर स्क्रबिंगद्वारे हातांवरची मृत त्वचा काढून टाका. ❊ यानंतर तुमचे हात कोरडे करून घ्या. हातांना क्रीम आणि मॉश्चरायझर लावा. ❊ क्रीम लावल्यानंतर नखांना आवडता आकार देऊ शकता. ❊ नखांच्या खालच्या भागावरचा पापुद्रा काढायला विसरू नका. हा भाग मऊ रहावा यासाठी

» Selected

निरगुडसर विद्यालयाचा तालुक्यात डंका

लोणी-धामणी : पुणे जिल्हा परिषद पुणे, पंचायत समिती आंबेगाव व आंबेगाव तालुका विज्ञान-गणित अध्यापक संघ यांच्या संयुक्त विद्यमाने महात्मा गांधी विद्यालय व ज्यूनिअर कॉलेज मंचर (ता. आंबेगाव) येथे ५२ वे आंबेगाव तालुका विज्ञान प्रदर्शन २०२४-२०२५ चे आयोजन करण्यात आले होते. या प्रर्शनात (९ वी ते १२ वी)वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये निरगुडसर येथील पं. ज. नेहरू व द. गो. वळसे पाटील उच्च माध्यमिक विद्यालयातील वैभवी संदिप वळसे हिने प्रथम क्रमाक मिळवला व विद्यालयाची शान वाढवली. प्रश्नमंजुषामध्ये संतोष वैष्णवी मेंगडे व आरण्या आनंदजीत पाटील (९ वी ते १२ वी) या दोघांनी व्दितीय क्रमांक मिळवला, तर तनया विजय वळसे व आराध्या गणेश वळसे (६ वी ते ८ वी) या दोघींनी विज्ञान प्रकल्प-इलेक्ट्रिक टेस्टर प्रथम क्रमांक मिळविला. त्यांची जिल्हा पातळीवर निवड झाली, अशी माहिती प्राचार्य कांताराम टाव्हरे व पर्यवेक्षक संतोष वळसे यांनी दिली. सर्व प्रशस्तिपत्र विद्यार्थी व विद्यालयांच्या वतीने प्राचार्य कांताराम टाव्हरे व प्रा. अरूण गोरडे यांनी मान्यवरांच्या हस्ते स्विकारले.

शिक्षकांचे प्रश्न सोडविण्यासाठी कटीबध्द

शिक्रापूर : शालेय शिक्षणात शिक्षकांची भूमिका महत्त्वपूर्ण असून शिक्षक परिषदेच्या माध्यमातून शिक्षकांचे प्रश्न सोडविण्यासाठी कटीबध्द असल्याचे मत माजी आमदार भगवानराव साळुंखे यांनी व्यक्त केले. कासारी येथील सौ. हिराबाई गोपाळराव गायकवाड विद्यालयात शिक्षकांच्या कार्यशाळेत माजी आमदार भगवानराव साळुंखे बोलत होते. याप्रसंगी शिक्षक परिषदेचे पुणे विभागाचे संघटन मंत्री रामदास अभंग, शिक्षक परिषदेचे जिल्हाध्यक्ष निलेश काशीद, समता शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र ढमढेरे, विद्यालयाच्या प्रभारी प्राचार्य नसीमा काझी, प्रा. प्रशांत म्हेत्रे, प्रा. विजय पाचर्णे यांसह आदी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. दरम्यान माजी आमदार भगवानराव साळुंखे यांनी शिक्षक परिषदेच्या शिक्षकांसाठी केलेल्या कार्याचा आढावा घेतला. कार्यालयीन कामकाजात सुसूत्रता ठेवण्याच्या दृष्टीनेही मार्गदर्शन करत गुणवत्ता वाढ व विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विद्यालयात राबवायच्या विविध उपक्रमांचीही माहिती माजी आमदार भगवानराव साळुंखे यांनी दिली. तसेच जुनी पेन्शन योजना, अंशतः अनुदानित शाळांचे अनुदानाचे प्रश्न, भविष्य निर्वाह निधीचे प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचेही आमदार साळुंखे यांनी सांगितले. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रावसाहेब थोरात यांनी केले तर अरुण भुजबळ यांनी आभार मानले.

स्वाभिमानाने सुटतील दिव्यांगांचे प्रश्न

आळंदी : स्पर्धेच्या युगात आज एवढी प्रगती होऊन देखील दिव्यांगांचे अनेक प्रश्न हे प्रलंबित आहेत. हे लक्षात घेऊन दिव्यांगां नीच एकत्र येऊन दिव्यांगांसाठी दिव्यांगांचे प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने एक उचललेले पाऊल म्हणजे दिव्यांग स्वाभिमान संस्था (महाराष्ट्र राज्य) या संस्थेची स्थापना केली. या संस्थेची ध्येय धोरणच असे आहेत की जेणे करून दिव्यांगांच्या सूक्ष्मते अधिसूक्ष्म समस्या सुटतील, हा या संस्थेचा मुख्य उद्देश असेल, असे प्रतिपादन गहिनीनाथ नलावडे यांनी केले. आळंदी येथील गोपाळपूर या संस्थेचा उद्घाटन समारोह आळंदी संत सेना महाराज कार्यालयात पार पडला. या प्रसंगी सक्षम पश्चिम महाराष्ट्र प्रांताचे अध्यक्ष माननीय ॲड. मुरलीधर जी कचरे, वस्ती संयोजक राष्ट्रीय स्वयंसेवक संघ दानेशजी तिमशेट्टी, गणेशजी गरुड आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक गहिनीनाथ नलावडे यांनी केले. सूत्रसंचालन किशोरजी रासकर यांनी केले. आळंदी नगरपालिकेचे माजी नगरसेवक पांडुरंग वहिले यांनी संस्थेला सर्वतोपरी सहकार्य करण्यासाठी आश्वासित केले. याप्रसंगी अँड वंदना नवघरे, विजय पगडे संतोष इंदलकर, अमोल देशमुख, प्रवीण भरम, फुलचंद ढवळे, शिवशंकर मुंडे, राजेंद्र बेंद्रे, अर्चना ताई घुंडरे, नाना जगदाळे, दत्ता गावडे, बाळू दुबाले, माऊसाहेब आवटे, संदीप गद्रे, अशोक सोनवणे, सचिन वाघमारे यांच्यासह संस्थेचे कार्यकर्ते, समाजातील प्रतिष्ठित नामवंत मान्यवर उपस्थित होते.

जिल्हा परिषद होत आहे पेपरलेस

कागदविरहित कामे होणार : १७ विभागांचा कारभार ऑनलाइन

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

पुणे : जिल्हाधिकारी कार्यालय आणि जिल्हा परिषदेचे कामकाज नवीन वर्षात कागद विरहीत (पेपरलेस) होणार आहे. नवीन वर्षापासून जिल्हाधिकारी कार्यालयातील सर्व शाखांची कामे कागदविरहित होणार आहे. याच बरोबर पुणे जिल्हा परिषदेचा कारभार आता ई ऑफिसच्या दिशेने सुरू झाला आहे. आतापर्यंत जिल्हा परिषदेच्या १७ विभागांचा कारभार ऑफलाइन फाइल्स ऐवजी आता ऑनलाइन पद्धतीने सुरू झाला आहे. सुमारे तीन हजारांहून अधिक फाइल्स ऑनलाइन झाल्या असून यामुळे कोणत्या फाइल्सची सद्य:स्थिती आता एका क्लिकवर कळणार आहे.

यामुळे नागरिकांची दिवसेंदिवस रखडणारी कामे वेळेत मार्गी लागणार असल्याचा दावा प्रशासनाकडून करण्यात आला आहे. जिल्हाधिकारी कार्यालयातील महसूल, कुळकायदा, सर्वसाधारण, निवडणूक, गौण खनिज, पुनर्वसन, भूसंपादन, राजशिष्टाचार, नियोजन समिती, लेखा, राजशिष्टाचार, गृह, संजय गांधी निराधार योजना, नगर परिषद, रोजगार हमी योजना, पुरवठा विभाग, नगर रचना आदी शाखांमधील अधिकाऱ्यांना ई-प्रणालीचा अवलंब करण्यासाठी सूचना देण्यात आल्या आहेत. सद्यस्थितीला ५० टक्क्यांपेक्षा अधिक काम झाले आहेत.

याबाबत सर्व शाखांमधील उपजिल्हाधिकारी, तहसीलदार, नायब तहसीलदार, कारकून, अव्वल कारकून यांचे स्वतंत्र सरकारी ई-मेल आयडी बनविण्यात आले आहेत. तसेच, प्रत्येकाची डिजिटल स्वाक्षरी तयार करण्यात आली नवीन वर्षात १०० टक्के काम पेपरलेस होणार आहे.

जिल्हा प्रशासनाकडे प्राप्त होणारे अर्ज, तसेच महसुली प्रकरणे, दावे, प्रलंबित निकाल आदींची माहिती वेळेवर प्राप्त करण्यासाठी कागदविरहित कामे करण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयातील सर्व शाखांमध्ये ई-ऑफिस प्रणालीचा अवलंब करण्यात येणार आहे. नववर्षात याचा अवलंब करण्यास सुरुवात करण्यात येणार असून, पारदर्शकता आणि गतिमानता हाच उद्देश असणार आहे. लवकरच इतर सरकारी कार्यालयांमध्ये या प्रणालीचा अवलंब करण्यात येईल

राज्य सरकारने आदेश दिल्याप्रमाणे गेल्या सहा महिन्यापासून हळूहळू जिल्हा परिषदेचा कारभार ई ऑफिसच्या माध्यमातून सुरू झाला आहे. सामान्य प्रशासन विभागात ७० टक्के तर अन्य विभागांमध्ये ५० टक्क्यांपर्यंत फाईल्सचे काम ऑनलाइन आले आहे. नव्या वर्षात सर्वच विभागा वेगाने सर्व कामकाज ऑनलाइन पद्धतीने होणार आहे.

पुणे जिल्हा हा बहुआयामी जिल्हा असून कृषी, उद्योग, स्टार्टअप, आयटी या सगळ्या क्षेत्रातून नव उद्योजक घडवायचे आहे. यासाठी विशेष प्रशिक्षणसुद्धा दिले जाणार आहे. वाहतूक आणि रस्ते अपघात रोखण्याचा संकल्प करण्यात आला आहे. प्रशासनाच्या वतीने विविध उपाययोजना करण्यात येणार आहे.

— डॉ. सुहास दिवसे, जिल्हाधिकारी

कामाचा संकल्प...

- नवीन वर्षात रिंग रोडचे काम, शेतकऱ्यांना सौरपंपवाटप, उद्योजक आणि स्वयंरोजगार निर्मिती रस्ते अपघात रोखण्याचा संकल्प पूर्ण करायचा आहे.
- सर्वात महत्त्वाचे म्हणजे रिंग रोड पूर्ण करायचा आहे. रिंग रोडच्या भूसंपादनासाठी ३१ डिसेंबर शेवटचा दिवस होता. नवीन वर्षाच्या पहिल्या महिन्यात उर्वरित भूसंपदान करून कामाची सुरुवात करण्याचा संकल्प आहे.

दुचाकी अपघातात एक जण ठार

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

शिरूर : घोडगंगा कारखान्यानजीक न्हावरे – चौफुला रस्त्यावर दुचाकी खांबाच्या लोखंडी तान्याला धडकून झालेल्या अपघातात एक जण ठार झाला. जळबा अशोक सावते (वय-३२, मुळगाव देवसरी, ता. उमरखेड, जि. यवतमाळ) यांचा मृत्यू झाला आहे. याप्रकरणी भरत शशिराव काकडे यांनी शिरूर पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.

याबाबत सविस्तर माहिती अशी की, किशोर सखाराम खडसे व त्यांचा मित्र मयत जळबा अशोक सावते हे दुचाकीवरून फलटण येथे देवदर्शनासाठी निघाले होते. दरम्यान, न्हावरे चौफुला रस्त्यावर घोडगंगा कारखान्यानजीक रस्त्याला खेटून असलेल्या विजेच्या खांबाच्या लोखंडी तान्याला दुचाकी धडकली. या अपघातात दुचाकीच्या पाठीमागच्या सीटवर बसलेले जळबा सावते रस्त्यावर उडून पडले. त्यात जळबा सावते गंभीर जखमी झाल्याने त्यांचा मृत्यू झाला. या घटनेचा पुढील तपास पोलिस हवालदार धनंजय थेऊरकर करत आहेत.

मल्चिंग पेपरवर होतेय कांदा लागवड

आंबेगावात आधुनिक ठिबक सिंचनाद्वारे शेतात बेडचा वापर

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

लोणी-धामणी : आंबेगाव तालुक्यातील अनेक गावातील शेतकऱ्यांनी ठिबक सिंचनाद्वारे शेतात बेडचा वापर करून मल्चिंग पेपरवर उन्हाळी कांदा लागवड केला आहे. मेंगडेवाडी (ता. आंबेगाव) येथील युवक शेतकरी राहुल टाव्हरे यांनी घरच्या तीस गुंठे क्षेत्रावर प्रयोग केला आहे.

आंबेगावात सध्या उन्हाळ कांद्याची लागवडीची लगबग सुरू आहे.शेतकरी सतत शेतीतील नवे तंत्रज्ञान आत्मसात करण्यासाठी शेतकरी धडपडत असतात.पारंपरिक पद्धतीने पाठ पाण्यावरील लागवडीला फाटा देत मल्चिंग पेपर व ठिबक सिंचनाच्या आधारे कांद्याचे दर्जेदार उत्पादन घेण्यासाठी शेतकरी प्रयत्नशील असतो.

तालुक्यातील अनेक शेतकरी नवीन नवीन तंत्रज्ञानाचा अवलंब करून शेतीत वेगवेगळे प्रयोग करताना दिसत आहेत. शेतकरी मल्चिंग पेपर व ठिबक सिंचन या तंत्राआधारे कांद्याची आधुनिक शेती करू लागले आहेत. भारनियमन आणि बिबट्यापासून बचाव करण्यासाठी शेतकरी नवनवीन तंत्रज्ञान शोधत आहेत.

मल्चिंग पेपरचे फायदे

- मल्चिंग पेपरवर एकसारख्या अंतरावरील चित्रामुळे दोन रोपांमधील अंतर नंतर एक सारखे राहते परिणामी कांद्याची वाढ चांगल्या प्रकारे होते. व कांद्याचे उत्पादन व वजन वाढण्यास मदत होते. रंग आणि आकार एक सारखा राहिल्याने बाजारात चांगला दर मिळण्यास मदत होते. तणांची वाढनियंत्रणात ठेवण्यात येते. खुरपणी खर्च व तणनाशकांच्या फवारणीत बचत होते. टिकवण क्षमतेत चांगली वाढ. त्यामुळे बाजारपेठेच्या अंदाजानुसार विक्री नियोजनाला संधी मिळते. पारंपरिक पद्धतीमध्ये पाटपाण्यावर कांदा लागवडीसाठी वाफ्यांमध्ये पाणी साठवावे लागत असे. यामध्ये मोठ्या प्रमाणावर पाण्याचा वापर होत होता. आता ठिबक व मल्चिंगमुळे पाण्याची बचत होणार आहे.

पाठ पाण्यावर कांदा उत्पादन घेताना थंडीत रात्री अपरात्री पिकाला पाणी द्यावे लागत होते.

बिबट्यांचे हल्ले आणि प्रसंगी शेतकऱ्यांचे मृत्यू झाल्याच्या घटना अनेक ठिकाणी घडल्या आहेत. आधुनिक तंत्रज्ञानावरील पद्धतीमुळे पाणी देण्याच्या वेळा वापर पद्धतीत बदल झाला कष्ट कमी झाले. भार नियमन आणि बिबट्याची भीती कमी झाल्याचा शेतकऱ्यांचा अनुभव शेतकरी व्यक्त करत आहेत.

सोयाबीन : शेतकऱ्यांच्या ऑनलाईन नोंदणीस मुदतवाढ

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

पुणे : केंद्र शासनाचे किमान आधारभूत किंमत खरेदी योजने अंतर्गत हंगाम २०२४-२५ मधील हमीभावाने सोयाबीन खरेदीसाठी ऑनलाईन नाव नोंदणी करिता दि. ६ जानेवारी पर्यन्त मुदतवाढ देण्यात आलेली आहे. ज्या सोयाबीन उत्पादक शेतक-यांनी ऑनलाईन नोंदणी केली आहे त्या शेतक-यांचे सोयाबीन खरेदी करणेत येणार आहे तसेच ज्या शेतक-यांनी अद्याप ऑनलाईन नोंदणी केली नाही, अशा शेतक-यांनी बाबालाल काकडे निरा कॅनॉल संघ, तीन हत्ती चौक, बारामती येथे सोयाबीन नोंद असलेला सन २०२४-२५ पिकपेरा सहीत ७/१२ उतारा, आठ-अ, आधारकार्ड आणि आयएफएससी कोडसह बँकेचे पासबुक झेरॉक्स, मोबाईल नंबर इत्यादी कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहेत. ज्या शेतक-यांनी ऑनलाईन नोंदणी केली आहे अशा शेतक-यांना एसएमएस द्वारे शेतमाल घेऊन येणेची तारीख कळविणेत येते. त्याच दिवशी शेतक-यांनी खरेदी केंद्रावर आपला माल आणावा.

दि. १५ ऑक्टोबर पासून सोबायीन खरेदी केंद्र बारामती कृषि उत्पन्न बाजार समितीचे मुख्य आवारातील यांत्रिक चाळणी येथे सुरू आहे. आज अखेर सदर केंद्रावर २५५ शेतक-यांचे २१५० क्विंटल सोयाबीन खरेदी झाले आहे. तरी सोयाबीन उत्पादक शेतक-यांनी दि. ६ जानेवारी २०२५ पर्यन्त मुदतीत नोंदणी करून खरेदी केंद्राचा फायदा घ्यावा असे समितीचे सचिव अरविंद जगताप यांनी आवाहन केले आहे.

डिंभा कालव्यात जोडप्याची आत्महत्या

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

नारायणगाव : वारुळवाडी ग्रामपंचायत हद्दीत डिंभा डाव्या कालव्याच्या वाहत्या पाण्यामध्ये उडी मारून एका जोडप्याने आत्महत्या केल्याची घटना घडली आहे. यातील एकाचा मृतदेह सापडला आहे, तर दुसरा मृतदेह शोधण्याचे काम सुरु आहे. तथापि कालव्यात पाणी जास्त असल्याने व पाण्याला अधिकचा वेग असल्यामुळे तसेच अंधार पडल्यामुळे दुसरा मृतदेह शोधण्यासाठी व्यत्यय येत आहेत. त्यामुळे डिभा कालव्याचे पाणी कमी करावे, अशी मागणी स्थानिक नागरिकांनी जलसंपदा विभागाचे कार्यकारी अभियंता प्रशांत कडूसकर यांच्याकडे केली आहे. चिराग चंद्रशेखर शेळके (वय-२८) व त्यांची पत्नी पल्लवी चिराग शेळके (वय-२५) अशी आत्महत्या केलेल्या जोडप्याची नावे आहेत.

याबाबत मिळालेल्या अधिक माहितीनुसार, वारुळवाडी येथे राहत असलेले चिराग शेळके व त्यांची पत्नी पल्लवी शेळके या जोडप्याने बुधवारी (दि. ९) सायंकाळी साडेपाचच्या सुमारास वारुळवाडी-ठाकरवाडीच्या हद्दीत डिभा डाव्या कालव्याच्या वाहत्या पाण्यात उडी मारून आत्महत्या केल्याची प्राथमिक माहिती वारुळवाडीचे पोलिस पाटील सुशांत भुजबळ यांनी दिली. ते म्हणाले, हे जोडपे स्कूटर गाडीवरून कालव्यावर आल्याचे तेथे फिरायला येणाऱ्या लोकांनी पाहिले, त्यांनी स्कूटर कालव्याच्या कडेला लावून या जोडप्याने पाण्यात उडी मारण्याचे पाहिल्याचे सरपंच राजू मेहेर यांना सांगितले.

रंगदास स्वामी पुण्यतिथी साजरी

पारगाव (ता. आंबेगाव) येथे रंगदास स्वामी पुण्यतिथी निमित्त महाआरती प्रसंगी उपस्थित मान्यवर. (छाया: रोहीत खुडे)

रांजणी : पारगाव (ता. आंबेगाव) येथे श्री रंगदास स्वामी महाराज यांची पुण्यतिथी उत्साहात साजरी झाली. यावेळी हजारो भाविकांनी आमटी भाकरीच्या महाप्रसादाचा आस्वाद घेतला.

पारगाव येथील भरत कोल्हे व वैशाली कोल्हे यांच्या पुढाकाराने दरवर्षी रंगदास स्वामी पुण्यतिथीचे आयोजन केले जाते. यंदाचे हे २२ वे वर्ष आहे. यावेळी गुरुवारी (दि.२) सकाळी ह.भ.प.तान्हाजी महाराज तांबे(शिरदाळे) यांचे प्रवचन झाले. त्यानंतर दुपारी बारा वाजता श्री.रंगदास स्वामी महाराज यांची महाआरती मान्यवरांच्या हस्ते घेण्यात आली.

आरती नंतर उपस्थित भाविकांना दिवसभर आमटी भाकरीच्या महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. दिवसभरात पारगाव व परिसरातील हजारो भाविक भक्तांनी आमटी भाकरीच्या महाप्रसादाचा लाभ घेतला. अनुसया महिला उन्नती केंद्राच्या अध्यक्षा किरण दिलीप वळसे पाटील यांनी या कार्यक्रमाला भेट दिली.

महाआरती प्रसंगी शरद सहकारी बँकचे संचालक दौलत लोखंडे, अजय भिवसनकर, राजेश खडबडे, रमेश खडबडे, माजी ग्रा.पं. सदस्या भाग्यश्री कोल्हे-लोखंडे, सुजीत लोखंडे, भास्कर कोल्हे, रोहिणी देवडे, मानसी कोल्हे, प्रियंका लोखंडे, भागचंद पोंदे, ह.भ.प.निवृत्ती महाराज लोखंडे, माजी उपसरपंच विठ्ठल ढोबळे आदी मान्यवर उपस्थित होते.

राजगुरुनगर प्रकरणातील नराधम येरवड्यात रवाना

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

पुणे : २५ डिसेंबर रोजी पुणे जिल्ह्यातील राजगुरूनगर येथे सख्या बहिणींची अत्यंत निर्घृणपूणे हत्या करण्यात आली होती. तसेच यापैकी एका चिरमुडीवर नराधमाने लैंगिक अत्याचार केले होते. या घटनेने राजगुरुनगरसह जिल्ह्यात मोठी खळबळ उडाली होती. याप्रकरणातील आरोपीला पोलिसांनी २४ तासांच्या आतमध्ये अटक केली होती. त्याला पोलीस कोठडीत ठेवण्यात आले होते. पोलीस कोठडीची मुदत संपल्यानंतर वेटर कामगार असलेल्या आरोपीची रवानगी येरवडा कारागृहात करण्यात आली आहे. न्यायालयीन कोठडीत आरोपीची रवानगी करण्याचे आदेश खेड सत्र न्यायालयाने दिले आहेत.

आरोपीच्या लैंगिक सक्षमतेची वैद्यकीय तपासणी करण्यात आली असून त्याचे डीएनए नमुने प्रादेशिक न्यायवैद्यक विज्ञान प्रयोगशाळेला पाठविण्यात आल्याची माहिती पोलिसांनी न्यायालयात दिली. तसेच घटनास्थळावरचे सीसीटीव्ही फुटेज तपासण्यात आले असल्याचे देखील पोलिसांनी न्यायालयात सांगितले. या प्रकरणात आरोपी असलेल्या ५४ वर्षीय वेटरला पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश न्यायालयाने दिले होते. पोलीस कोठडीची मुदत संपल्यानंतर त्याला न्यायालयात हजर केले असता त्याला न्यायालयीन कोठडीत ठेवण्याचे आदेश खेड सत्र न्यायालयाने दिले आहेत.

फाशीच्या शिक्षेची मागणी

- २५ डिसेंबरच्या दिवशी अंगणात खेळणाऱ्या दोन चिमुरडींना खाऊचे आमिष दाखवून आरोपीने त्यांना खोलीत नेले. तिथे सख्या बहिणींपैकी एका चिरमुडीवर लैंगिक अत्याचार केला. त्यानंतर दोन्ही बहिणींना पाण्याने भरलेला टाकीत बुडवून मारले. या प्रकरणानंतर राजगुरूनगरसह जिल्ह्यातून तीव्र स्वरुपाच्या प्रतिक्रिया उमटू लागल्या आहेत. आरोपीला फाशीची शिक्षा देण्याची मागमी केली जात आहे

जनजीवन विस्कळीत होऊ लागले आहे

ऊसतोडीने बिबटे झाले आहेत सैरभैर

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

दौंड : दौंड आणि शिरूर तालुक्याला वरदान ठरलेल्या मुळा – मुठा अन् भीमा नदीपट्ट्यात ऊसाचे क्षेत्र जास्त असल्याने बिबट्यासाठी लपणे अवघड होत आहे. त्यामूळे बिबट्यांची संख्या वाढतच चालली आहे. सध्या सर्वत्र ऊसतोड चालु असल्याने बिबटे सैरवैर होऊन बाहेर निघत आहेत.

पारगाव, नानगाव, राहु, देलवडी, पिंपळगाव अशा अनेक गावामध्ये बिबट्यांची मोठ्या प्रमाणावर दहशत निर्माण झालेली आहे. या सर्व प्रकारामुळे जनजीवन विस्कळीत होऊ लागले आहे. त्यामुळे 'बिबटे काही जगू देईनात' अशी अवस्था येथील नागरिकांची झाली आहे. भीमा व मुळा -मुठा नदीपट्ट्यात गेल्या अनेक वर्षांपासून बिबट्यांचा वावर आढळून येत आहे. मात्र अलीकडे जनावरांवर व माणसांवर बिबट्यांचे हल्ले वाढत चालले आहेत. त्यामुळे या भागातील नागरिकांसाठी बिबटे जीवघेणे ठरू लागले आहेत. दौंडच्या नानगाव, पारगाव, हातवळण, कानगाव, गार, तर शिरूमधील मांडवगण फराटा, वडगाव रासाई, नागरगाव, रांजणगाव सांडस हद्दीत पाळीव जनावरांचा बिबट्यांनी फडशा पाडला आहे.

तर कडेठाण येथील शेतकरी महिला, बोरीपार्धी येथे ऊसतोड कामगाराच्या लहान बालकासह मांडवगण फराटा येथील दोन लहान मुलांचा बिबट्याच्या हल्ल्यात मृत्यू झाला आहे. त्यामुळे गेल्या महिन्यापासून या भागातील नागरिक दहशतीखाली वावरत आहेत. बागायती भाग असल्याने बिबट्यांना अनुकूल वातावरण लाभत आहे. त्यांची पैदासही दिवसेंदिवस वाढत चालली आहे.

याचे उदाहरण म्हणजे ऊसतोड फडातून अनेक ठिकाणीं बिबट्यांची पिल्ले बाहेर पडताना दिसत आहेत.

बिबट्यांचे वाढते हल्ले पाहता नागरिकांना जीव मुठीत धरून जगावे लागत आहे. दिवसाही घराबाहेर पडणे धोकादायक बनले आहे. शेतीची कामे करणे देखील अवघड होऊन बसले आहे. बिबट्यांच्या वाढत्या संख्येवर वन विभाग अनेक उपाययोजना करत आहेत, परंतु त्याचा फारसा परिणाम जाणवत नाही. त्यासाठी ठोस उपाययोजना होईपर्यंत किती निष्पाप बळी जाणार? असा प्रश्न जनतेतून समोर येत आहे.

खुसखुशीत मशरूम पोहा कटलेट

रसगंधा

आपल्यापुढे संध्याकाळच्या स्नॅक्सचा प्रश्न आ वासून उभा असतो. चहाला आलेल्या पाहुण्यांना छानसा पदार्थ खिलवण्यासाठी मग यू ट्यूबवरचे रेसिपी व्हिडिओ धुंडाळले जातात. पाककलेची पुस्तकं चाळली जातात. पाहुण्यांसाठी काहीतरी हटके बनवण्याच्या विचारात असाल तर ही मशरूम पोहा कटलेट रेसिपी नक्की ट्राय करा.

साहित्य: दोन कप मशरूम, दीड कप पोहे, एक बारीक चिरलेला कांदा, अर्धा कप बारीक चिरलेली फरसबी, अर्धा कप किसलेलं गाजर, चमचाभर आल्याची पेस्ट, एक मिरची, अर्धा टी स्पून लाल तिखट, प्रत्येकी पाव चमचा गरम मसाला, चाट मसाला, आमचूर, चिरलेली कोथिंबिर, ब्रेड कम्स, तेल आणि चवीनुसार मीठ

कृती: पोहे पंधरा मिनिटं भिजवून ठेवा. चाळणीत ठेऊन पाणी काढून टाका. आता कढईत थोडं तेल गरम करा. कांदा सोनेरी रंगावर परतून घ्या. यात हिरव्या मिरचीचे तुकडे, गाजर, फरसबी आणि आल्याची पेस्ट घालून दोन ते तीन मिनिटं शिजवून घ्या. भाज्या शिजल्यावर गॅस बंद करा. हे मिश्रण थंड झाल्यावर त्यात मशरूमचे काप, लाल तिखट, गरम मसाला, चाट मसाला, आमचूर, पोहे,कोथिंबिर आणि मीठ घालून नीट मॅश करून घ्या. या मिश्रणाचे छोटे किंवा मध्यम आकाराचे चपटे गोळे करा. ब्रेड कम्सने कोटिंग करा. कढईत तेल गरम करा. त्यात हे गोळे तळून घ्या. हे कटलेट तुम्ही शॅलो फ्रायही करू शकता. सॉस किंवा चटणीसोबत खायला द्या.

लढा तंबाखू विरोधात

भारतात तोंडाच्या कॅन्सरचं प्रमाण बरंच जास्त आहे. गरीब घटकातली लहान मुलंही या कॅन्सरला बळी पडत आहेत. तंबाखूचं सेवन हे यामागचं महत्त्वाचं कारण. तंबाखूच्या दुष्परिणामांची या मुलांना अजिबात कल्पना नसते. तंबाखूमुळे नवी पिढी उध्वस्त होत असल्याचं पाहून डॉ. सुमेधा कुशवाह खूप अस्वस्थ झाल्या. तोंडाच्या कॅन्सरबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी त्यांनी कंबर कसली. याची चांगली फळं त्यांना मिळत आहेत.

मानिनी

व्यवसायाने डेंटिस्ट असणाऱ्या डॉ. सुमेधा कुशवाह तंबाखूचं व्यसन कमी करण्यासाठी प्रयत्नशील आहेत. समाजातल्या विविध घटकांना तंबाखूमुक्त आयुष्य जगण्यासाठी प्रोत्साहन देत आहेत. तंबाखूच्या दुष्परिणामांबाबत जागरूकता निर्माण करत आहेत. त्यांनी अनेकांना तंबाखूचं व्यसन सोडवायला मदत केली आहे. सुमेधा यांनी बीडीएस आणि एमडीएसची पदवी घेतली आहे. दिल्लीतल्या महाविद्यालयातून दंतवैद्यकशास्त्राची पदवी घेणाऱ्या सुमेधा यांना ओपीडीतल्या तपासणीदरम्यान तोंडाचा कॅन्सर झालेले किंवा कॅन्सर होण्याच्या टप्प्यापर्यंत पोहोचलेले बरेच रुग्ण भेटले. तंबाखूचं सेवन हे त्यांच्या कॅन्सरचं महत्त्वाचं कारण होतं. तोंडाच्या कॅन्सरच्या रुग्णांची ही वाढती संख्या सुमेधा यांना अस्वस्थ करून गेली. तंबाखूचा प्रभाव कमी करण्यासाठी काहीतरी करायला हवं हे तेव्हाच त्यांच्या मनात आलं.

तंबाखूच्या दुष्परिणामांबाबत जागरूकता निर्माण करण्याचे बरेच प्रयत्न होत असले तरी समाजातला एक मोठा घटक या व्यसनापासून मुक्त झालेला नाही. तंबाखू सोडण्याच्या दृष्टीने त्यांना कोणतंही मार्गदर्शन मिळत नाही. अशा वर्गासाठी काम करण्याचा निश्चय सुमेधा यांनी केला. एका आरोग्य शिबिरात त्यांना तोंडाच्या कॅन्सरने ग्रस्त असणारा १३ वर्षांचा मुलगा भेटला. त्याला तोंडही उघडता येत नव्हतं. वेदनेने विव्हळणाऱ्या त्या मुलाला बघून सुमेधा अक्षरश: हादरून गेल्या. तोंडाच्या कॅन्सरचं भयावह रूप त्यांच्या समोर होतं. गुटखा खाण्याचे परिणाम या मुलापर्यंत पोहोचलेच नव्हते. याच निष्काळजीपणाविरोधात सुमेधा यांना लढा उभा करायचा होता. तरुण मुलं आपलं आयुष्य अशाप्रकारे उध्वस्त करत असल्याचं त्यांना बघवलं नाही. म्हणूनच त्यांनी प्रशिक्षित समुपदेशक होण्याचा निर्णय घेतला.

या प्रशिक्षणासाठी त्या नावाजलेल्या रुग्णालयात रूजू झाल्या. या रुग्णालयात समुपदेशनासाठी येणाऱ्यांकडून मोठ्या प्रमाणात शुल्क आकारलं जायचं. गरीब घटकातल्या रुग्णांना एवढे पैसे परवडू शकत नव्हते. मधल्या काळात सुमेधाने तोंडाचा कॅन्सर आणि तंबाखू नियंत्रणाच्या क्षेत्रातल्या विविध एनजीओंसोबत काम केलं. मात्र त्यांना स्वत:च्या पद्धतीने बदल घडवायचा होता. यासाठी त्यांनी 'एम टू टर्मिनेट टोबॅको अँड कॅन्सर' (एटीटीएसी) या संस्थेची स्थापना केली. यात त्यांना त्यांच्या सहकाऱ्यांचीही साथ लाभली. त्यांच्या संस्थेला 'युवराज सिंह फाउंडेशन'कडून निधी मिळतो. विविध कॉर्पोरेट ऑफिसेसमध्येही त्यांची संस्था कार्यशाळेचं आयोजन करते. २०१४ मध्ये त्यांनी ही संस्था सुरू केली होती. आजवर त्यांनी ३० हजार लोकांना तंबाखू मुक्तीचा मार्ग दाखवला आहे. छोटी शहरं आणि गावांमध्ये त्यांना पोहोचायचं आहे. सुमेधा कुशवाह यांना आपला समाज तंबाखूमुक्त झालेला पहायचा आहे.

हेअर केअर

होममेड मिस्ट

केसांची चमक वाढवणारी बरीच उत्पादनं बाजारात मिळतात. पण त्यातली रसायनं घातक ठरू शकतात. म्हणूनच घरीच तयार केलेलं मिस्ट तुम्ही वापरू शकता. यासाठी तीन चमचे खोबरेल तेल आणि वाटीभर गुलाब पाणी घ्या. गुलाब पाण्यात खोबरेल तेल मिसळा. हे मिश्रण स्प्रे बॉटलमध्ये भरा. केस धुण्याच्या अर्धा तास आधी हा स्प्रे केसांवर फवारा. मग हलक्या हाताने मसाज करा. केस खूप कोरडे झाले असतील तर रोज रात्री केसांवर स्प्रे करून मसाज करा. केस शँपूने धुतल्यानंतरही स्प्रे करा. यामुळे केस मुलायम होतील.

स्मार्ट टिप्स

बॅकलेस घालण्याआधी...

बॅकलेस ब्लाउज किंवा ड्रेस घालण्याआधी पाठीचं सौंदर्य खुलवायला हवं. पाठीवर पुरळ किंवा ब्लॅकहेड्स असतील तर दिवसातून दोन वेळा आंघोळ करा. नियमितपणे बॅक स्क्रबिंग करून घ्या. यासाठी संत्र्याची सालं वाळवून पूड करून घ्या. त्यात दूध मिसळून पेस्ट तयार करा. आठवड्यातून दोन वेळा पाठीला लावा. स्क्रब केल्यामुळे पाठीचा रक्तप्रवाह सुरळीत सुरू राहील. पाठीला ॲलोव्हेरा जेलने मसाज करता येईल किंवा एखादा पॅकही लावता येईल. तुम्ही पील ऑफचा वापरही करू शकता. बॅकलेस घालण्याआधी पाठीला चेहऱ्याप्रमाणे मेक अप करा. फाउंडेशन, कॉम्पॅक्ट लावा. पाठ चमकदार दिसण्यासाठी शिमर लूक देणारं लोशनही लावता येईल. पाठीचं ब्लीचही करून घ्या.

हेल्दी लाईफ

पर्याय गव्हाच्या पोळीला...

वजन कमी करण्यासाठी आहारातलं कर्बोदकांचं प्रमाण कमी करावं लागतं. गव्हाच्या पोळीत कर्बोदकांचं प्रमाण जास्त असतं. त्यातच नेहमी गव्हाची पोळी खाऊन खूप कंटाळा येतो.

अशा वेळी तुम्ही लो कॅलरी आणि लो कार्ब धान्यांपासून पोळी किंवा भाकरी बनवू शकता. नाचणीची भाकरी हा पोळीला खूप चांगला पर्याय ठरेल. विविध जीवनसत्त्वं आणि खनिजांची युक्त नाचणी वजन कमी करणाऱ्यांसाठी वरदान आहे. सोयाबिनच्या पीठापासून पोळ्या करता येतील. ओट्सची बिस्किटं, कुकीज, एनर्जी बार लोकप्रिय आहेत. त्याचप्रमाणे याच्या पोळ्याची करता येतील. ओट्सची चव आवडत नसेल तर कणकेत थोडं ओट्सचं पीठ मिसळता येईल.

आयडियाज फॉर रिनोव्हेशन

घरातला तोचतोपणा कंटाळवाणा वाटू लागतो तेव्हा रिनोव्हेशन करावंसं वाटू लागतं. कल्पनेत हे जितकं रम्य असतं त्यापेक्षा वास्तव भयानक असतं कारण एकदा रिनोव्हेशन सुरू झालं की ॲडव्हान्सच्या नोटा मोजताना मिळालेलं 'मॅडमजी दस दिन में काम निपटेगा, फिकर मत किजिए' हे वचन चक्रवाढव्याज साचल्यासारखं वाढत जातं आणि त्यावर दिवसांचंच काय पण आठवड्यांचं व्याज चढायला लागतं! दहा दिवसांचा वायदा असतो. त्यामुळे सातव्या दिवसापासून आपला काऊंटडाऊन सुरू होतो आणि बाराव्या-तेराव्या दिवशीही काम निपटलेलं नसतं तेव्हा तर आपला मिस्त्रीसोबत रितसर पंगाच होतो. घरात जिकडे तिकडे सांडलेलं सिमेंट, भिंतीवरचे थर, पाणी आणि हत्यारांची कचकच हे सगळं असह्य होऊन 'उचल तुझं सामान आणि चालू लाग' असं सांगण्याचा मोह आवरत नाही; पण करता काय? हे सगळं आपल्याला करता येण्यासारखं नसतं. घराचं रिनोव्हेशन करणाऱ्या सर्वांचंच हे असं होतं. या सगळ्यात कमीत कमी त्रास व्हावा असं वाटत असेल तर योग्य 'प्लॅनिंग' सर्वात महत्वाचं. पहिला नियम म्हणजे सगळं काम एकदम काढू नका. एकाच फटक्यात सगळं होऊन जाईल हे ऐकायला बरं वाटत असलं तरी हा फटका किती दिवसांचा असू शकतो याला काही मर्यादा असत नाही. म्हणून प्लॅनिंग करताना नेमकी काय काय कामं करायची आहेत याची यादी बनवा आणि ती बनवताना मोठी कामं वेगळी आणि लहान कामं वेगळी काढा. लहान सहान कामं आधी करून घ्या. स्वीच बोर्ड बदलणं, प्लंबिंग किंवा तत्सम कामं आधी करवून घ्या. भिंतीच्या फोडाफोडीची आणि बांधण्याची कामं आणि रंगकाम एका फटक्यात करा. ही कामं शक्यतो प्रोफेशनल सर्व्हिसकडून करवून घ्या कारण सामान हलवण्याचं मोठं काम परस्पर होणार असतं. शिवाय दिलेल्या मुदतीच्या फार फार तर एक-दोन दिवस इकडे तिकडे होऊन ते पूर्ण होतं. सर्वात महत्वाचं म्हणजे ज्याप्रमाणे खर्च थोडा फार कमी जास्त होतो तसंच हे दिवसांचं गणितही गडबडणार असतं हे गृहीत धरा. म्हणून समोरचा दहा दिवस सांगत असेल तर तुमची तयारी पंधरा दिवसांची ठेवा.

लक्षात घ्या

सुरू करा मेहंदीचा व्यवसाय

नोकरीसोबत एखादा जोड व्यवसाय करण्याचा विचार असेल किंवा नव्याने व्यवसाय सुरू करण्याच्या प्रयत्नात असाल तर मेहंदी विक्रीचा चांगला पर्याय तुमच्याकडे आहे. आपल्या संपर्काच्या बळावर हा व्यवसाय पुढे नेता येईल. मेहंदी विक्रीच्या व्यवसायाबाबतचं हे मार्गदर्शन...

❊ मेहंदीच्या बाजारपेठेत अजून विशिष्ट ब्रँडने स्वत:ची मक्तेदारी प्रस्थापित केलेली नाही. त्यामुळे साध्या मेहंदीचीही मोठ्या प्रमाणावर विक्री होते. म्हणूनच या क्षेत्रात स्वत:चं स्थान निर्माण करताना फारशा अडचणी येणार नाहीत. वितरणाच्या कक्षा विस्तारून तुम्ही तुमचे मेहंदी कोन विविध ठिकाणी विक्रीसाठी ठेऊ शकता.

❊ मेहंदीचा उद्योग सुरू करण्यासाठी फार भांडवल आणि उपकरणांची गरज नसते. यात सर्वात महत्त्वाचा असतो तो कच्चा माल म्हणजे मेहंदीची पानं. तसंच मेहंदीचा दर्जा वाढवण्यासाठी लागणाऱ्या काही वस्तू तसंच पॅकिंगसाठी प्लास्टिक आणि इतर साधनं घेतली की तुम्ही व्यवसाय सुरू करू शकता. यासोबतच पल्वरायझर मशीन, मेहंदीतला कचरा चाळण्यासाठी चाळणी, वजनकाटा आणि मेहंदीची पाकिटं सील करण्यासाठी पाऊच सीलिंग मशीन लागेल.

स्कील डेव्हलपमेंट

❊ मेहंदीच्या पानांपासून त्याची पूड तयार करण्यासाठी लागणारं युनिट बसवणं फार कठीण नाही. तसंच यासाठी फार जागाही लागत नाही. फक्त युनिट असणाऱ्या ठिकाणी भरपूर सूर्यप्रकाश यायला हवा.

❊ मेहंदीची पानं तुम्ही विक्रेत्यांकडून विकत घेऊ शकता. शक्य असेल तर मेहंदीची लागवडही करू शकता. मेहंदीच्या पानांचे तीन प्रकार असतात. काळे डाग पडलेली पानं हलक्या दर्जाची मानली जातात तर हलकी पिवळी झालेली पानं मध्यम दर्जाची असतात. मेहंदीच्या हिरव्यागार पानांचा दर्जा सर्वोत्तम असतो. मेहंदी तयार करण्यासाठी ही पानं वेगळी करून सुकवून घ्या. मशीनमध्ये टाकून मेहंदी पावडर तयार करा. ही पावडर चाळून घ्या. वजनाप्रमाणे पॅक करा. मेहंदीची ही पाकिटं दुकानांमध्ये विक्रीसाठी पाठवता येतील.

बाळाच्या जन्माआधी...

गर्भारपण हा प्रत्येक आईसाठी आनंदाचा अनुभव असतो असं नाही. अनेकजणी या कालावधीत अनेक प्रकारच्या तणावातून जात असतात. काहीजणींना नोकरीच्या ठिकाणी तणावाला सामोरं जावं लागतं तर काहीजणींना कौटुंबिक कलहाच्या तणावाला. आपल्याकडे म्हणजे भारतीय समाजात असं मानण्यात येतं की भावी मातेनं नऊ महिन्यांच्या कालावधीत नेहमी हसतं खेळतं असलं पाहिजे. तज्ज्ञांच्याही मते भावी आईचे हे नऊ महिन्यातले मनाचे खेळ बाळाच्या आयुष्यावर कायमस्वरुपी परिणाम करत असतात. म्हणून या नऊ महिन्यात तिनं तणाव दूर ठेवत हर प्रकारे आनंदी रहाण्याचा प्रयत्न केला पाहिजे. आवडतं संगीत, आवडती पुस्तकं वाचून किंवा खावंसं वाटतं ते तब्येतीची काळजी घेत खाऊन, प्रिय व्यक्तींच्या सानिध्यात राहून आनंद मिळवला पहिजे. गर्भारपणात ज्या माता तणावातून जातात त्यांची मुलं कुरकुरी, छोट्या छोट्या प्रसंगातही भेदरणारी असण्याच्या शक्यता जास्त असतात. बाळाला काहीही लागलं, दुखलं-खुपलं किंवा भीती वाटली तर ते आईच्या कुशीत आल्यानंतर शांत होतं. ही सुरक्षिततेची भावना त्याला पोटात असल्यापासूनच होत असते असं तज्ज्ञांचं मत आहे. पोटात असताना आईचा हळूवार स्पर्श आणि त्याच्याशी संवाद साधणं त्याला थेटपणानं समजत नसलं तरी या भावनेचा आणि लहरींचा सकारात्मक परिणाम बाळावर होत असतो असं त्यांचं मत आहे. मुलांच्या भावनिक समस्यांचा अभ्यास करणाऱ्यांच्या मते बहुतेक वेळा अशा मुलांच्या समस्यांचं मूळ त्यांच्या गर्भातल्या असुरक्षिततेच्या भावनेशी जाऊन मिळतं. भावी आयुष्यात ही मुलं तणावाला कशी सामोरी जाणार हेदेखील याच कालावधीतल्या असुरक्षिततेशी जाऊन मिळतं असं त्यांचं मत आहे. मँचेस्टर येथील एका महाविद्यालयात पहिलटकरीण आणि तिचे भावनिक तणाव आणि मुलाची पहिल्या वर्षातली भावनिक वाढ याबाबत एक अभ्यास केला गेला. त्यावेळी असं दिसून आलं की, ज्या माता नऊ महिने तणावात होत्या त्यांची मुलं जास्त रागीट, आक्रमक आणि 'डिप्रेशन प्रोन' होती. याच अभ्यासादरम्यान असं निदर्शनास आलं की आई तणावात असली आणि तिनं बाळाला थोपटलं तर त्याचाही सकारात्मक परिणाम दिसून येतो. सात महिन्याची गर्भवती आपल्या पोटावर बाळाला थोपटल्याप्रमाणे अलगद थोपटते आणि लाड करते त्यावेळेस बळाच्या हार्टरेटमध्ये फरक दिसून आला.

काळजी घ्या

एकटं वाटतंय!

मी २३ वर्षांची तरुणी असून फ्रान्समध्ये उच्च शिक्षण घेते आहे. इथे मला मित्रमैत्रिणी मिळाले आहेत. भारतातल्या एका मुलासोबत मी लाँग डिस्टंस रिलेशनशीपमध्ये आहे. त्याच्या आणि भारतातल्या इतर मित्रमैत्रिणींच्या मी सतत संपर्कात असते. हे सगळं करूनही मला इथे खूप एकटं वाटतं. इथलं सर्व काही सोडून भारतात निघून जावं असं सतत वाटत रहातं. व्यस्त रहाण्यासाठी मी छंदवर्गांना जाते. पार्ट टाईम जॉबही करते. पण एकटेपणा मला खात रहातो. ही स्थिती नॉर्मल आहे का? मी मानसोपचारतज्ज्ञाकडे जायला हवं का? मला मार्गदर्शन करा.

– परदेशात गेल्यानंतर एकटेपणा जाणवणं नैसर्गिक आहे. आपल्या माणसांपासून, संस्कृतीपासून लांब गेल्याने नैराश्य येणं अगदी स्वाभाविक आहे. मला वाटतं तू स्वत:ला वेळ द्यायला हवा. तुझ्या मनातल्या विचारांचा उहापोह करणंही गरजेचं आहे. सर्वात आधी तू तुझे प्राधान्यक्रम ठरव. फ्रान्समध्ये शिक्षण घेणं तुझी प्रायोरिटी असेल तर तिथल्या वातावरणाशी जुळवून घे. भारतात परतल्याने तुझं भलं होणार असेल तर तोही विचार कर. घरच्यांशी बोल. तू मानसोपचारतज्ज्ञांची मदत घेऊ शकतेस. भारताला, आपल्या संस्कृतीला मिस करत असशील तर फ्रान्समधल्या भारतीयांशी संपर्क साध. त्यांच्यात मिसळण्याचा प्रयत्न कर. भारतीय मुलंही तुझ्यासोबत असतील. त्यांच्याशी मैत्री कर. काही काळानंतर तुला तिथल्या परिस्थितीशी नक्कीच जुळवून घेता येईल.

समुपदेशन

गेट रेडी फॉर वीकेंड

वीकेंडला एखादा प्लॅन ठरल्यावर ऑकेजनला साजेशा पेहरावाचा शोध सुरू होतो. अशावेळी नेहमीच्या फॉर्मल्सपेक्षा काहीतरी ट्रेंडी, हटके घालण्याची संधी असते. उन्हाळ्यात तर हमखास वीकेंड प्लॅन्स ठरतात. कुटुंबिय, मित्रमैत्रिणींसोबत पिकनिक, ब्रंच किंवा शॉपिंगला जायचं असेल तर पेहरावही मोकळाढाकळा हवा. वीकेंड फॅशनच्या या काही टिप्स...

❊ आरामदायी, स्टायलिश आणि ट्रेंडी अशा तिन्ही गोष्टींचा मेळ साधायचा असेल तर शर्ट ड्रेसला पर्याय नाही. शर्ट ड्रेसची सध्या प्रचंड क्रेझ आहे. तुम्हाला शर्ट आवडत असेल पण जीन्स किंवा ट्राउझर घालायचा कंटाळा आला असेल तर शर्ट ड्रेस ट्राय करा. हा पेहराव तुम्हाला सॉफिस्टिकेट लूक देईल. फिटिंगवाला किंवा थोडा ढगळ शर्ट ड्रेस घ्या. त्यावर बेल्ट बांधा. मोजक्या ॲक्सेसरीज घाला. तुमची फॅशन नक्कीच लक्षवेधी ठरेल.

❊ यंदा डंगरीची फॅशनही इन आहे. डंगरी हा प्रकार बऱ्याच वर्षांपासून चलनात असला तरी यंदा त्याचे अनेकविध पर्याय पहायला मिळत आहेत.

❊ फ्लोरलला प्रचंड डिमांड असते. एखाद्या संध्याकाळी मस्त हवेत उडणारा, झुळझुळता फ्लोरल ड्रेस घाला. मुलायम अशा शीर फॅब्रिकचे फ्लोरल ड्रेस खूप छान दिसतील. कंफर्टसाठी कॉटन ड्रेस ट्राय करा.

स्टाईल स्टेटमेंट

❊ चारचौघींमध्ये उठून दिसायचं असेल तर जंपसूट घाला. फॉर्मल आणि कॅज्युअल अशा दोन्ही ऑकेजन्सना जंपसूट चालून जातो. हा पेहराव दिवसभर कॅरी करता येईल. दिवसभर शॉपिंग केल्यानंतर रात्री डिनरचा कार्यक्रम असेल तरी तुम्ही जंपसूट घालू शकता.

❊ तुम्ही क्रॉप टॉपही वेगवेगळ्या पद्धतीने ट्राय करू शकता. या टॉपवर डेनिम जॅकेट किंवा श्रग घालता येईल. क्रॉप टॉपमध्ये तुम्ही ट्रेंडी दिसाल.

चेहरा निस्तेज दिसतोय?

जुने फोटो बघताना आपण किती बारीक होतो, आपली त्वचा कशी नितळ आणि तजेलदार दिसायची असे विचार मनात रूंजी घालत रहातात. काळाच्या ओघात त्वचा निस्तेज दिसू लागते. तरुण वयातलं चेहऱ्यावरचं तेज कुठेतरी गायब होतं. यामागे बरीच कारणं असतात. अर्थात त्वचेच्या समस्यांवर उपायही आहेतच. त्वचा निस्तेज होण्यामागची कारणं आणि त्यावरचे उपाय जाणून घेऊ या.

❊ मृत पेशी हे त्वचा निस्तेज दिसण्याचं महत्त्वाचं कारण आहे. त्वचेतल्या या मृतपेशी साठून राहिल्याने चेहऱ्याचा तजेला हरपतो. चेहरा काळपट दिसू लागतो. मृतपेशी काढून टाकण्यासाठी आठवड्यातून एक किंवा दोनवेळा चेहरा एक्सफोलाइट करायला हवा. संवेदनशील त्वचा असेल तर होममेड स्क्रब्ज वापरा. नियमित स्क्रबिंगमुळे मृत त्वचेचा प्रभाव कमी होईल. उन्हाचे दुष्परिणाम टाळण्यासाठी स्क्रबिंग शक्यतो रात्री करा.

❊ ओलावा कमी झाल्यामुळेही त्वचा निस्तेज आणि कोरडी दिसू लागते. हे टाळण्यासाठी भरपूर पाणी प्या. दररोज सकाळी आणि रात्री चेहऱ्याला मॉईश्चरायझर लावा. यानंतरही कोरडेपणा दूर होत नसेल तर मॉईश्चरायझर लावण्याआधी फेस ऑईल्स आणि सिरम्सचा वापर करा.

❊ उन्हामुळे त्वचेचं सर्वात जास्त नुकसान होतं. पुरेशा काळजीअभावी चेहऱ्यावर काळे डाग पडणं, हायपरपिंग्मेंटेशनसारख्या समस्या डोकं वर काढतात. सातत्याने उन्हात फिरल्याने चेहरा पार काळवंडून जातो. उन्हात जाणं टाळता येत नाही. पण सन्सक्रीनचा पर्याय तुमच्याकडे आहे. उन्हामुळे स्कीन कॉलाजेनचं संतुलन बिघडतं. कॉलाजेनचं नुकसान टाळण्यासाठी त्वचातज्ज्ञाच्या सल्ल्याने रेटिनॉलयुक्त उत्पादनांचा वापर करता येईल.

❊ वाढतं प्रदूषण हे सुद्धा त्वचेच्या समस्यांचं महत्त्वाचं कारण आहे. प्रदूषित घटकांमुळे त्वचेवर फ्री रॅडिकल्सची निर्मिती होते. यामुळे कॉलाजेनचं नुकसान होतं. परिणामी स्कीनटोनचं संतुलन बिघडतं. प्रदूषणाचा परिणाम कमी करण्यासाठी घरी आल्यावर चेहरा धुवून घ्या. यामुळे त्वचेवरची धूळ आणि प्रदूषित घटक स्वच्छ होतील. क जीवनसत्त्वयुक्त सिरम्स आणि लोशन्सचा वापर प्रभावी ठरू शकेल.

❊ ताणामुळेही त्वचा निस्तेज होते. शरीरात स्ट्रेस हार्मोन्सचं प्रमाण वाढलं की चेहऱ्याला होणाऱ्या रक्तप्रवाहाचं प्रमाण कमी होतं आणि त्वचा काळपट दिसू लागते. ताण कमी करण्यासोबतच रक्तपुरवठा सुधारण्यासाठी चेहरा धुताना तसंच मॉईश्चरायझर लावताना हलक्या हातांनी मसाज करा. यामुळे चेहऱ्याची चमक परत येईल.

ब्युटी टॉक

At a Glance

आसाममध्ये हत्तींची संख्या ५,८२८ वर

गुवाहाटी : आसाममध्ये हत्तींची संख्या गेल्या सात वर्षांतील ५,७१९ वरून ५,८२८ वर पोहोचली आहे, अशी माहिती आसामचे मुख्यमंत्री हिमंत बिस्वा सरमा यांनी गुरुवारी दिली. २०२४ मध्ये वन विभागाच्या हत्ती लोकसंख्या अंदाजानुसार हत्तींच्या संख्येत वाढ झाल्याचे दिसून आले असून त्यापैकी ३६ टक्के प्रौढ मादी आहेत.

एस. व्ही. शेखर यांच्या शिक्षेवर शिक्कामोर्तब

चेन्नई : मद्रास उच्च न्यायालयाने अभिनेते आणि भाजप पदाधिकारी एस. व्ही. शेखर यांना सोशल मीडिया पेजवर महिला पत्रकारांबद्दल आक्षेपार्ह पोस्ट शेअर केल्याप्रकरणी न्यायालयाने सुनावलेल्या एक महिन्याच्या कारावासाच्या शिक्षेवर शिक्कामोर्तब केले. न्यायमूर्ती पी. वेलमुरुगन यांनी कनिष्ठ न्यायालयाच्या आदेशावर शिक्कामोर्तब करताना फौजदारी याचिका फेटाळून लावली.

उत्तर नेपाळमध्ये भूकंप

काठमांडू : उत्तर नेपाळमध्ये गुरुवारी ४.८ रिश्टर स्केल तीव्रतेच्या भूकंपाचे धक्के जाणवले असून काठमांडू आणि आसपासच्या जिल्ह्यांतील नागरिकांना भूकंपाचे धक्के जाणवले. नॅशनल सिस्मोलॉजिकल रिसर्च सेंटरने दिलेल्या माहितीनुसार, दुपारी १ वाजून २ मिनिटांनी भूकंपाची नोंद झाली असून या भूकंपाचा केंद्रबिंदू काठमांडूपासून ७० किलोमीटर उत्तरेला आहे.

१२ डिसेंबर रोजी सरन्यायाधीशांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठाने १९९१ च्या कायद्याविरोधात अशाच प्रकारच्या याचिकांवर सुनावणी करताना सर्व न्यायालयांना धार्मिक स्थळे, विशेषत: मशिदी आणि दर्गा परत मिळविण्याच्या प्रलंबित खटल्यांमध्ये नवीन खटले चालविण्यास आणि कोणतेही अंतरिम किंवा अंतिम आदेश देण्यास मनाई केली. प्रार्थनास्थळे (विशेष तरतुदी) अधिनियम, १९९१ च्या विविध तरतुदींना आव्हान देणाऱ्या वकील अश्विनी उपाध्याय यांनी दाखल केलेल्या याचिकेसह सुमारे सहा याचिकांवर विशेष खंडपीठ सुनावणी करीत होते.

फेरसर्वेक्षणाची मागणी फेटाळली

सर्वोच्च न्यायालयात ओवेसींची याचिका, १७ तारखेला होणार सुनावणी

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

संग्रहित छायाचित्र

नवी दिल्ली : वाराणसी, मथुरा, संभल आणि अजमेर सारख्या शहरांमधील मशिदींच्या सर्वेक्षणाची चौकशी करण्याची मागणी करणारी एमआयएमचे प्रमुख असदुद्दीन ओवेसी यांची याचिका सर्वोच्च न्यायालयाने गुरुवारी फेटाळून लावली. न्यायालयाने या प्रकरणाची सुनावणी घेण्याचे मान्य केले आणि १७ फेब्रुवारीची तारीख निश्चित केली. केंद्र सरकारने प्रार्थनास्थळांबाबत १९९१ च्या कायद्याची योग्य अंमलबजावणी करावी, अशी मागणी ओवेसी यांनी केली. त्यासाठी न्यायालयाने आदेश द्यावेत, जेणेकरून अनेक मशिदींवर निर्माण होणारे वाद संपुष्टात येतील. त्यावर खंडपीठाने म्हटले की, यासंदर्भात यापूर्वी दाखल करण्यात आलेल्या अनेक याचिकांवर सुनावणी घेऊन ती जोडण्यास आम्ही तयार आहोत. न्यायालयाने आता पुढील सुनावणी १७ फेब्रुवारी ला ठेवली आहे. १९९१ च्या प्रार्थनास्थळ कायद्यात १५ ऑगस्ट १९४७ रोजी एखाद्या ठिकाणचे धार्मिक स्वरूप टिकवून ठेवण्याची तरतूद आहे.

सरन्यायाधीश संजीव खन्ना आणि न्यायमूर्ती संजय कुमार यांच्या खंडपीठाने ओवेसी यांची नवी याचिका या प्रकरणातील प्रलंबित प्रकरणांशी जोडण्याचे आदेश दिले आणि या प्रकरणाची सुनावणी १७ फेब्रुवारी रोजी होईल, असे सांगितले. एआयएमआयएमचे अध्यक्ष ओवेसी यांच्यावतीने वकील निजाम पाशा यांनी सांगितले की, न्यायालय या विषयावर विविध याचिकांवर विचार करत आहे आणि त्यास नवीन याचिकादेखील जोडली जाऊ शकते. त्यावर सरन्यायाधीश खन्ना म्हणाले की, आम्ही हे प्रकरण इतर संबंधित बाबींसह जोडत आहोत. ओवेसी यांनी वकील फुजैल अहमद अय्युबी यांच्यामार्फत १७ डिसेंबर २०२४ रोजी याचिका दाखल केली होती. मात्र, १२ डिसेंबर रोजी सरन्यायाधीशांच्या नेतृत्वाखालील खंडपीठाने १९९१ च्या कायद्याविरोधात दाखल करण्यात आलेल्या अशाच प्रकारच्या अनेक याचिकांवर सुनावणी करताना सर्व न्यायालयांना धार्मिक स्थळे, विशेषत: मशिदी आणि दर्गा इतर समुदायांद्वारे परत मिळविण्याच्या प्रलंबित प्रकरणांमध्ये नवीन खटल्यांचा विचार करण्यास आणि कोणताही अंतरिम किंवा अंतिम आदेश देण्यास मनाई केली.

विशेष खंडपीठात सहा याचिकांवर सुनावणी झाली. या याचिकांमध्ये अधिवक्ता अश्विनी उपाध्याय यांनी प्रार्थनास्थळे (विशेष तरतुदी) अधिनियम, १९९१ मधील विविध तरतुदींना आव्हान देणारी मुख्य याचिका देखील समाविष्ट आहे. १९९१ च्या कायद्यानुसार कोणत्याही प्रार्थनास्थळाच्या धार्मिक स्वरूपात बदल करण्यास मनाई आहे. १९९१ च्या कायद्यात कोणत्याही प्रार्थनास्थळाचे धार्मिक स्वरूप १५ ऑगस्ट १९४७ प्रमाणे राखण्याची तरतूद आहे. ओवेसी यांच्या वकिलांनी सांगितले की, त्यांनी आपल्या याचिकेत या कायद्याची प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित करण्याचे निर्देश केंद्राला द्यावेत, अशी मागणी केली आहे. ओवेसी यांनी हिंदू पक्षकारांनी दाखल केलेल्या याचिकांवर अनेक न्यायालयांनी मशिदींचे सर्वेक्षण करण्याचे आदेश दिल्याच्या प्रकरणांचा ही उल्लेख केला.

● पीव्ही नरसिंह राव पंतप्रधान असताना १९९१ मध्ये काँग्रेस सरकारच्या काळात प्रार्थनास्थळ कायदा आणला गेला आणि राम मंदिर-बाबरी मशीद वाद शिगेला पोहोचला होता. देशभरात वाढत्या मंदिर-मशिदीच्या वादामुळे तणावाचे वातावरण निर्माण होत असल्याने हा कायदा संमत करण्यात आला होता. भारतातील धार्मिक वास्तू १९४७ मध्ये जशाच्या तशाच राहायला हव्यात आणि त्यांचे मूळ स्वरूप कोणीही बदलू शकत नाही किंवा त्यावर दावा करू शकत नाही, असे या कायद्यात नमूद करण्यात आले आहे. अशा धार्मिक स्थळात बदल किंवा हटविण्याची मागणी करणारी कोणतीही याचिका फेटाळली जाईल. या नियमाचे उल्लंघन केल्यास दंड किंवा तीन वर्षांपर्यंत तुरुंगवास होऊ शकतो.

राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी पदभार स्वीकारला

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



मुंबई : राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी आज मंत्रालयात नगर विकास वाहतूक, सामाजिक न्याय, वैद्यकीय शिक्षण, अल्पसंख्यांक या विभागाचा पदभार स्वीकारला.

संबंधित विभागाचा आढावा घेऊन नागरिकांच्या समस्या सोडविण्यासंदर्भात आणि त्यांना सोयी सुविधा पुरवण्या संदर्भात कार्यवाही करणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. जनतेच्या हिताचे निर्णय घेऊन त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

साखर उत्पादनात कोल्हापूरची आघाडी

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : राज्यात सध्या सुरू असलेल्या साखर हंगामामध्ये ३१ डिसेंबरअखेर २९ लाख १५ हजार मेट्रिक टन साखर उत्पादन झाले आहे. यात ७ लाख ९६ हजार मेट्रिक टन साखर उत्पादन असलेल्या कोल्हापूर विभागाने राज्यात बाजी मारली आहे. याखेरीज कोल्हापूर जिल्ह्यातील साखरेचा १०.१३ टक्के उताराही राज्यात अव्वल आहे. महाराष्ट्र राज्य साखर आयुक्तालयाने ही माहिती दिली आहे.

राज्याच्या साखर हंगामाला यंदा विधानसभा निवडणुकीमुळे उशिरा सुरुवात झाली. सुमारे ३ आठवडे हंगाम लांबल्यामुळे गतवर्षीच्या तुलनेत ९ लाख १४ हजार मेट्रिक टन साखर उत्पादन कमी झाले. या घटत्या उत्पादनाला साखरेचा लांबलेला हंगाम जसा कारणीभूत आहे, तसे इथेनॉलकडे मोठ्या प्रमाणात वळणारा ऊसही कारणीभूत आहे. राज्यात पुणे विभाग ७ लाख ३६ हजार मेट्रिक टन साखर उत्पादनासह दुसऱ्या स्थानावर, तर सोलापूर विभागात राज्यातील सर्वाधिक साखर कारखाने असूनही तेथे उत्पादन ४ लाख ५२ हजार मेट्रिक टनावर आहे. हा विभाग तिसऱ्या स्थानावर आहे.

खलिस्तान्यांचा नवा राजकीय पक्ष

१४ जानेवारीला घोषणा होण्याची अपेक्षा

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

नवी दिल्ली : खलिस्तानी अमृतपाल सिंग आता पंजाबमध्ये मोठ्या राजकीय योजना राबवत आहे. त्यासाठी ते राजकीय पक्ष स्थापन करण्याच्या तयारीत असून, त्याची घोषणा त्यांच्यावतीने १४ जानेवारीला होऊ शकते. मुक्तसर साहिब येथे होणाऱ्या माघी मेळाव्यात अमृतपाल सिंह आपल्या नव्या पक्षाच्या स्थापनेची घोषणा करतील. या जत्रेत शीख समाजातील लोक मोठ्या संख्येने जमतात. हा सण लोहडीच्या निमित्ताने साजरा केला जातो आणि पंजाबमध्ये याला खूप महत्त्व आहे. याशिवाय अमृतपाल सिंह यांचे वडील आणि त्यांच्या समर्थकांनी पंथ बचाओ, पंजाब बचाओ रॅलीचे ही आयोजन केले आहे. पक्षाच्या स्थापनेची घोषणा अमृतपाल सिंह यांचे कुटुंबीय आणि समर्थक करणार आहेत. अमृतपाल सिंह सध्या आसामच्या दिब्रुगड तुरुंगात आहे. त्याच्याविरोधात रासुका लावण्यात आला होता.

२०२४ च्या सार्वत्रिक निवडणुकीत अमृतसर सिंह यांनी खडूर साहिब लोकसभा मतदारसंघातून विजय मिळवला. ते अजूनही तुरुंगातच होते पण त्यांच्या कुटुंबीयांनी प्रचार केला आणि ते मोठ्या मताधिक्याने विजयी झाले. अमृतपाल सिंह यांचे वडील तरसेम सिंह यांचे सहकारी सुखविंदर सिंग अगवान यांनी राजकीय पक्ष स्थापन केल्याच्या वृत्ताला दुजोरा दिला आहे. सुखविंदर सिंग अगवान हेही कट्टरपंथी विचारसरणीचे आहेत. ते माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या हत्येत सहभागी असलेले सतवंत सिंह यांचे पुतणे आहेत. सुखविंदर सिंग यांचे अमृतपाल सिंग आणि त्यांच्या कुटुंबाशी खूप जवळचे संबंध आहेत. आतापर्यंत मिळालेल्या माहितीनुसार तरसेम सिंह, त्यांचे कुटुंबीय आणि अमृतपाल सिंह यांच्या समर्थकांच्या उपस्थितीत पक्षस्थापनेची घोषणा केली जाणार आहे. तरसेम सिंह यांनी ऑक्टोबर २०२४ मध्येच पक्ष स्थापन करण्याचा इरादा व्यक्त केला होता. आम्ही पंजाबभर फिरून लोकांशी बैठका घेणार आहोत. त्यानंतरच पक्ष कसा स्थापन करायचा आणि कोणाला सोबत घ्यायचे याचा निर्णय घेतला जाईल. संप्रदायाच्या रक्षणासाठी आपले जीवन समर्पित करण्यास तयार असलेल्यांना आम्ही प्राधान्य देऊ, असे ते म्हणाले.

पंजाबचे राजकारण समजून घेणाऱ्यांचे म्हणणे आहे की, अकाली दल कमकुवत झाल्यानंतर पंजाबमध्ये जातीय राजकारणाला वाव मिळाला आहे.

मध्यवर्ती बँकेची सांगलीत कारवाई

सांगली : जिल्हा मध्यवर्ती बँकेने गेल्या वर्षभरात बड्या बिगर शेती थकीत कर्जदारांवर वसुलीसाठी कारवाईची मोहीम राबवली. मोठ्या थकबाकीदार ९ संस्थांवर कारवाई करत त्यांच्याकडून तब्बल १३० कोटी ४७ लाख रुपयांची कर्ज वसुली केली आहे. या सर्व संस्था एनपीएमधील आहेत.

जिल्हा मध्यवर्ती बँकेने शेतीसह बिगर शेती कारणांसाठी मोठ्या प्रमाणात कर्ज पुरवठा केला आहे. जिल्ह्यात शेतीसाठी ८० टक्के कर्ज पुरवठा जिल्हा बँकेच्या माध्यमातून केला जातो. यात अल्प, मध्यम व दीर्घ मुदतीच्या कर्जांचा समावेश आहे. यातील पीक कर्ज वाटपात जिल्हा बँकेला दरवर्षी कोट्यवधी रुपयांचा तोटा सहन करावा लागतो.

एलन मस्क यांनी केला नावात बदल; नेटीझन्सची केली प्रश्नांची सरबत्ती

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

नवी दिल्ली : इलॉन मस्क यांनी मंगळवारी एक्सवरील प्रोफाइलमध्ये आपले नाव बदलून केकियस मॅक्सिमस असे केल्यानंतर, नेटीझन्सकडून प्रतिक्रियांचा पाऊस पडला आहे.

जगातील सर्वात श्रीमंत व्यक्ती म्हणून एलन मस्क यांना ओळखले जाते. मस्क यांचे सुमारे २१० दशलक्ष फॉलोअर्स असून, त्यांनी आपला प्रोफाइल अवतार बदलला असून, ग्लॅडिएटरसारखे कवच परिधान केलेल्या लोकप्रिय पेपे द फ्रॉग पात्राची प्रतिमा देखील दर्शविली आहे. नवनिर्वाचित राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचे निकटवर्तीय म्हणून मस्क ओळखले जातात. त्यांनी अचानक नाव का बदलले याचे त्यांनी अद्याप स्पष्टीकरण दिलेले नाही.

इलॉन मस्क यांनी मंगळवारी आपले एक्स प्रोफाइल नाव बदलून 'केकियस मॅक्सिमस' असे केले. मस्क यांच्या नव्या प्रोफाईल इमेजमध्ये पेपे द फ्रॉग सोनेरी कवच परिधान करून व्हिडिओ गेम कंट्रोलर हातात घेताना दिसत आहे. 'बॉयज क्लब' कॉमिक सीरिजमध्ये केवळ कार्टून म्हणून सुरू झालेला पेपे २०१६ च्या अध्यक्षीय निवडणुकीदरम्यान श्वेतवर्णीय वर्चस्ववादी आणि उजव्या विचारसरणीच्या लोकांशी ऑनलाइन जोडला गेला होता. अँटी डिफेमेशन लीगने या पात्राला घृणास्पद प्रतीक म्हणून संबोधले आणि त्याचे वर्णन "ऑल्ट राइटचे आवडते मीम" म्हणून केले.

मस्क यांनी म्हटले की, "केकियस मॅक्सिमस लवकरच हार्डकोर पीओईमध्ये 80 व्या स्तरावर पोहोचेल." पीओई हा लोकप्रिय "पाथ ऑफ एक्सलेशन 2" व्हिडिओ गेमचा स्पष्ट संदर्भ आहे, जो मस्क खेळण्यासाठी ओळखला जातो.

ठिबक सिंचनाचे अनुदान रखडले

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

सातारा : जिल्ह्यातील सुमारे साडेतीन हजार शेतकरी ठिबक सिंचनाच्या अनुदानापासून वंचित आहेत. केंद्र व राज्य सरकारचे ९ कोटींचे अनुदान थकले आहे. गेल्या वर्षीपासून जिल्ह्यातील शेतकरी ठिबक अनुदानाच्या प्रतिक्षेत आहेत. नव्या वर्षात तरी हे थकित अनुदान मिळावे, अशी शेतकऱ्यांची मागणी आहे.

ठिबक सिंचन अनुदान योजना ही कृषी विभागांतर्गत असलेली महत्त्वाची योजना आहे. या योजनेंतर्गत कृषी क्षेत्रातील सिंचनासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला जातो. कमी पाणी वापरून अधिक उत्पादन मिळवणे, जलसंपत्तीची बचत करणे आणि शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवणे हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे. ठिबक सिंचन तंत्रज्ञानामुळे शेतकऱ्यांना पिकांना आवश्यकतेनुसार पाणीपुरवठा करणे शक्य होते. त्यामुळे पाण्याचा अपव्यय टाळता येतो.

ठिबक सिंचन प्रणालीचे फायदे असल्यामुळे जिल्ह्यातील शेतकऱ्यांकडून तिचा मोठ्या प्रमाणात वापर केला जातो. त्यासाठी शेतकऱ्यांना ठिबक सिंचन प्रणाली बसवण्यासाठी अनुदान दिले जाते. मात्र, या योजनेत केंद्र व राज्य सरकारचा हिस्सा असलेले अनुदान गेल्या वर्षीपासून मिळालेच नाही. त्यामुळे जिल्ह्यातील साडेतीन हजार शेतकरी ठिबक सिंचनाच्या अनुदानापासून वंचित आहेत.

उद्ध्वस्त गाझापट्टी...

पंढरी संचार छायाचित्र सेवा



गाझा पट्टी इस्रायल आणि हमास यांच्यातील रक्तरंजित संघर्षात गाझा पट्टी पूर्णपणे उद्ध्वस्त झाली आहे. तेथील पॅलेस्टिनी मोठ्या प्रमाणात विस्थापित झाले आहेत. विध्वंसाचे गुरुवारी टिपलेले हे छायाचित्र.

केजरीवाल सरड्याप्रमाणे रंग बदलतात; भाजपचा टोला

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

नवी दिल्ली : खोटी आश्वासने देणे आणि सरड्याप्रमाणे रंग बदलणे हेच दिल्लीचे माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल आणि आम आदमी पक्षाचे (आप) वैशिष्ट्य आहे, असा टोला भाजपचे राष्ट्रीय प्रवक्ते आणि खासदार सुधांशू त्रिवेदी यांनी पत्रकार परिषदेत लगावला आहे.

दिल्लीत विधानसभा निवडणुका जवळ आल्या आहेत. दरम्यान, नववर्षाच्या पहिल्याच दिवशी भाजपचे राष्ट्रीय प्रवक्ते सुधांशू त्रिवेदी यांनी पत्रकार परिषदेत आपवर टिका केली आहे. ते म्हणाले, सरड्याप्रमाणे रंग बदलणे हेच आप आणि अरविंद केजरीवाल यांचे वैशिष्ट्य आहे. अरविंद केजरीवाल दिल्लीच्या जनतेला खोटी आश्वासने देत आहेत. आता मोहल्ला क्लिनिकमधीलही भ्रष्टाचार उघड झाला असून जनतेला केजरीवाल यांचा खरा चेहरा समजला आहे.

आप पक्षाच्या प्रत्येक वरिष्ठ नेत्याला भ्रष्टाचाराच्या आरोपाखाली तुरुंगात पाठवण्यात आले आहे. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि संसदेतील पक्षाचे नेते हे तिघेही तुरुंगात गेले आहेत. एवढा भ्रष्टाचार जनतेने यापूर्वी कधीच पाहिला नव्हता. आप सरकारचे आरोग्यमंत्री सत्येंद्र जैन यांना मनी लाँड्रिंगच्या आरोपावरून, अमानतुल्ला खान यांना वक्फ बोर्डातील घोटाळ्याच्या आरोपावरून, नरेश बालयान यांना माफियाशी संबंध असल्याच्या आरोपावरून तुरुंगात पाठवण्यात आले आहे. त्यामुळे आप आणि केजरीवाल यांची विश्वासार्हता आता रसातळास गेली असल्याचाही टोला त्रिवेदी यांनी लगावला आहे.

काका - पुतण्यांच्या एकीकरणासाठी केली जातेय पार्श्वभूमी

विषय

शरद पवार यांना अजित पवारांशी एकजूट का हवी आहे, अशी चर्चा आता सुरू झाली आहे. शरद पवार आणि अजित पवार गटाच्या प्रमुख नेत्यांची दोन दिवसांतील वक्तव्ये पाहिली, तर एकत्र येण्यासाठी हे वातावरण तयार केले जात आहे का, असा प्रश्न पडावा, अशी स्थिती आहे. पवार काका-पुतण्या मात्र याबाबत काहीच भाष्य करताना दिसत नाहीत.

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

पुणे : राजकारणात विनाकारण किंवा उत्स्फूर्तपणे काहीही घडत नाही. कुणाच्या तरी विधानालाही अर्थ असतो आणि त्यामागे अनेक डावपेच दडलेले असतात किंवा भविष्याचे काही संकेत दडलेले असतात. महाराष्ट्रातील पवार कुटुंबीयांमध्ये वर्षभराहून अधिक काळ चाललेल्या संघर्षानंतर आता सलोख्याबाबत केवळ वक्तव्ये केली जात आहेत. शरद पवार यांच्यावर कठोर टीका करणारेही आता त्यांच्या गुणगाणांचे कौतुक करायला लागले आहेत. लोकसभेत शरद पवार यांना तर विधानसभेत

अजित पवार यांना ताकद देणाऱ्या जनतेला दोन्ही पवार एकत्र यायला हवेत, असे चित्र दोघांचे समर्थक तयार करीत आहेत. शरद पवार यांच्या वाढदिवसापासून त्याची सुरुवात झाली असे दिसत असले, तरी प्रत्यक्षात त्याअगोदर प्रफुल्ल पटेल यांनी शरद पवार यांची घेतलेली भेट महत्त्वाची होती. या भेटीवर दोन्ही गटांनी भाष्य करणे टाळले.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या आई आशा पवार यांनी नववर्षाच्या पहिल्याच दिवशी पंढरपूरला जाऊन शरद पवार आणि अजित पवार यांनी एकत्र यावे, असे साकडे पांडुरंगाला घातले. अजित आणि शरद पवार यांनी एकत्र राजकारण करावे अशी त्यांची इच्छा आहे, असे त्या म्हणाल्या, तर शरद पवार यांची अदित पवार यांनी भेट घेतल्यानंतर आ. रोहित पवार यांच्या आई सुनंदा पवार यांनीही पवार कुटुंबातील मतभेदाला मूठमाती देत दोघांनी एकत्र येण्याची इच्छा व्यक्त केली होती. अजित पवार गटाचे कार्याध्यक्ष प्रफुल्ल पटेल यांनी शरद पवार आमच्यासाठी देवासारखे आहेत, असे म्हटले. राजकीय मतभेदांमुळे आम्ही वेगळे झालो; पण शरद पवारांबद्दल आमच्या मनात पूर्वीसारखाच आदर आहे, असे ते म्हणाले. छगन भुजबळ यांनी शरद पवार यांचे पूर्वीच कौतुक केले. त्यानंतर अन्न आणि औषध प्रशासन खात्याचे मंत्री नरहरी झिरवाळ यांनी आपल्या हृदयात शरद पवार असून आपण त्यांना भेटून लोटांगण घालणार असल्याचे सांगितले.

अजितदादांच्या आई आशा पवार यांचे विधान आणि नंतर प्रफुल्ल पटेल यांनी शरद पवारांना देव म्हणणे हे अजाणतेपणी नाही. त्याचे वेगवेगळे अर्थ काढले जात आहेत. पवार घराण्याच्या दोन गटांमध्ये ऐक्य होऊ शकते का, अशी चर्चा महाराष्ट्राच्या राजकारणात जोरात सुरू आहे. दोन्ही गटांना भविष्यातील राजकारणासाठी एकजूट हवी आहे आणि शरद पवार याला सहमती दर्शवण्याची शक्यता आहे. शरद पवारांना ऐक्य हवे असण्याची अनेक कारणे आहेत.

ते ८४ वर्षांचे आहेत आणि पुढील विधानसभा निवडणुकीपर्यंत त्यांचे वय ९० च्या आसपास असेल. त्यांची कन्या सुप्रिया सुळे या बारामतीतून सातत्याने खासदार म्हणून निवडून येत असल्या, तरी त्या लोकनेत्या बनू शकलेल्या नाहीत. अशा स्थितीत सुप्रिया सुळे शरद पवारांशिवाय कशा पुढे जाणार, ही चिंतेची बाब असेल. त्यामुळेच शरद पवारांना त्यांच्या पुतण्याला घेऊन पुढे जायचे असल्याचे मानले जात आहे. यामुळे पक्ष मजबूत राहील आणि कुटुंबातील प्रत्येकासाठीही शक्यता निर्माण होईल.

भाजपसाठी फायद्याची एकजूट

● ही एकजूट भाजपसाठीही फायदेशीर ठरणार आहे. त्याला लोकसभेत शरद पवारांच्या खासदारांचे बळ मिळणार आहे, तर विधानसभेतही हे प्रकरण एकतर्फी होणार आहे. आतापर्यंत अजित पवार किंवा शरद पवार अधिकृतपणे ऐक्याबाबत काहीही बोलले नसले, तरी घराणेशाही आणि नेत्यांकडून अशी वक्तव्ये आल्याने आधी वातावरणनिर्मिती होत असल्याचे मानले जात आहे. यानंतर, जेव्हा जेव्हा योग्य क्षण असेल, तेव्हा एकत्र येण्याचा पुढाकार घेतला जाऊ शकतो.

"जोपर्यंत ड्रेसिंग रूममध्ये प्रामाणिक लोकं आहेत, तोपर्यंत भारतीय क्रिकेट सुरक्षित हातात आहे. तुम्हाला ड्रेसिंग रूममध्ये कायम ठेवणारी एकमेव गोष्ट म्हणजे कामगिरी. हेच माझे प्रामाणिक शब्द होते आणि प्रामाणिकपणा महत्त्वाचा आहे." — गौतम गंभीर

"डॉक्टर ठाकूर यांनी मला बरे केले. मी पूर्ण बरा झालो की मी पुन्हा पुनरागमन करेन आणि लोकांना दाखवून देईन की विनोद कांबळीने क्रिकेट सोडलेले नाही. या माणसाने हॉस्पिटलमध्ये माझा चांगला सराव घेतला आहे. मी फक्त चौकार व षटकार ठोकेन!" — विनोद कांबळी

आर्यन्स क्रिकेट संघाला विजेतेपद!

१७ वर्षाखालील आंतरक्लब एक-दिवसीय क्रिकेट स्पर्धा

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

पुणे : स्पोर्टसफिल्ड मॅनेजमेंट तर्फे आयोजित 'स्पोर्टसफिल्ड अजिंक्यपद करंडक' १७ वर्षाखालील आंतरक्लब एक-दिवसीय क्रिकेट स्पर्धेत आर्दश रावल याने केलेल्या शतकी खेळीच्या जोरावर आर्यन्स् क्रिकेट अॅकॅडमीने स्पार्क स्पोर्टीव्ह क्रिकेट अॅकॅडमीचा ८९ धावांनी पराभव करून स्पर्धेचे विजेतेपद संपादन केले.

मुकुंदनगर येथील महाराष्ट्रीय मंडळाच्या क्रिकेट नेक्स्ट अॅकॅडमीच्या मैदानावर झालेल्या अंतिम सामन्यामध्ये पहिल्यांदा फलंदाजी करताना आर्यन्स् क्रिकेट अॅकॅडमीने ३०६ धावांचे लक्ष्य उभे केले. आर्दश रावल याने ८२ चेंडूमध्ये १७ चौकारांसह १०२ धावांची खेळी केली. त्याला सार्थक ढमढेरे (६५ धावा) आणि शौनक शेवडे (४६ धावा), विरेंद्र सिंग (४६ धावा) आणि स्वराज चव्हाण (३२ धावा) यांनी धावांचे योगदान दिले. स्वराज

आणि शौनक यांनी ११४ चेंडूत ८५ धावांची सलामी देत संघाला भक्कम सुरूवात करून दिली. त्यामुळे संघाला ३०० धावांचे लक्ष्य उभे करता आले. याला उत्तर देताना स्पार्क स्पोर्टीव्ह क्रिकेट अॅकॅडमीचा डाव २१७ धावांवर संपुष्टात आला. आरूष सिंग याने ६९ धावांची तर, यशोवर्धन पी. याने ५५ धावांची खेळी करून प्रतिकार केला.

स्पर्धेचे पारितोषिक वितरण लायन्स् क्लबचे ला. विजय शितोळे, कार आर्टचे तुषार शिंदे, नोबल डेंटल क्लिनिकचे डॉ. प्रवेश जठार यांच्या हस्ते करण्यात आले. स्पोर्टसफिल्ड मॅनेजमेंटचे सनी मारवाडी आणि अमित काळे उपस्थित होते. विजेत्या आर्यन्स् क्रिकेट अॅकॅडमीला आणि उपविजेत्या स्पार्क स्पोर्टीव्ह क्रिकेट अॅकॅडमीला करंडक आणि मेडल्स् देण्यात आली.

वैयक्तिक पारितोषिकेः

- स्पर्धेतील सर्वोत्कृष्ट खेळाडूः शिवम गोरे (विजय क्रिकेट अॅकॅडमी, २८० धावा आणि ८ विकेट);
- सर्वोत्कृष्ट फलंदाजः सार्थक ढमढेरे (आर्यन्स् अॅकॅडमी, ४०४ धावा);
- सर्वोत्कृष्ट गोलंदाजः रझाक शेख (एसएम अॅकॅडमी, ९ विकेट);
- सर्वोत्कृष्ट क्षेत्ररक्षकः धुरविल रेठाठा (स्पार्क स्पोर्टीव्ह अॅकॅडमी);
- सर्वोत्कृष्ट यष्टीरक्षकः स्वराज चव्हाण (आर्यन्स् अॅकॅडमी);
- फेअर प्ले अवॉर्डः स्पार्क क्रिकेट अॅकॅडमी;

पीआयसीटीमध्ये क्रीडा स्पर्धेला प्रारंभ

पुणे: पुणे इन्स्टिट्यूट ऑफ कॉम्प्युटर टेक्नॉलॉजी (PICT) येथे २०२४-२५ च्या आंतरमहाविद्यालयीन क्रीडास्पर्धांचे उद्घाटन बास्केटबॉल कोर्टवर उत्साहात पार पडले. या सोहळ्यात संस्थेचे संचालक डॉ. पी. टी. कुलकर्णी, प्राचार्य डॉ. संजय गंधे, शारीरिक शिक्षण व क्रीडा संचालक सचिन एस. शिंदे, अधिकारी अंकुश सपकाळ, शिक्षकवर्ग, विद्यार्थी, तसेच कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या स्पर्धांचे आयोजन शारीरिक आरोग्य वाढवणे आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना देणे या उद्देशाने करण्यात आले आहे. क्रीडा संचालक श्री. सचिन एस. शिंदे आणि अधिकारी अंकुश सपकाळ यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम यशस्वी होत आहे.

अंकुश सपकाळ यांनी सांगितले की, या स्पर्धा सुमारे महिनाभर चालणार आहेत. १ ते १० जानेवारी २०२५ या कालावधीत महाविद्यालयीन कर्मचाऱ्यांसाठी व्हॉलीबॉल, बुद्धिबळ, टेबल टेनिस, कॅरम, आणि थ्रो बॉल या क्रीडाप्रकारांचे आयोजन करण्यात आले आहे. त्यानंतर, ११ ते २५ जानेवारी २०२५ या कालावधीत विद्यार्थ्यांसाठी विविध क्रीडाप्रकारांचे सामने होणार आहेत. स्पर्धांमुळे PICT मध्ये खेळांच्या माध्यमातून आरोग्यदायी संस्कृती वाढीस लागण्यास मदत होत आहे.

दहाव्या फेरीअखेर आरित कपिल, कियान्ना परिहार आघाडीवर

पुणे : महाराष्ट्र राज्य बुद्धिबळ संघटना यांच्या वतीने आयोजित व जागतिक बुद्धिबळ महासंघ(फिडे), भारतीय बुद्धिबळ महासंघ(एआयसीए) यांच्या मान्यतेने होत असलेल्या ३७व्या ९वर्षाखालील खुल्या व मुलींच्या राष्ट्रीय बुद्धिबळ स्पर्धेत दहाव्या फेरीअखेर खुल्या गटात आरित कपिलने, तर मुलींच्या गटात कियान्ना परिहार यांनी ९ गुणांसह आघाडी प्राप्त केली आहे. श्री शिवछत्रपती क्रीडा संकुल म्हाळुंगे बालेवाडी येथील बॉक्सिंग हॉलमध्ये सुरू असलेल्या या स्पर्धेत खुल्या गटात दहाव्या फेरीत पहिल्या पटावरील लढतीत दिल्लीच्या आरित कपिलने पश्चिम बंगालच्या मणी सर्वार्थीचा पराभव करून ९ गुणांसह आघाडी कायम राखली. मुलींच्या गटात राजस्थानच्या कियान्ना परिहारने तेलंगणाच्या साईअंशिता पुव्वालाचा पराभव करून ९ गुणांसह आपली विजयी मालिका कायम राखली. दुसऱ्या पटावरील लढतीत केरळच्या दिवी बिजेशने पंजाबच्या राध्या मल्होत्रा चा पराभव करून ८.५ गुण प्राप्त केले. आंध्रप्रदेशच्या अन्नन्या चिंताने महाराष्ट्राच्या त्वेशा जैन चा पराभव करून ८ गुण मिळवले.

क्रिकेट स्पर्धेत एसएआरके क्रिकेट अॅकॅडमीला विजेतेपद

पुणे : एसए-आरके अॅकॅडमी तर्फे आयोजित 'एसएआरके अजिंक्यपद करंडक' १५ वर्षाखालील मुलींच्या आंतरक्लब एक-दिवसीय क्रिकेट स्पर्धेत माही सुंकाळे हिने केलेल्या अष्टपैलु खेळी आणि गोलंदाजांच्या अचूक कामगिरीमुळे एसएआरके क्रिकेट अॅकॅडमीने विनर्स क्रिकेट अॅकॅडमीचा ६२ धावांनी पराभव स्पर्धेचे विजेतपद संपादन केले. मांजरी येथील पीजी क्रिकेट मैदानावर झालेल्या या अंतिम सामन्यात पहिल्यांदा फलंदाजी करताना एसएआरके क्रिकेट अॅकॅडमीने ४० षटकामध्ये ६ गडी गमावून १८५ धावांचे लक्ष्य उभे केले. यामध्ये सलामीवीर माही सुंकाळे हिने ३५ धावांची खेळी केली. माही आणि आर्या व्यास (१७ धावा) यांनी ११७ चेंडूंमध्ये ५६ धावांची सलामी दिली. त्यानंतर फलंदाजीस आलेल्या पर्णवी बनसोडे (३४ धावा), स्वरा गाडे (२८ धावा) आणि अनुष्का राठोड (१८ धावा) यांनी धावांचे योगदान देत संघाला १८० धावांचा टप्पा गाठून दिला. या लक्ष्याचा पाठलाग करताना विनर्स क्रिकेट अॅकॅडमीचा डाव ३४.३ षटकात १२३ धावांवर आटोपला.

१३ वर्षाखालील क्रिकेट स्पर्धेत एके स्पोर्टस संघाची विजयी सुरुवात

पुणे : चॅम्प्स स्पोर्टस फाऊंडेशन यांच्या वतीने आयोजित चॅम्प्स करंडक १३ वर्षाखालील क्रिकेट स्पर्धेत साखळी फेरीत राजवीर देशमुखने केलेल्या

नाबाद ७१ धावांसह अन्वय वाशिमकर(३-१२) याने केलेल्या अचूक गोलंदाजीच्या जोरावर एके स्पोर्टस संघाने ओएसीस क्रिकेट क्लब संघाचा ८१ धावांनी पराभव करून विजयी सुरुवात केली. धायरी येथील सहारा क्रिकेट अकादमी व स्टार क्रिकेट मैदानावर सुरू असलेल्या या स्पर्धेत साखळी फेरीत प्रथम फलंदाजी करताना एके स्पोर्टस संघाने २५ षटकात २ बाद १९४ धावा केल्या. यात राजवीर देशमुखने ५८ चेंडूत १२ चौकारासह नाबाद ७१ धावा, सोहम यादवने ४६ चेंडूत ७ चौकारासह ४४ धावा, सृष्टी भणगेने नाबाद २८ धावा काढून संघाच्या डावाला आकार दिला. या आव्हानाला सामोरे जाताना ओएसीस क्रिकेट क्लब संघ २२.२ षटकात सर्वबाद ११३ धावावर आटोपला.

मनू भाकर, डी गुकेश, हरमनप्रीत सिंग, प्रविण कुमार यांना मेजर ध्यान चंद खेल रत्न पुरस्कार

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

नवी दिल्ली : ऑलिम्पिक पदक विजेती नेमबाज मनू भाकर, जागतिक बुद्धिबळ स्पर्धेतील विजेता डी गुकेश, हॉकी संघाचा कर्णधार हरमनप्रीत सिंग आणि पॅरालिम्पिक खेळाडू प्रवीण कुमार यांना खेल रत्न पुरस्कार जाहीर झाला आहे. युवा व्यवहार आणि क्रीडा मंत्रालयाने आज राष्ट्रीय क्रीडा पुरस्कार २०२४ ची घोषणा केली. १७ जानेवारी २०२५ रोजी सकाळी ११ वाजता राष्ट्रपती भवन येथे आयोजित कार्यक्रमात पुरस्कार विजेत्यांना भारताच्या राष्ट्रपतींकडून त्यांचे पुरस्कार प्रदान केले जातील.

पुरुष हॉकी संघाचा कर्णधार हरमनप्रीत सिंग याच्या नेतृत्वाखाली भारताने पॅरिस ऑलिम्पिक स्पर्धेत कांस्यपदक जिंकले होते आणि त्याच्या नावाची मेजर ध्यान चंद खेल रत्न पुरस्कारासाठी शिफारस करण्यात आली होती. त्याच्यासह या पुरस्कारासाठी पॅरिस पॅरालिम्पिक

स्पर्धेत उंच उडी T64 गटात सुवर्णपदक जिंकणाऱ्या प्रवीण कुमार (Praveen Kumar) याचेही नाव पाठवण्यात आले होते. सर्वोच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायाधीश व्ही रामासुब्रमणियम यांच्या अध्यक्षतेखालील १२ सदस्यीय निवड समितीने ही दोन नावं सुचवली होती.

या नावांमध्ये मनू भाकर हिचे नाव नसल्याने बरीच चर्चा रंगली होती. मनूने पॅरिस ऑलिम्पिक स्पर्धेत भारताला दोन कांस्टपदकं जिंकून दिली होती आणि तिचे नाव नसल्याने तिच्या वडिलांनी संताप व्यक्त केला होता. मनूनेही तिचे मत मांडले होते. सर्वात प्रतिष्ठित खेल रत्न पुरस्कारासाठी माझ्या नामांकनावरून चालू असलेल्या वादासंदर्भात मी हे सांगू इच्छितो की, एक खेळाडू म्हणून माझी भूमिका माझ्या देशासाठी खेळणे आणि सर्वोत्तम कामगिरी करणे आहे. पुरस्कार आणि सन्मान हे मला प्रेरित ठेवतात पण ते माझे अंतिम ध्येय नाही, असं ती म्हणाली होती.

दरम्यान, १८ वर्षीय भारतीय बुद्धिबळवीर डी गुकेशने नुकताच सिंगापूरमध्ये विद्यमान चॅम्पियन डिंग लिरेनला हरवून जागतिक बुद्धिबळ स्पर्धेचे विजेतेपद मिळवले होते . या विजयाबरोबर तो इतिहासातील सर्वात तरुण जागतिक चॅम्पियन बनला आहे. गुकेशने वयाच्या ११ व्या वर्षी बोलून दाखवलेला निर्धार आज पूर्ण केला आणि तो १८ वर्ष, ८ महिने, १४ दिवसांचा असताना वर्ल्ड चॅम्पियन ठरला. त्याने गॅरी कास्परोव्ह यांनी १९८५ मध्ये २२ वर्ष, ६ महिने, २७ दिवसांचा असताना नोंदवलेला विक्रम मोडला. त्यालाही या सर्वोच्च क्रीडा पुरस्काराने सन्मानित केले जाणार आहे.

संघ केवळ २ फिरकी गोलंदाज ठेवू शकतो

सिडनी कसोटीसाठी भारताचे पॉसिबल प्लेइंग ११

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

मेलबर्न : भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील बॉर्डर-गावस्कर ट्रॉफीचा पाचवा आणि शेवटचा सामना आजपासून सिडनी क्रिकेट स्टेडियमवर खेळवला जाणार आहे. ५ सामन्यांच्या कसोटी मालिकेत ऑस्ट्रेलिया २-१ ने आघाडीवर आहे. पहिला सामना भारताने तर दुसरा आणि चौथा सामना ऑस्ट्रेलियाने जिंकला होता. तिसरा सामना अनिर्णित राहिला. हा सामना भारतासाठी खूप महत्त्वाचा आहे. जर ही ट्रॉफी स्वतःकडे ठेवायची असेल आणि जागतिक कसोटी चॅम्पियनशिपच्या अंतिम फेरीच्या शर्यतीत राहायचे असेल तर टीमला सिडनी कसोटी जिंकावी लागेल.

प्लेइंग-११ मध्ये भारत एका बदलासह प्रवेश करेल. वेगवान गोलंदाज आकाश दीप दुखापतीमुळे पाचव्या सामन्यातून बाहेर पडला आहे. सिडनीची खेळपट्टी ऑस्ट्रेलियातील इतर खेळपट्ट्यांपेक्षा वेगळी आहे. येथे वेगापेक्षा फिरकीला अधिक मदत मिळते. अशा स्थितीत भारतीय संघ या सामन्यातही दोन फिरकीपटू खेळवू शकतो. त्याचवेळी शुभमन गिलचे पुनरागमन अवघड वाटत आहे. दुसरीकडे ऑस्ट्रेलियाने मिशेल मार्शला वगळले आहे. त्याच्या जागी ब्यू वेबस्टरला कसोटी पदार्पण करण्याची संधी देण्यात आली आहे.

गिल सलग दुसरा सामना खेळू शकला नाही या सामन्यात टीम इंडियाच्या बॅटिंग ऑर्डरमध्ये बदल होण्याची शक्यता कमी आहे. चौथ्या सामन्यात कर्णधार रोहित शर्मा यशस्वी जैस्वालसोबत सलामीला येईल. केएल राहुल नंबर-३, विराट कोहली नंबर-४, ऋषभ पंत नंबर-५ वर असेल. शुभमन गिल या सामन्यालाही मुकण्याची शक्यता आहे. खेळपट्टी पाहता त्याच्या जागी फिरकी अष्टपैलू वॉशिंग्टन सुंदर खेळणार आहे.

कुस्ती क्षेत्रातील उगवता तारा हरपला!

पैलवान जय कुंभारचे आकस्मिक निधन

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

दहिवडी : माण तालुक्याच्या क्रीडा क्षेत्रावर दुःखाचा डोंगर कोसळावा, अशी अतिशय दुःखद घटना आज घडली. मलवडीचा युवा पैलवान जय दीपक कुंभार (वय १४ वर्षे) याचे आकस्मिक निधन झाले. या घटनेने मलवडी पंचक्रोशीसह माण तालुका हळहळला. येथील हॉटेल व्यावसायिक दीपक कुंभार यांनी आपल्या एकुलत्या एका मुलाला म्हणजेच जयला पैलवान बनवायचे या ध्येयाने जय याला लहानपणापासून घडवले. ५ ऑगस्ट २०१० रोजी जन्मलेल्या जय याने मलवडी, आंधळी येथे सराव करताना कुस्तीत चुणूक दाखवली. त्यानंतर त्याला झिरपवाडी व तिथून पुढे पुणे येथील जाणता राजा कुस्ती संकुल येथे सराव व प्रशिक्षणासाठी ठेवले.

जय याने सुध्दा वडिलांच्या कष्टाचे चीज करत नावलौकिक मिळवला. शालेय कुस्ती स्पर्धेत सलग दोन वर्षे त्याने १४ वर्षे वयोगटात राज्यपातळीवर तिसरा क्रमांक मिळवला. तर, यावर्षी १७ वर्षे वयोगटात ६२ किलो वजनीगटात विभाग पातळीवर तिसरा क्रमांक मिळवला. नुकत्याच झालेल्या श्री खंडोबा यात्रेनिमित्त आयोजित मलवडीच्या कुस्ती मैदानात नेत्रदीपक कुस्ती करत प्रेक्षकांची वाहवा मिळवली.

महाराष्ट्र केसरीसह ऑलिम्पिक पदक मिळवायचे हे ध्येय घेऊन वाटचाल करत असलेल्या जयसह दिपक कुंभार यांचे स्वप्न आज भंगले. आज सकाळी सराव केल्यानंतर आकस्मिक जय याचे निधन झाले. ही दुःखद घटना समजल्यावर संपूर्ण मलवडी व परिसर शोकसागरात बुडाला. पुण्यासह माण तालुक्यातील जय याच्या चाहत्यांनी व पैलवानांनी मलवडीकडे धाव घेतली.

जय याचे पार्थिव आल्यावर कुटुंबीयांना हा धक्का पचविणे जड जात होते. जय याच्या आईचा टाहो उपस्थितांचे काळीज पिळवटून टाकत होता. एकुलत्या एका कर्तृत्ववान मुलाच्या जाण्याने दीपक कुंभार खचून गेले होते. जय याच्या अंत्यदर्शनाला हजारोंच्या संख्येने जमाव उपस्थित होता.

सिंहगड स्टाफ स्पोर्ट्स लीग २०२४

क्रीडा कौशल्याचा भव्य सोहळा संपन्न

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

पुणे : सिंहगड तंत्र शिक्षण सोसायटी एस.टी.ई.एस. च्या प्रेरणादायी दृष्टिकोनातून कर्मचाऱ्यांसाठी एक प्रमुख क्रीडा स्पर्धा असलेली सिंहगड स्टाफ स्पोर्ट्स लीग २०२४ पर्व दुसरे चा दहा दिवसांच्या रोमांचक स्पर्धेनंतर ३० डिसेंबर २०२४ रोजी समारोप झाला, सदर कार्यक्रमाचा उद्घाटन समारंभ २१ डिसेंबर २०२४ रोजी वडगाव व कॅम्पस क्रिकेट ग्राउंड वर संस्थापक अध्यक्ष प्रा. एम.एन. नवले सर, सचिव डॉ. सुनंदा एम. नवले मॅडम , उपाध्यक्ष (प्रशासन) डॉ. रचना नवले अष्टेकर आणि उपाध्यक्ष (मनुष्यबळ) डॉ. रोहित एम. नवले यांच्या हस्ते अत्यंत उत्साहाच्या वातावरणात करण्यात आला .सदर स्पर्धेमध्ये क्रिकेट, चेस, स्नो कर, जलतरण,ॲथलेटिक्स टेबल टेनिस, लॉन टेनिस व्हॉलीबॉल व इतर २४ खेळांचा समावेश होता.

यावर्षी सदर स्पर्धेला सिंहगड संस्थेच्या पुणे,लोणावळा, सोलापूर, पंढरपूर, कमलापूर, इत्यादी कॅम्पसच्या कर्मचाऱ्यांचा प्रचंड प्रतिसाद मिळाला ज्यामध्ये विविध खेळांमध्ये एकूण पंधराशे खेळाडू सहभागी झाले. एकट्या क्रिकेट स्पर्धेत सिंहगड इन्स्टिट्यूटच्या विविध महाविद्यालया मधील २८ पुरुष संघ आणि बारा महिला संघ सहभागी झाले व त्यांनी उत्साह आणि स्पर्धात्मक भावना दर्शवली. यावर्षी अनेक प्रतिभावण महिला खेळाडूंनी विविध खेळांमध्ये सहभागी होऊन त्यांचे कौशल्य व पराक्रम याची प्रदर्शन केले, सिंहगड संस्थेचे

आयोजक व व्यवस्थापक यांनी महिला सहभागींचे मनापासून कौतुक केले आणि लीगच्या यशासाठी त्यांच्या मौल्यवान योगदानाची दखल घेतली. सिंहगड संस्थेच्या विविध महाविद्यालयांनी संस्थेचे सामूहिक प्रयत्न आणि सांघिक कार्य दर्शनारे विविध खेळ आयोजित केले होते.

या कार्यक्रमाची सुरळीत अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी विविध खेळांचे आयोजन करण्यात प्रत्येक महाविद्यालयाने महत्त्वपूर्ण भूमिका बजावली या कार्यक्रमाचे यश हे सर्व प्राचार्य संचालक शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी आणि सिंहगड संस्थेच्या कुटुंबातील प्रत्येक सदस्याचा सामूहिक प्रयत्नांचा पुरावा होता. सिंहगड सस्तेच्या कर्मचाऱ्यांच्या अथक प्रयत्नांमुळे, समर्पणामुळे आणि सांघिक कार्यामुळे सिंहगड स्टाफ स्पोर्ट्स लीग २०२४ हा सर्व सहभागींसाठी एक संस्मरणीय व आनंददायक अनुभव बनला. सदर स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ दिनांक ३० डिसेंबर २०२४ रोजी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रा. एम. एन. नवले सर यांच्या वाढदिवसानिमित्त सिंहगड इन्स्टिट्यूटच्या वडगाव कॅम्पस मधील क्रिकेट ग्राउंड वर संपन्न झाला यामध्ये प्रामुख्याने पुरुष व महिला क्रिकेट स्पर्धेमधील विजेत्या व उपविजेता संघाना मेडल्स व ट्रॉफी देऊन गौरविण्यात आले.

सदर स्पर्धेमध्ये महिला गटातील सिंहगड डेंटल कॉलेज हा संघ विजेता व सिंहगड फार्मसी कॉलेज हा संघ उपविजेता ठरला व पुरुष गटामध्ये एस के एन सिंहगड कॉलेज ऑफ इंजीनियरिंग हा संघ विजेता व सिंहगड इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी लोणावळा हा संघ उपविजेता ठरला. यामध्ये मॅन ऑफ द सिरीज या पुरस्काराने श्री राजेंद्र देशमुख यांना गौरविण्यात आले व त्यांना होंडा शाईन ही मोटरसायकल भेट म्हणून देण्यात आली. यावर्षी सिंहगडच्या कर्मचारी सदस्यांमध्ये सांघिक कार्य क्रीडा कौशल्य आणि मैत्रीला प्रोत्साहन देत सिंहगड स्टाफ स्पोर्ट्स लीग २०२४ ला भरघोस यश मिळाले आपल्या कर्मचाऱ्यांसाठी सर्वसमावेशक वातावरण निर्माण करण्याचा संस्थेच्या वचन बद्धतेचा पुरावा म्हणून या कार्यक्रमाची काम झाले. सदर स्पोर्ट्स लीग ही सिंहगड स्पोर्ट्स असोसिएशन, डॉ. एस.डी. लोखंडे व डॉ.नचिकेत एम. गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आली होती, त्याचबरोबर सिंहगड संस्थेच्या विविध कॅम्पस डायरेक्टर व महाविद्यालयाच्या प्राचार्य, शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांचे योगदान अतुलनीय होते त्याबद्दल आयोजक कमिटी तर्फे त्यांचे सुद्धा आभार मानण्यात आले, सदर स्पोर्ट्स लीग मुळे सिंहगड संस्थेतील सदस्यांना एक आनंदाचे व उत्साहाचे वातावरण निर्माण करण्यात झाले व अशाच आनंदाच्या वातावरणात कार्यक्रमाची सांगता झाली आहे.